# देगलूर : विविधदर्शन



अ.व्या. शिक्षण संस्थेचे

**देगलूर महाविद्यालय, देगलूर**




होट्टल येथील हेमाडपंथी मंदिर
ता. देगलूर.

मुखपृष्ठ : होट्टल (ता. देगलूर) मंदिरातील सुप्रसिध्द श्रीगणेशाची मूर्ती

अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे

## देगलूर महाविद्यालय, देगलूर

# देगलूर : विविध दर्शन




संपादक

**प्रा. सर्जेराव रणखांब**

मराठी विभाग प्रमुख,

देगलूर महाविद्यालय, देगलूर

अ.व्या. शिक्षण संस्थेचे
**देगलूर महाविद्यालय, देगलूर**

**देगलूर : विविधदर्शन**

प्रकाशक :
**डॉ. अशोक वाकोडकर**
प्राचार्य,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**आवृत्ती – दुसरी**
सर्वाधिकार
देगलूर महाविद्यालय, देगलूर
संपादक :
**प्रा. सर्जेराव रणखांब**

मुद्रक :

**मुद्रा ऑफसेट,** नांदेड. ✆ : (०२४६२) २४२१०९

## दोन शब्द

आपल्या परिसराचा शोध घेऊन सामाजिक सांस्कृतिक संदर्भात त्याचा अन्वयार्थ लावणे, ही शैक्षणिक क्षेत्रातली महत्त्वाची बाब आहे असे वाटते. प्रत्येक ठिकाणच्या परिसरात काही एक परंपरा असतात, त्या परंपरा खऱ्या अर्थाने समजून घेतल्या की आपल्या वर्तमानाचेही बरेचसे आकलन होते. आणि याचे दायित्व त्या भागात कार्यरत असणाऱ्या शिक्षणसंस्थांवर आहे. हीच भूमिका घेऊन **'देगलूर : विविधदर्शन'** हे पुस्तक सिध्द होत आहे.

देगलूर परिसराचा वेध डोळसपणे घेण्याचा प्रयत्न यात झाला आहे. यातून देगलूर तालूक्यातील महात्त्वाच्या व विविध क्षेत्रातील संदर्भाचा एक आलेख रेखाटला गेला आहे. थोडक्यात देगलूर परिसराचे प्रतिबिंब म्हणजे हे पुस्तक आहे. वाचक या पुस्तका चे स्वागत करतील अशी खात्री वाटते.

**डॉ. अशोक वाकोडकर**
प्राचार्य,
**देगलूर महाविद्यालय, देगलूर**

# संपादकीय

'**देगलूर : विविधदर्शन**' या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ती आहे. पहिली आवृत्ती प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी यांच्या काळात तत्कालिन मराठी विभागप्रमुख व प्रसिध्द साहित्यिक लक्ष्मीकांत तांबोळी यांनी संपादित केली होती. तिला आता जवळजवळ तेवीस वर्ष झाली. पहिल्या आवृत्तीत व या आवृत्तीत काही ठळक बदल आहेत. प्रा. पुरूषोत्तम देशमुख व प्रा. आर. के कुलकर्णी यांचे लेख नव्याने या आवृत्तीत घेतले आहेत.

या पुस्तकाचा उद्देश देगलूर पंचक्रोशीतील प्रमुख पैलूंचा परिचय वाचकांस करून देण्याचा आहे. त्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक अंगाने यातील लेख लिहिलेले आहेत. इथल्या संस्कृतीचा एक चेहरा मोहरा या पुस्तकातून व्यक्त झालेला आहे.

प्रत्येक परिसराचा स्वत:चा एक स्वभावधर्म असतो एक संस्कृती असते. तिचे आकलन करून देणे व घेणे ही एक सांस्कृतिक जबाबदारी असते. देगलूर महाविद्यालयाने याच भूमिकेतून ही जबाबदारी स्वीकारली आहे. म्हणून हे पुस्तक दुसऱ्या आवृत्तीने वाचकांसमोर येत आहे. वाचक या प्रयत्नाचे स्वागत करतील अशी आशा वाटते.

**प्रा. सर्जेराव रणखांब**

अनुक्रमणिका :


| अ.क्र. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | **देगलूरचा भौगोलिक परिसर**<br>कै. प्रा. हरिकिशन राठौर | १ |
| २. | **देगलूरचा इतिहास**<br>प्रा. दत्तप्रसन्न साठे | ५ |
| ३. | **मध्ययुगीन देगलूरचा परिसर**<br>प्रा. गो.बं. देगलूरकर | ९ |
| ४. | **देगलूर : एक सांस्कृतिक दर्शन**<br>प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी | १५ |
| ५. | **देगलूरचे धार्मिक जीवन**<br>वै. ह.भ.प. धुंडामहाराज देगलूरकर | २० |
| ६. | **देगलूरचे शैक्षणिक वातावरण**<br>प्रा. सत्यनारायण जाजू | २५ |
| ७. | **देगलूरच्या परिसरातील मराठी भाषा**<br>प्रा. सुग्राम पुल्ले | २८ |
| ८. | **मराठी अध्यापनाचे स्वरूप**<br>प्रा. श्री. विद्याधर कानोले | ३० |
| ९. | **स्वातंत्र्य लढ्यातील ' देगलूर '**<br>प्रा. गोविंद गोपछडे | ३४ |
| १०. | **देगलूर तालुक्याची औद्योगिक विकासक्षमता**<br>प्रा. रामचंद्र घोंगडे | ४० |
| ११. | **वैज्ञानिक दृष्टिकोणातून देगलूर**<br>प्रा. रघुकृष्ण शेटये व प्रा. एकनाथ विसपुते | ४५ |
| १२. | **लोकसाहित्यातील देगलूर**<br>प्रा. सौ.तारा परांजपे | ५१ |
| १३. | **होट्टलचे शिवालय**<br>प्रा. पुरूषोत्तम देशमुख | ५५ |
| १४. | **देगलूर तालूक्यातील ग्रामपंचायती**<br>प्रा. आर.के. कुलकर्णी (राज्यशास्त्र विभाग प्रमुख) | ५९ |

# १. देगलूरचा भौगोलिक परिसर

कै. प्रा. हरिकिशन राठौर

देगलूर शहराच्या आठ-दहा मैल भोवतीच्या परिसरात चारी दिशांना डोंगर व टेकड्यांच्या तुरळक रांगा आढळतात. उत्तरेस खानापूरजवळ व पूर्वेस तडखेलच्या आसपास तसेच दक्षिणेस भक्तापूर, रामपूर केरुर या गावाजवळ डोंगराच्या रांगा पसरल्या असून पूर्वेस देगलूरपासून ३ मैल अंतरावर चैनपूरजवळ डोंगराळ भाग आढळतो. अशा प्रकारे देगलूरचा परिसर थोड्या फार प्रमाणात पठारी भागाने वेष्टित झालेला आहे व त्या मधील प्रदेश सखल व सपाट स्वरूपाचा दिसून येतो.

देगलूर शहरापूरता विचार केल्यास जमिनीच्या उंचसखलपणामध्ये बरीच तफावत दिसून येते. जूनी वसती ही सखल भागात असून समुद्र सपाटीपासून सरासरी उंची १२२० फुटांपर्यंत असून नवीन वसविलेल्या भागाची हीच उंची १२४८ फुटापर्यंत आढळते. जसजसे पूर्वे कडून पश्चिमेकडे जावे तसतसे भूभागाची उंची वाढलेली दिसून येते. पश्चिमेकडील बराच भाग खडकाळ असून उरलेल्या भागात मुरमाची जमीन व रेतीमिश्रीत मातीचे थर आढळतात. जुन्या वसतीभोवती चार वेशीने वेष्टिलेल्या व आसपास बऱ्याच ठीकाणी पांढरी मातीही सापडते. वस्तुतः पांढरी माती ही नैसर्गिक स्परुपाची नसून खताच्या वापरामुळे ती पांढरी बनते. या वरुन जानकाराचे म्हणने असे आहे की देगलूरची वसती पार जुन्या काळापासून अस्तित्वात असावी.

उदगीर येथून उगम पावलेली लेंडी नदी ( प्राचीन नाव -उद्दालिका-) देगलूर गावाच्या तीन दिशेने वळसा घालून पूर्वेकडे वाहत जाते. पश्चिम भागातील खडकाळ अडथळ्यामुळे ही नदी आपला प्रवाह बदलून प्रथम दक्षिणेकडे वळते व नंतर पूर्व दिशेस वळते. पश्चिम भागातील खडकांना फोडून हिचा प्रवाह जेव्हा उद्दाम वेगाने खाली पडतो; त्या ठिकाणी १५-२० फुटाचा एक छोटा धबधबा निर्माण झाला आहे याला -पाताळगंगा- या नावाने संबोधिले जाते.

देगलूरपासून दक्षिणेस काही मैलांवर असलेल्या सखल भागात बांधलेल्या तलावाचे

पाणी कालव्याद्वारे आणून पूर्वी काही पाणभरु साळवण लावण्यात येत असत; परंतु आता तिथे भर टाकून तिचा उपयोग अन्य कार्यासाठी करण्यात येत आहे.

या परिसराची समुद्रसपाटीपासून असलेली उंची लक्षात घेता हा भाग एकूण सखलच आहे. त्यामुळे हवामान विषम आढळून येते. उन्हाळ्याचा पूर्वाध उष्ण व कोरडा असून, कमाल उष्णतामान ११४ सें.ग्रे. पर्यंत गेल्याची नोंद आहे. त्या मानाने हिवाळा थोडा सुसह्यच असतो. देगलूरच्या पश्चिम भागातील खडकाळ भूभागामुळे तपमानात वषिमता असावी असे दिसते.

गेल्या २५-३० वर्षापासून पावसाचे प्रमाण जवळजवळ सारखेच राहिले आहे. क्वचित एखाद्या वर्षी ४० ते ५० इंचापर्यंत पाऊस पडल्याची नोंद आहे; तरीपण साधारणपणे दरवर्षी २५ ते ३० इंच पाऊस पडतो. तीव्र दुष्काळाची परिस्थिती या भागात कधीच निर्माण झाली नाही असे जुने लोक सांगतात. याबाबतीत असा निष्कर्ष काढता येईल की पर्जन्यमानाच्या प्रमाणात फारसा बदल होत नसल्याने ह्या भूभागात बेताचा पाऊस पडतो.

रोहिणी नक्षत्रापासून पावसाळ्याला सुरुवात होते. मृग नक्षत्रामध्ये थोडाफार पाऊस पडतो. परंतु पावसाळ्यास आरंभ होतो आर्द्रा नक्षत्रापासून. श्रावण आणि भाद्रपदापर्यंत पावसाला खरा जोर असतो. या भागातील बहुतांश शेती ही कोरडवाहू जमिनीवरच चालते, त्यामुळे शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागते.

देगलूर तालुक्यातील जमीन साधारणपणे ६ विभागात विभागण्यांत येते.

१) नदीच्या गाळाने बनलेली तांबूस छटा असलेली, खोल व काळी जमीन नदीच्या काठाने खाढळते.

**२) चुनखड मिश्रीत काळी:** या प्रकारची जमीन नदी असलेल्या शिवारात ५-६ फुटांखाली चोपण, कुठे तरी मुरुम लागतो.

**३) रेतीमिश्रित काळी:** ही जमीन मैदानात चोहीकडे आढळते.

**४) चिकण जमीन:** बहुधा माळाच्या माथ्यावर आढळते. पाऊस अधिक झाला तर शेतात पाऊल टाकता येत नाही व सुकल्यानंतर कठीण बनते.

**५) उथळ काळी:** ही जमीन माळाच्या माथ्यावर व पायथ्यालाही सापडते. या जमिनीत एक ते दीड फुट मातीचा थर असतो. कुठे तर त्याहीपेक्षा कमी असून खाली मुरुमाचा थर सापडतो.

**६) मुरुमाड :** ही माती मुरुममिश्रित काळी, रेतिमिश्रित काळी व चिकण काळी आहे. या जमिनीत खरीप व रबी दोन्ही कोरडवाहू पिके येतात. मात्र मुरुमाड व उथळ काळी जमीन फक्त खरीप पिकांसाठीच उपयोगी ठरते.

२५ ते ३० इंच पावसाचा हा प्रदेश असल्याने दाट जंगले या भागात मुळीच नाहीत. मात्र हिवाळ्यात पाने गळणारी तुरळक वृक्षराजी दिसून येते. यामध्ये सागवान, आंबा, पिंपळ,

चिंच इ. वृक्षाचा समावेश होतो. माळ उघडे बोडके असतात. क्वचित ठिकाणी लहान-मोठी काटेरी झुडपे आढळून येतात. याशिवाय वन्नाळी, केरुर आणि टाकळी या भागांत नवीन जंगले वाढविण्यात येत आहेत.

खरीपाच्या पिकांमध्ये मूग, उडीद, भुईमूग, कापूस, साळ, तूर, पिवळी ज्वारी व वऱ्हाडी ज्वारीचे पीक येते. भुईमुग व कापूस यांची लागवड हल्ली मोठ्या प्रमाणावर होत आहे. या बाबतीत उल्लेखनीय गोष्ट अशी की गेल्या कांही वर्षापासून मुगाचे उत्पन्न व्यापक क्षेत्रातून निघत असून महाराष्ट्राच्या इतर बाजारपेठामध्ये येथील मुगाला मागणी आहे.

रबी हंगामामध्ये या भागात मीरची, जवस, गहू, ज्वारी, करडी अशी पिके घेतली जातात. अलीकडे कांही वर्षापासून मिरचीचे पिक फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. १०-१५ वर्षापासून मिरचीच्या पिकाचे क्षेत्रफळ सुमारे ७५०० एकर आहे. कोरडवाहू शेतीमध्ये इतके आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे दुसरे कोणतेही पिक आढळून येत नाही.

सध्या लागवडीखाली असलेल्या तालुक्याच्या कोरडवाहू शेतीचे क्षेत्रफळ ८०,००० एकरांपेक्षा अधिक आहे. मात्र पाणिपूरवठ्याच्या अभावी फळबागायतीचे क्षेत्रफळ त्या मानाने फारच कमी आहे. भविष्यकाळात लिफ्ट इरिगेशनची व्यवस्था झाल्यास नदीच्या दोन्ही काठांवर फळबागाची लागवड मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. सध्या विहिरीच्या पाण्यावर थोड्या प्रमाणात केळी, मोसंबी, संत्रे आणि द्राक्षाची लागवड केलेली ओढळते.

जंगलाभावी वन्य प्राणी अभावानेच आढळतात. कोल्हा, हरीण, ससा या व्यतिरीक्त अन्य प्राणी दिसून येत नाहीत. पाळीव प्राण्यांमध्ये गाई,बैल, म्हशी, शेळ्या आणि मेंढरे ही पशू संपत्ती मुबलक आहे. शिवाय घोडे, उंट आणि गाढव यांचा वहातुकीसाठी आज देखील चांगला उपयोग होतो. मराठवाड्यात इतरत्र क्वचित दिसणारा उंट हा प्राणी देगलूरच्या परिसरात मालाची ने-आण करण्याची मोठी कामगिरी बजावतो; हे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल.

या भागात शहापूरजवळ अभ्रकाची एक खाण काही वर्षापूर्वी सुरु झाली होती. परंतु अभ्रकाचा दर्जा उच्च नसल्याने किंवा योग्य त्या तांत्रिक प्रयत्नांच्या अभावी अद्यापही या खनिज संपत्तीचा उपयोग होऊ शकला नाही.

देगलूर तालुक्यातील वळग, माळेगाव या ठिकाणी चुणखडीचा दगड मोठ्या प्रमाणावर सापडतो. येथील चुन्याचा उपयोग बांधकामात मोठ्या प्रमाणावर झाला. त्यापैकी उल्लेखनीय म्हणजे निजामसागरचे धरण आणि लेंडी नदीवरील पूल होय. या शिवाय या भागात ग्रेनाईटच्या दगडाचे भरपूर साठे उपलब्ध आहेत. ज्याचा औद्योगिक प्रगतीसाठी बराच उपयोग होऊ शकेल.

हा कृषिप्रधान परिसर नुकताच कोठे औद्योगिक युगात प्रवेश करीत आहे. देगलूर हे तालुक्याचे ठिकाण सोडल्यास इतरत्र औद्योगिक विकासाचा आरंभ अद्याप झाला नाही. देगलूर शहरात मात्र कापसाच्या तीन सुसज्ज गिरण्या असून त्यापैकी २ जिनिंग व १ प्रेसिंग

फॅक्ट्री आहे. याशिवाय अनेक ऑईल मिल्स, पिठाच्या गिरण्या चालतात. विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे औद्योगिक विकासास बरीच अडचण निर्माण झाली आहे. ही गोष्ट नमुद करावीशी वाटते.

हातमाग व पावरलूम्सच्या साह्याने सुताचे व खादीचे उत्पादन येथील आणखी एक व्यावसायिक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सरकारी व बिनसरकारी प्रयत्नाने या उद्योगाला नवीन स्वरुप प्राप्त होत आहे.

येथील बाजारपेठेचा दिवसेंदिवस विस्तार होत असून अन्नधान्य, कापड, किराणा इ. विविध प्रकारच्या मालांची विक्री व खरेदी व्यापक प्रमाणावर होत आहे.

गेल्या १५-२० वर्षात तालुक्यातील लहान मोठे अॅप्रोच रोड, मेटल रोड व डांबरी रस्ते यांची लांबी १५० मैलापेक्षा अधिक झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती यांच्या प्रयत्नाने रस्त्याचे जाळे वाढत आहे. नांदेड-हैद्राबाद रोडवरील देगलूर हे प्रमुख स्थान असून अकोला-हैद्राबाद या नियोजित राष्ट्रीय रस्त्यावरील महत्वाचे ठिकाण बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे रेल्वेबाबतीत मात्र हा विभाग अद्यापही उपेक्षित राहिला आहे.

तालुक्यातील १०६ खेड्यामधील लोकजीवन बहुतांशी कृषी व्यवसायावरच अवलंबून आहे. येथील जनतेचे जीनवमान साधारण स्वरुपाचे असूनही दुष्काळ, वादळे, पूर अशा दैवी आपत्तीना तोंड द्यावे लागत नसल्याने इतर भागांपेक्षा येथील शेतकरी वर्ग सुदैवीच म्हणावा लागेल. साक्षरतेचे प्रमाण १० % पेक्षा कमीच आहे. तरी पण शेती व्यापार व शिक्षण इ. क्षेत्रात या भागातील जनता प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे हे निश्चित.

देगलूर तालुक्यात देगलूर, येवती, मालेगाव, होट्टल दावणगीर व मसणेर या ठिकाणी दर वर्षी मोठ्या प्रमाणावर जत्रा भरते व धार्मिक उत्सव होतात. या जत्रामधून गुरा-ढोरांचा व्यापार व इतर व्यवसायास चालना मिळते. असा हा देगलूराचा भौगोलिक परिसर विविधतेने नटलेला आहे.

***

# २. देगलूरचा इतिहास

- प्रा. दत्तप्रसन्न साठे

काळाच्या ओघात काय बदलेल ते सांगता येत नाही. प्राचीन भारतात विद्या व शास्त्र यांची माहेरघरे असलेली व येथे महान विद्यापीठे होती ती नालंदा व वल्लभी आज महत् प्रयासाने नकाशाच्या आधारे शोधावी लागतात. परवा परवापर्यंत लहान खेडे म्हणून उपेक्षिले गेलेले एखादे ग्राम औद्योगिक विकासाचे वारे पिताच मोठे शहर बनते. प्राचीन काळी असलेले भागानगर हैद्राबाद बनते, चंपावती बीड बनते, प्रतिष्ठान नगरी पैठण बनते, नंदिग्राम नांदेड बनते तर देवपूर देगलूर का होऊ नये ?

कमी अधिक २५० यर्षापूर्वी देगलूर देवपूर म्हणून ओळखले जात होते. ' उर ' याचा अर्थ तेलगूत गाव असा होतो. त्यामुळे देवपूरचे देगलूर होताना तेलगूचा प्रभाव इकडे वाढला असावा किंवा तेलगू ही बहुसंख्याकांची बोली भाषा असावी व देवपूरचे अपभ्रष्ट रूप देगलूर झाले असावे. देगलूर जवळून वहाणाऱ्या नदीचे जे नाव ' लेंडी ' तेही असेच. तिचे दुसरे नाव आहे. ती खरी ' उद्दालिका ' होय. काळाच्या ओघात गावांचे व नदीचे नाव बदलले गेले.

नांदेडच्या ईशान्येस आजमितीस सतरा - अठरा हजार लोकवस्ती असलेले देगलूर १७५ वर्षापूर्वी दोन तीन हजार वस्तीचे चिमुकले गाव चार वेशीत असून या गावाच्या पश्चिमेस हनुमान वेस; पूर्वेस गुम्मट वेस दक्षिणेस होट्टल वेस व उत्तरेस पोचम वेस होती. यातील हनुमानवेस व गुम्मटवेस मागील वर्षीच रस्तारूंदीसाठी पाडण्यात आल्या आहेत. गावाभोवतीं तटबदी होती व तिचे अवशेष आजही काही ठिकाणी दिसतात. त्या वेळच्या देगलूरच्या पश्चिमेस पेठअमरापूर हे लहानसे खेडे होते. तर वायव्येस दिग्गलवाडी नावाची लहनशी वाडी होती.(महाविद्यालयाच्या जुन्या इमारतीमागे) तर नैऋत्येस फुलवाडी होती. देगलूरमध्ये पेठअमरापूर १२१८ फसलीत किंवा इ. १८८९ त विलीन झाले. देगलूरची ग्रामदेवता ' परमेश्वर ' म्हणून होती व ती मूर्ती व देऊळ आजही बैराग्याच्या मठात आहे. या देवतेची पुष्करिणी म्हणजे समोरचे तळे होते. जेथे आज नांदेड को-ऑपरेटिव्ह बँकेची इमारत वगैरे आहे. ही

देवता शिव असावी. कारण त्या मूर्तीच्या मस्तकाच्या डाव्या बाजूस गंगा दर्शविणाऱ्या स्त्रीचा चेहरा आहे. या मूर्तीची उंची चार साडे चार फुट असून क्वचितच अशा पद्धतीत शिव उभा आहे. बहुतेक गंगाधारी शिवच ती देवता असावी.

चाहरी वेशीत चार वेसकर असून वेशीची कामे व जबाबदाऱ्या ते सांभाळत तर सरकारी कामे ' पाडेवार ' सांभाळी, वेसकारास त्या वेशीतून बलते मिळे तर पाडेवारांना सर्व गावातून बलुते असे. वेसकरास धान्य बलुते म्हणून मिळे तर पाडेवारास कणसासहित पेंड्या बलुत्यात मिळत. यांना सरकारकडून कोणत्याही प्रकारचे वेतन अथवा मोबदला मिळत नसे.

या देगलूरात ब्राह्मण, मराठा, कोमटी, कोळी, भोई, मुन्नुरवार, गोलेवार, सालेवार व मुसलमान वस्तीस असून पहिले तीन वर्ग अल्पसंख्याक होते. मुसलमानांची संख्या पंचवीस टक्के होती. कोळी व मुसलमान हे प्रामुख्याने त्या काळात फौजेत भरती होत असत. ब्राह्मण व मराठा सधन शेतकरी वर्ग असून कोमटी समाज व्यापार व सावकारी करणारा होता. इतर लोक बहुतेक शेतकरी व्यवसायात गुंतलेले होते. यातील बहुजन समाजाची भाषा तेलगू असून मराठी व तेलगू यांचा वापर व्यवहारात होत होता.

त्या काळी ज्वारी, गहू, तांदुळ, हरबरा, कापूस, मिरची करडई व कडधान्ये ही प्रमुख पिके होती. ज्वारी तांदूळ व डाळी ही आहारात प्रमुख असून भाजीपाला उच्च वर्गात वापरला जाई, पण भाजीपाला सर्रास उपयोगात नसून डाळ ही प्रामुख्याने वारली जात असे. करडईचे तेल प्रचलित होते. आश्चार्याची गोष्ट म्हणजे देगलूरला भूईमूग शेतीचे पीक म्हणून गेल्या ३०-४० वर्षातच घेण्यास सुरूवात झाली आहे. गूळ व मीठ बीदरहून लमाण्याचे तांडे येथे आणीत असत.

राजस्व पद्धतीतही खूप बदल घडलेले दिसतात. १५ वर्षापूर्वी येथे बिदमासपायली (३ किलोची) धान्य शेतसारा म्हणून घेत असत. पुढे रकमेत हा शेतसारा घेण्यांत येऊ लागला व त्याचा दर कोरडवाहू जमिनीस एक आणा हाली पासून १ रू. हालीपर्यंत होता. मळ्याच्या जमिनीस हाच कर ३-४ रू. हाली होता. आजमितीस हेच कर कोरडवाहू जमिनीस सरासरी आडीच रू. व मळयाच्या जमिनीस साडे सतरा रू. झालेला आहे. पूर्वी सारा भरू न शकणाऱ्या आसामीने आपली सारा भरू शकण्याची शक्ती नाही असे लिहून दिल्यास पूर्वीची सारा बाकी करण्याच्या नावावर पूर्वअर्ज असल्यास जमीन बदलून दिली जात असे. राजस्व वसुलीचे काम पोलीसपाटलाच्या साह्याने पटवारी करीत असे. तर पोलीस पाटील (त्या काळी त्यास कोतवाली पाटील म्हणत). गावात शांतता राखणे व सर्व देखरेख ठेवणे ही कामे पहात असे. पटवाऱ्यास वेतन खालील प्रमाणे मिळे.

| | |
|---|---|
| राजस्व उत्पन्नाच्या पहिल्या हजारी | ५० रू. |
| राजस्व उत्पन्नाच्या दुसऱ्या हजारी | ९० रू. |
| राजस्व उत्पन्नाच्या तिसऱ्या हजारी | १२० रू. |
| राजस्व उत्पन्नाच्या चौथ्या हजारी | १४० रू. |

त्यानंतर वाढ झाल्यास दर हजारी १० रू. मिळत होती. माली पाटील व पोलीस पाटील यास पटवाऱ्यांच्या निम्मे निम्मे वेतन मिळे याशिवाय त्यांना शेती इनाम असून त्यावर शेतसारा माफ होता. शिवाय पटवाऱ्यास येथे तहसील कायम होण्यापूर्वी बलुते मिळे. सर्व साधारण हे बलुते सातखंडी ते अकरा मणापर्यंत होते या शिवाय मागपट्टी व तगपट्टीचे उत्पन्नही पटवाऱ्यास होते.

बाहेरून येणारा माल सेटकाराच्या वजन मापाने मोजला जाई. सेटकार वजन व माप पुरवीत असे व त्याबद्दल त्यास व्यापाऱ्याकडून मालाच्या उलाढाली प्रमाणे पैसे मिळत. सेटकार हा तत्कालीन वजन-माप प्रमुख होता असे म्हटल्यास चूक होणार नाही.

प्रत्येक जमातीत मेहेत्री म्हणून प्रमुख असे. तो जमातीतील सर्व गोष्टीचा प्रमुख असे. जमातीतील बारशापासून तो बाराव्यापर्यंतच्या जबाबदाऱ्या तोच सांभाळी. त्याबद्दल त्याला मानधन वगैरे नसे पण मान असे. जमातीतील तंटे, बखेडे त्यांच्याच मध्यस्तीने तुटत. जमाती-जमातीत झागडा झाल्यास अथवा एखादा गंभीर गुन्हा झाल्यास प्रकरण चावडीवर येत असे. देगलूरला त्यावेळी एक चावडी जुमामशीदीसमोर होती व दुसरी चावडी पेठअजमरापूर चावडी ही साधना हायस्कूलच्या चौरस्त्यावर होती. ३०-४० वर्षांपूर्वी या चावडया पाडण्यात आल्या. चावडीवर न्यायनिवाडयाचे काम दोन्ही पाटील, पटवारी मेहेत्रीशिवाय गावातील प्रतिष्ठित यांच्या सल्लामसलतीने होत असे. छडया मारणे, खोडा देणे वगैरे शिक्षा दिल्या जात. गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्यास सरकारी कक्षेत जात असे.

पूर्वी देगलूरची व्यवस्था शासनातर्फे कशी होती ते पाहणेसुद्धा मोठे मनोरंजक आहे. प्रथम देगलूर हा तालूका महमदाबाद (बिदर) जिल्हयात होता. त्यानंतर निजामाबाद इंदूर हा देगलूरचा जिल्हा झाला त्यानंतर इ. स १९०५ पसून नांदेड हा जिल्हा झाला.

देगलूरच्या तीन तरफा (विभाग) असून या तरफावर एक देशमुख व एक देशपांडया असे. असे एकूण तीन देशपांडे व तीन देशमुख तालूक्याला होते. त्यात तर्फे अव्वल खानापूर असून त्यानंतर मराठे देशमुख होते. श्री गोपाळरावजी देशपांडे यांचे घराणे देशपांडयाचे काम पहात असे. दुसरी तरफ तरफे दुव्वम कसबे देगलूर होती. त्याचे देशमुख सय्यद देशमुख असून देशपांडयाचे काम श्री. नरसिंगराव देशपांडे यांच्या घराण्याकडे होते. तिसरी तरफ तरफे नरंगल असून नरंगलकर देशमुखाकडे देशमुखी असून देशपांडे म्हणून श्री.शेषराव देशपांडे यांचे घराणे होते. देशमुखास ५% रूसूम असून देशपांडयास २.५% रूसूम असे मराठे देशमुखांनी भरणा न केल्याने सिद्दी जे कंधारला रिसाल्याचे काम करीत, त्यांना पाठवून मराठे देशमुखाची गढी कब्जा केली व त्यांची देशमुखी त्यांना दिली. तेच सिद्दी देशमुख समदानी घराणे होय सय्यद देशमुखाची गढी श्री. नारायणराव चिद्रावार यांच्या घरासमोर होती. त्यांच्याकडे रिसाल्या चेही काम असून गावात पहाऱ्याचे काम रिसालदार करीत.

येथे न्यायलय नव्हते. तेव्हा मुखेड व कंधार येथील न्यायालय म्हणून काम करीत होते.

येथे इ. स १९०५ मध्ये न्यायालय होते. पहिल्यांदा न्यायालय बशीर हसनच्या जागेत होते (हल्लीच्या आर्य मंदीराच्या जागी) तेथून इ. स. १९३३ ला हल्लीच्या जागी आले. पोस्टऑफिस इ. स. १९२४ मध्ये आहे त्याच जागी सुरू झाले. डिव्हिजन येथे इ. १९३९ मध्ये कायम झाले व त्याच जागेत आहे. पूर्वी मुधोळ, देगलूर कंधार व बिलोली तालुके या डिव्हिजनखाली होते. तहसील कचेरी येथे इ. स. १८९० च्या सुमारास सुरू झाली. पूर्वी तहसील हल्लीच्या शासकीय कन्या विद्यालयाच्या जागी होती व हल्लीच्या जागेमध्ये गेले.

देगलूरला प्रथम खाजगी शाळेत शिक्षण मिळे. तेही लिहण्या-वाचण्यपूरते व आकडेमोडीइतके. इ.स. १९१० मध्ये प्राथमिक शाळा चौथी इयत्ते पर्यंत झाली. त्यानंतर इ.स.१९२० च्या आसपास मिडल्स्कूल झाले. त्यावेळी ते श्री. शंकरराव कळसकरांच्या घरासमोर होते. शासकीय हायस्कूल इ. स. १९४६-४७ ला येथे सुरु झाले.

देगलूरला आध्यात्मिक परंपरा मात्र आद्य श्री. गुंडामहाराजांपासून लाभलेली दिसते. त्यांचे समकालीन वली मस्तानशाहा यांचे नाव घेतले जाते. याही सत्पुरूषाच्या आधीचे म्हणून (१५ व्या शतकातील) सय्यदशहा झियाओद्दीन रफाई यांचे नांव घेता येते. ते मूळचे दिल्लीकडले. तैमूरलंगाच्या आक्रमणानंतर दिल्ली भागात जो गोंधळ निर्माण झाला व दिल्लीतून जे अनेक लोक बाहरे पडले त्यात हेही होते. हे फोजचे प्रमुख असून मजलदरमलज करीत ते औरंगाबादमार्गे कंधारला आले. तेथील शहाचिमन कंधारवाले यांच्या आशीर्वादाने त्यांना उपरति झाली व ते सर्वसंग त्याग करून जेथे हल्ली त्यांची दर्गा आहे तेथेच रहात असत. त्यांना बहमनी राज्याकडून २३५ एकर जमीन इनाम मिळाली व ते इनाम औरंगजेबाने पुढं कायम केले. त्यांचा मृत्यु इ. स. १४५८ मध्ये रबि-उलआव्वल १५-१६ ला झाला. रबि-उलआव्वल १५-१६ ला दरवर्षी उरूस भरतो. या दर्ग्याच्या बाहेर बाजूस मात्र स्त्रियांच्या कबरी असून त्यावर असलेल्या शिलांमधून सा. री.ग.म. चे सप्तसूर निघतात.

***

# ३. मध्ययुगीन देगलूरचा परिसर

– प्रा. गो.बं. देगलूरकर

देगलूरच्या परिसरात मध्ययुगात बलाढ्यांशी सामना देणारे वीरवर होते; पाठशाळा व विशेषत: महाविद्यालय होते, असे जर आज कुणाला सांगितले तर कदाचित त्याला ते खरेही वाटणार नाही. खरे तर हा सारा परिसरच त्याकाळी सुखसमृद्धीचा व कलासंपन्न होता. अशी या पूर्वदिव्य असलेल्या परिसराचा वर्तमानकालीन पिढीला परिचय करून द्यावा व रम्य भावीकाळ घडवण्यास, जमल्यास प्रोत्साहन द्यावे हे प्रस्तुत लेखाचे प्रयोजन.

देगलूर म्हणजे एकेकाळचे देवऊर म्हणजेच देवपूर. नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाच्या तालुक्याचे अधिष्ठान असण्याचा मान आज देगलूरास आहेच पण ह्या भागात आढळणारी सौंदर्यसंपन्न मंदिरे व अनेक गोष्टी उरी दडवून ठेवलेले शिलालेख या परिसराच्या गत वैभवाची साक्ष देत अजूनही उभी आहेत होट्टल, करडखेड, तडखेल खानापूर इत्यादी देगलूरच्या आसपसची व कंधार, मुखेड, बिलेली व सगरोळी ही थोडीशी दूरची गावे अजूनही काही मंदिरे व काहीचे अवशेष सांभाळून आहेत. या मंदिराची जडणघडण अवलोकिली, तेथील अनेक अप्रतिम प्रतिमा न्याहाळल्या तर या परिसरातील अनामिक कलावंताच्या कौशल्याची महती पटतेच पण त्याच बरोबर तेथील सामाजिक परिस्थितीचा व आर्थिक सुबत्तेचा अंदाजही बांधता येतो. शिवाय वरील ठिकाणच्या उपलब्ध शिलालेखांना थोडेस बोलके केले तर कितीतरी अद्‌भूत व आश्चर्यकारक घटना ह्या परिसरात घडल्याचा दाखला आपणास मिळतो. त्यावरूनच आपणास येथील मध्ययुगीन राजकीय, धार्मिक व सामाजिक जीवन कसे असेल याची स्थूल कल्पना येऊ शकते.

मध्ययुगातील देगलूरच्या परिसरात राज्य करणारे पहिले घराणे राष्ट्रकूटांचे सुदूर उत्तरेस गंगायमुनाच्या खोऱ्यापर्यन्त धडक मारणाऱ्या राष्ट्रकुटांची तृतीय कृष्णाच्या वेळी कंधार येथे राजधानी होती. या नृपश्रेष्ठाचा इथे भव्य प्रासाद होता. प्रमुख अशा राजविलासिनी गणिकांची निवासस्थाने होती. राष्ट्रकुटानंतर या परिसरात नव्हे तर साऱ्या मराठवाडयावर राज्य होते.

कल्याणीच्या चालक्याचे या वंशातील पहिला, दुसरा व तिसरा सोमेश्वर व सहावा विक्रमादित्य यांच्या काळाचे या परिसरात कितीतरी शिलालेख अंगाखांद्यावर अनंत जखमा घेऊन असंख्य गुजगोष्टी सांगण्यासाठी अजूनपर्यन्त तग धरून आहेत. तर कुणी जीवाचा जिवलग भेटलाच तर त्याला हृदय उकलन गुह्य गोष्टी सांगता याव्यात म्हणून काही विकल होऊन आडवे पडले आहेत.

या परिसरात वन्ही व वाजी या नावांची दोन प्रबल अशी मांडलिक घराणी नांदली. पैकी देगलूरपासून चारच मैलांवर असलेल्या होट्टल गावी वन्ही कुलाची राजधानी असावी असे तेथे सापडलेल्या स्तंभलेखावरून वाटते. या वन्ही वंशात एकापेक्षा एक पराक्रमी राजे होऊन गेले म्हणून यांची गणनाच मुळी सूर्य व चंद्र वंशानंतर केलेली आहे. (या वंशाच्या निर्मितीची कथा अग्निकुलाच्या निर्मितीशी मिळतीजुळती आहे.) या घराण्यात घोरज, उत्तम, कलिचोर, अर्गदेव व द्वितीय कलिचोर असे पराक्रमी व प्रजाहितदक्ष राजे होऊन गेले. हे कल्याणीच्या चालूक्याचे मांडलिक होते तरी होट्टल, येरगी, नरंगल, आलूर, नायगाव, औराद पर्यंतचा सगळा भाग यांचे अधिपत्याखाली होता. एकूण २०,००० खेडी यांचे राज्यात होती. या वंशातील धोरजाने परमार मुंजाचा पराभव करण्यास साहाय्य केल्याचे अनुमान आहे.

देगलूरपासून सात-आठ मैलांवर असलेल्या तडखेल गावाचा शिलालेख येथील वाजी नामक मांडलिक घराण्याची शौर्यगाथा अभिमानाने सांगतो आहे. हा शिलालेख नांदेड जिल्ह्यातील लेखांपैकी सगळयात मोठा आहे. तडखेल येथील नागवर्मा नावाच्या राजाने मोठया सेनादलाचे आधिपत्य स्वीकारून सेऊण देशाचा राजा व विंध्यराज मल्लयांचा पराभव केला, तेंव्हा चालक्य नृपती त्याच्यावर विलक्षण खूष झाला. पुढे दंडाधिप नागवर्माच्या विवाहसमयी प्रथम सोमेश्वर स्वत: उपस्थित राहिला व त्याने तडखेल हे गावच नागवर्म्याला भेट म्हणून दिले. असा धूरंधर सेनापती व असा पराक्रमाला दाद देणारा नृपती इतिहासात अन्यत्र आढळणार नाही अशी ही अद्वितीय घटना देगलूरच्या परिसरातीलच.

हे राजे पराक्रमाचीच पूजा करीत असे नव्हे तर दथिचि रावण व बाणभट्ट यांच्यापेक्षाही ते श्रेष्ठ शिवोपासक होते. 1 राजे मंडळी पराक्रम गाजविल्यानंतर थोडया ख्यालीखुशालीत व रंगेलपणात काही काळ घालवीत, म्हणूनच कंधार येथील राजवाडयालगत प्रमुख अशा राजविलासिनीच्या प्रासादतुल्य निवासस्थानांची योजना केलेली होती. राजे प्रजाजनांच्या सुखसोयीची खूपच काळजी घेत. एवढेच नव्हे तर प्राणिमात्राच्या चाऱ्याची व पाण्याची सोय करून. त्यांचीही काळजी वहात. म्हणूनच येथील शिलालेखात त्यांना यथार्थपणे कल्याणपादप 2 म्हटलेले आढळते.

---

१. व्हट्टल लेख, ए.इं. ३०,

२. कंधार ए. इं. ३५, १०५-१११.

---

राज्यात महामंडलेश्वर म्हणजे मांडलिक व विभाग प्रमुख (आयुक्त) ; दंडनायक

(सेनापती) महाप्रधान, तंत्रापालधिष्ठावक; मान्नेय (प्रमुख) वेरगड्डे (कर वसूलकरणारा) व समस्त तंत्राधिष्ठायक (चिटणीस) एवढे अधिकारी होते व ह्या सर्वांचे वास्तव्य देगलूरच्या परिसरात होते. हे व्हट्टल, करडखेड व तडखेल येथील शिलालेखांवरून स्पष्ट होते. यांच्या वेळप्रसंगी बदल्याही होत.

ज्या काळातील घटनांचा आपण आढावा घेतो आहो त्या मध्ययुगीन काळी धार्मिक व सामाजिक जीवन हे आजच्यासारखे पृथक करता येण्यासारखे नव्हते. त्याकाळी साऱ्या भारतवासीयांचे सपूर्ण जीवनच धर्मभावनेने व्यापलेले होते. कुठल्याही व्यवहाराला त्याकाळी धर्माचे अधिष्ठान असे. त्या काळच्या समाजजीवनालाही धर्मभावने मुळेच वळण लागलेले असे. त्या भावनेतूनच: भारतवर्षात अगणित मूर्ती निर्माण झाल्या व त्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी मंदिरे उभारलो गेली. ही मंदिरे मध्ययुगीन भारतांतील धार्मिक तसेच सामाजिक जीवनाची केंद्रस्थाने ठरली. याला देगलूर परिसर अर्थातच अपवाद नव्हता.

या काळी ह्या परिसरात कितीतरी भव्या देवालये उभारली, गेली. इथे सापडलेल्या लेखांवरून स्त्रीपुरूषांचे मंदिर होट्टल येथे, धोरेश्वर देव, कलिचोरेश्वरदेव, प्रसन्नभैरवदेव व स्वयंभू सोमनाथदेव ह्यांची मंदिरे, करडखेड येथे, मुखेड व खानापूर येथे महादेवाची मंदिरे उभारली गेली होती हे कळते. पैकी करडखेड येथील एक व बाकीची सगळी मंदिरे आजही उभी आहेत. काही जुना साज उतरवून तर काही नवा पेहराव चढवून. यापैकी होट्टल येथील एक स्त्रीपुरूषाचे म्हणजे ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे मंदिर सोडले तर बाकीची मंदिरे शिवाचीच आहेत ही राजानी किंवा राज्यातील अन्य मान्यवर अधिकाऱ्यांनी बांधलेली आहेत. सामान्यत: बांधणाऱ्याचे वा ज्यांच्या स्मृतीस्तव ही मंदिरे बांधली गेली त्यांचे नावाने मंदिरातील शिव संबोधिला जाई. उदा. कलिचोरेश्वरदेव, धोरेश्वरदेव वगैरे. देऊळ बांधून झाल्यावर कुणीतरी कळसस्थापनेचा खर्च देई असे करडखेड लेखावरून दिसते. मंदिरातील प्रतिष्ठापित मूर्तींचे पंचामृतस्नान पंचोपचार युक्त पूजा, धूपदीप नैवेद्य नित्यनियमाने व्हावा म्हणून व मंदिराचा दुरूस्तीसाठी वगैरे कधी सगळे गाव 1. तर कधी जमिनी दिल्या जात असत. काही वेळा त्या भागातील प्रत्येक खेडयातून एक-एक द्रम वा निष्क 2. कराच्या रूपाने गोळा केला जात असे व तो मंदिरास दिला जाई. देवासाठी फुले व हार प्रतिदिनी आणणाऱ्या माळ्याकडे काही जमीन लावून दिली जाई. तर सतत तेवणाऱ्या नंदादीपासाठी तेलाची व्यवस्था केली जात असे. यासाठी प्रत्येक तेल्याने घाण्यागगिक एक पळी तेल द्यावे असा दडकहा असे 3.मंदिरातील सेवाधारी, परिचारिक व वेदपाठी यांच्या भोजनाची व वेत्य यांच्या भोजनाची व वेतनाचीही सोय केलेली असे.तेथील अन्य कर्मचाऱ्याना गणवेश 4.वेतन समवेतच मिळे. पुजारीबुवांना जमीन दिलेली असेच पण मंदिराशेजारिच राहता यावे म्हणून घरासाठी जागाही दिलेली असे, 5. होट्टलच्या लेखात तर देवळासमोरील रंगमंडपात नृत्यासाठी म्हणून सौंदर्यखनी देवदासींची नेमणूक केल्याची नोंद सापडते 6. मूर्तिशास्त्राच्या दृष्टीने या परिसरातील होट्टल येथील तीन. मुखेड व खानापूर येथील प्रत्येकी एक ही मंदिरे अत्यंत उत्कृष्ट आहेत. नृत्यमग्न सप्तमातृका या मराठवाडयातील फक्त मुखेड येथील मंदिरांतच आढळतात.

१. नरगल हे गावच दान दिलेले होते. करडखेड लेख ए.इ. ३५.१६३

२. होट्टल लेखा

३. मूखेड लेखा

४. मनुस्मृतीतही असा उल्लेख आढळतो ७.१२६

५. करडखेड लेखा,

६. या काळी उत्तरेच्या बौद्धमंदिरातही अशी पद्धत होती.

बहुतांशी दाने ग्रहणाच्या पर्वकाळी 1. किंवा संक्रातीचे दिवशी दिल्याचा उल्लेख आढळतो. म्हणजे यासमयी दाने देण्याची पद्धत कमीतकमी ६०० वर्षाइतकी जुनी आहे. तडखेलच्या नागवर्म्याने तर षोडष महादान केल्याचीही नोंद आहे.

विद्यार्जन करता यावे म्हणून ह्या मंदिरातच पाठशाळा असत. अशी एक शाळा येरगी इथे होती. उच्चशिक्षणासाठी महाविद्यालय असे. त्याला महाघटिकास्थान असे म्हणत. करडखेड येथील महाघटिकास्थानाचे ज्ञानेश्वर पंडित हे प्राचार्य होते. ह्या विद्यास्थापनावरील खर्च सामान्यत: मंदिराच्या उत्पन्नातूनच होत असे. कारण बरीचशी दाने ही पूजा, ब्राह्मण व विद्यार्थीभोजन आणि पाठशाळा यासाठी दिल्याचा उल्लेख, एकत्रच आढळतो. कंधार येथील पाठसाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रतिदिन लागणाऱ्या तेलामीठाची सोय केलेली होती अशा रीतीने शिक्षण घेतलेले समाजातील प्रतिष्ठित लोक ही वडील लोकांचा,पंडितांचा आदर बाळगीत शुभकार्ये प्रारंभ करताना त्यांचा आशीर्वाद घेत 2.

धार्मिक श्रद्धा हे भारतीय जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. त्यामुळे अधिकांश शिल्पाची निर्मिती त्या श्रद्धेतूनच झालेली आढळते. भारतीय शिल्प व धार्मिक श्रद्धा हे या काळात तरी वेगळे करता येणे शक्य नाही आणि या शिल्पावरूनच आपणाला सामाजिक जीवनाच्या काही अंगांचा तपशील मिळू शकतो.

१. रात्रीच्यावेळी सनान, दान आदींना धर्मशास्त्र सामान्यत: मनाई करते पण ग्रहणकाल हा ह्याला अपवाद आहे. पहा: धर्मशास्त्राचा इतिहास काणे पा.वि.५.१.२४४.

२. होट्टल

गावाची रचना योजनाबद्ध असावी; कारण राजविलासिनी गणिकांच्या वाडयाशेजारी कामदेवाच्या मंदिराची उभारणी केलेली आहे. प्रजाजनांना प्रसंगी एकत्र जमता यावे म्हणून ' सर्वलोकाश्रय ' या यथार्थ नावाचा एक मंडप उभारलेला होता असेही दिसते. 1. उन्हाळ्यात तहानलेल्यांना पाणी मिळावे म्हणून ठिकठिकाणी पाणपोईची योजना करण्यात आलेली असे. 2. पैकी एक गणिकांच्या निवासस्थानाशेजारी व दुसरी प्रत्यक्ष राजवाड्याच्या प्रवेशद्वारीच होती 3. जगतुंगनामक समुद्र (तळे) बांधलेले होते, पाणी उपलब्ध व्हावे म्हणून.

बाजाराच्या ठिकाणी ओझ्याच्या जनावरांना चारा, पाणी मिळावे म्हणून शामनातर्फे प्रतिदिनी पन्नास द्राम खर्च केला जाई, व्यापार सगळा गुर्जरबंधूच्या ताब्यात असे.

या परिसरातील लोक कलाप्रेमी होते. गायन, वादन, नर्तन या कला लोकांना ज्ञात होत्या. स्थापत्य व शिल्पकलेवर काहींचे प्रभूत्व होते, हे काही मंदिरे व शिल्प पाहिले म्हणजे ध्यानी येते. तुतारी, सनई व बासरी ही वायुवाद्ये, तबला मृदंग, जंठा ही चर्मवाद्ये; वीणा व एकतारी ही तंतुवाद्ये तसेच घडयाळ, टाळ व झांज ही तालवाद्ये होट्टल वगैरे ठिकाणच्या देवळांत कोरलेली दिसतात.

---

येथील काही प्रतिमेतील स्त्रिया वरीलपैकी निरनिराळी वाद्ये वाजवीत असलेल्या दिसतात. शिवाची नाना तांडवनृत्ये; नृत्यमग्न गणेश वगैरे मृर्ती तर आहेतच पण नाचनाचूनि थकलेली नृत्यांगना पायातले चाळ

---

१. कंधार लेख, ए. इ. ३५; १९५.

२. ए. इ. ३५; १०५.

३. अजिंठयाच्या भित्ती चित्रांतही एके ठिकाणी राजवाड्याच्या प्राकारात विकानांची सोय आहे. तसेच तक्षशिला उत्खननासतही अशा प्रकारची योजना आढळून आली. पहा : मार्शल यांचे तक्षशिला-भाग १.पृ.१७१

---

सोडीत असल्याचे एका ठिकाणी दाखविलेले दिसते. एक सुस्नात पुरंध्री विपुल केशसंभारातून पाणी निपटून काढते, तेव्हा मेघातून पडणाऱ्या पावसाचेच थेंब समजून चातक ते चोंचीने टिपून घेत असल्याचे शिल्प पाहिले म्हणजे नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचा असूनही कालिदासाला हे शिल्प पाहूनच ही कल्पना सुचली असावी असे वाटते. थोडक्यात सांगायचे तर येथील कलावंत 'मूकंकरोति वाचाल '..... असे सामर्थ्य असलेले प्रतिभासंपन्न असे होते हेच खरे.

संगीत, नृत्य, शिल्प व चित्र या कलांची निर्मिती होतेच मुळी समाज संपन्न असेल तर. समाजाची संपन्नता ही त्यातील स्त्रीपुरूषांच्या कपडयावरून, दागदागिन्यावरून आजमावता येते स्त्री व पुरुष यांचे अंगावर उत्तरीय व नेसूचे वस्त्रप्रकार असत. पण दोहोच्याही प्रतिमांवरून दोघांनाही कपडयाची आवड होती असे दिसते. शिरी उंच रत्नजडित मुकुट,कानात कधी पत्रकुंडले तर कधी मकर कुंडले,गळ्यात रत्नांचे व मोत्याचे अनेकपदरी अनेक हार, बाहूवर अंगद क्वचित त्यांना लावलेले मोत्यांचे पदर, 1. तसेच हातात एकवा दोन वलये 2. कंकण, बोटात अगुलीयके (अंगठया) पायी नृपुरे, जोडवी, वक्ष:स्थलावर यज्ञोपवितासारखा घातलेला अनेक पदरांच्या मोत्यांचा वैकक्षक दागिना, बिदीमारखी ललाटिका व तिला जोडलेला चटुलातिलक, 3. कंबरेला मेखला कधी कटिबंध इत्यादी विविधप्रकारचे अनेक पद्धतीच्या जडणघडणीचे दागिने येथील स्त्रीपुरूषांच्या सुरेख प्रतिमा आकर्षक करीत असलेले दिसतात. दोहोंच्याही पायी काही वेळा वहाणा आहेत. येथील पुरुष दागिनेच अंगी चढवतो असे मात्र

नव्हे. तर त्याने नाना शस्त्रधारण केल्याचेही आढळते. तलवार, भाला,

१. इंदुमती स्वयंवरात यांचा उल्लेख आढळतो.रघुवंश. सर्ग ६ श्लोक . १४

२. मेघदूतातही उल्लेख सापडतो. ' कनकवलयभ्रंशरिक्त प्रकोठः '

३. हर्षचरित्र. पृ.३२.

धनुष्यवाण, ढाल आदी आयुधे त्यांच्याजवळ आहेत. ही वापरणारी रंगेल मंडळी रगेल असणेही स्वाभाविकच. हे येथील कामक्रीडेच्या विविध शिल्पांवरून लक्षात येते. म्हणजेच येथील पुरूष चारी पुरूषार्थाकडे लक्ष देऊन होता तर !

देगलूरच्या मध्ययुगीन परिसराची ही सांस्कृतिक रूपरेखा आहे. ह्या संस्कृतीचे विधाते व त्यांची सृष्टी ह्या विषयी शब्दसृष्टीच्या ईश्वराच्या म्हणजेच ज्ञानदेवांच्या भाषेत असे म्हणता यईल-

यावरी एकेकाचिये लीळे । जन्मती सुरसिद्धांची कुळे ।

एसी अपारे आणि विशाळे । रूप इये पाही ॥

***

# ४. देगलूर : एक सांस्कृतिक दर्शन

- प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी

मराठवाड्याच्या पूर्वसीमेवर, महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात वसलेले देगलूर हे एक ख्यातनाम व्यापारी शहर आहे. दोन्ही बाजूनी आंध्र-कर्नाटक सीमा देगलूरला कवटाळण्यासाठी जणू काही बाहू पसरून उभ्या आहेत. आंध्र-कर्नाटकाच्या थोडयाफार खुणा देगलूरच्या परिसरात जागजागी आढळतात. आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र अशा तीन संस्कृतीसंगमाचे ' प्रयागतीर्थ ' म्हणजे देगलूर. देगलूरचे मूळ नाव ' देवपूर ' तेलगु भाषेत ' देवलुऊरू ' म्हणत. देवलुउरूचेच पुढ देगलूर झाले. उदयगिरीच्या (उदगीर) उदरातून निघालेल्या ' उद्दालिका ' (लेंडी) नदीच्या काठावर वसलेले देवपूर म्हणजे संतभूमी. उद्दालक ऋषीच्या चरणस्पर्शाने पावन झालेली उद्दालिका खळखळ वहात आली नि देगलूरचे जीवन समृद्ध करून गेली. चुडामणी महाराज, गुंडामहाराज व मस्तानशा वली अशा साधू-सत्पुरूषांच्या वास्तव्याने पावन झालेले हे शहर आहे. गुंडामहाराजांनी भक्तीचा झेंडा अखंड फडकत ठेवला. देगलूरची कीर्ती दुरवर पसरली. इथे अध्यात्म आणि वाणिज्य एक मेकांच्या हातात हात घालून वावरले. लक्ष्मी आणि सरस्वती सहसा एकत्र आढळणार नाहीत पण इथे दोघीही गुण्यागोविंदाने नांदल्या. धीमंत आणि श्रीमंत, भोग आणि त्याग, विराग आणि अनुराग अशा परस्पर विरोधी गोष्टींचा समन्वय आढळतो तो इथेच.

देगलूर हे व्यापारासाठी आजच प्रसिद्ध नाही तर इथल्या वणिक्‌वृत्तीला पूर्वपरंपरा आहे. सधन, संपन्न लोकांचे शहर म्हणून देगलूरचा लौकिक होता आणि आहे. इथली काळी माती खरोखरीच सोने पिकवते. सधन शेतकरी आणि धनवंत व्यापारी यांनी देगलूरची बाजारपेठ नेहमीच गजबजत ठेवली. लोकसाहित्यातूनही याचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. ' भरल्या ग बाजारात ' असा देगलूरचा गौरवाने केलेला उल्लेख आढळतो. व्यापार म्हटला की भावाचे चढउतार आलेच. याचाही उल्लेख ' आत्तराचंतेल । देगलूरी म्हागायी ॥ ' अशा शब्दांनी होतो. कधी काळी देगलूरला भरजरी वस्त्रेही तयार होत असावीत; कारण एका ओवीत असा उल्लेख येतो-

' मला की ग नेसू वाटं। देगलूरची बाई उदी ॥ '

देगलूरची ' उदी ' नेसण्याची इच्छ करणारी ही स्त्री, म्हणूनच देगलूरच्या बाजारापेठेचे कौतुकाने वर्णन करते.

आख्यायिकांतून आणि लोकसाहित्यातून दिसणारे असे हे देगलूर ! काळ्या कौलारू छपरांची साधी घरे, अरूंद रस्ते आणि त्याहून अरूंद गल्ल्या. अशा थाटात जुने देगलूर अजूनही खडे आहे. पूर्वपरंपरेच्या साक्ष देणाऱ्या वेशीवरल्या दोन कमानी (नुकत्याच त्या पाडून टाकल्या आहेत.) देगलूरचे एक चित्र मनावर उमटवून देत होत्या. गेरूने रंगवलेले ऊंबरठे व मुख्यदारावर गवाक्ष, अशी इथल्या घरांची रचना आहे. गावात लहान, मोठे असे कितीतरी ' कुंटे ' (लहान तळे) होते. आज याच ' कुंटयाच्या ' जागी नव्या इमारती होत आहेत. जुन्या देगलूरचा गेल्या दहापंधरा वर्षात कितीतरी कायापालट झाला आहे. ज्या ठिकाणी एके काळी तळे होते तिथे आज ' शहाजीनगर ' उभे राहिले आहे. आणि ' लोकमन्य' ' विशालनगर ' व ' यशवंतनगर ' या सारख्या नव्या बसाहती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या बदलत्या पार्श्वभूमिवर देगलूरच्या सांस्कृतिक जीवनाचा इतिहास पाहिला म्हणजे देगलूरचे एक वेगळेच चित्र मनापुढे उभे राहते. विशेषत: नाटय आणि संगीत क्षेत्रांत देगलूरने केलेले कार्य खरोखरीच अभिमानास्पद आहे. गुंडामहाराजांचा मठ हे देगलूरच्या धार्मिक कार्यक्रमाचे केंद्रस्थान तर होतेच पण या मठातच श्री. अप्पासाहेब खांडेकरांच्या नाटक कंपानीने नाटकाचप्रयोग केले होते. या नाटकांना लोक ' कंट्री नाटक ' म्हणत असत. मशालींच्या प्रकाशात होणारी ही नाटके देगलूरकरांचे मनोरंजन करीत. त्यानंतर इ. स. १९०४ साली ' गुंडा प्रासादिक नाटक मंडळी ' स्थापन करण्यात आली. ही मंडळी प्रामुख्याने संगीत नाटके करी, संगीत सत्यविजय, संगीत राजा हरिश्चंद्र, संगीत दत्तजन्म, (लेखक : नारायणराव देशपांडे उर्फ सच्चिदानंदस्वामी देगलूरकर) संगीत शारदा अशी कितीतरी नाटके या मंडळीने रंगभूमीवर सादर केली. ' चाळीस लायनी लँप ' च्या प्रकाशात ही नाटके होत. देगलूरच्या देशपांडे गल्लीत ' थेटर ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागी ही नाटके होत असत. श्री लक्ष्मणरावजी खानापूरकर, श्री. गंगाराम सांगवई, श्री. यशवंतराव तात्यासाहेब गुरबाळ ही मंडळी नाटकातील ' पुरूषपार्टी ' म्हणून भूमिका करीत. तर श्री. गंगारामपंत दपतरब्रद, श्री. गोविंदराव चाकूरकर इ. ' स्त्रीपार्टी ' म्हणून काम करीत. या नाटक मंडळीची संपूर्ण व्यवस्था श्री. मारुती मॅनेजर यांचेकडे होती. याशिवाय या क्षेत्रात ' रामसिंग आणि बसलिंगप्पा नाटक मंडळी ' ही आघाडीवर होती. स्वत: रामसिंग हे उत्तम तबला वाजवीत नि ही बसलिंगप्पा हे हार्मोनियम वाजवात. या नाटक मंडळीत काम करणारा नटवर्ग देखील गायकी जाणणारा होता. ' मनोविजय,' सत्यविजय, ' कंसकंदन, ' ' शारदा ' ही नाटके या मंडळीने रंगभूमीवर आणली. श्री. दिगंबरराव सबनीस, श्री नारायराव देगावकर, श्री. नानासाहेब खांडेकर इत्यादी नटवर्ग हा या मंडळीत आघाडीचा गायक नटसंच होता. या शिवाय श्री. व्यंकन्ना शिंपी यांचीही

एक नाटक मंडळी होती. चौधरी बंधू म्हणून ही नाटक मंडळी ओळखली जाते. श्री. यशवंतराव देशपांडे, श्री पिराजी, श्री सायन्ना इत्यादी नाट्यप्रेमी लोकांनी ही मंडळी चालविली होती. या शिवाय देगलूरच्या आसपास खानापूर एकलारा, शहापूर, हाणेगाव आदी भागातही नाटके होते असत. नाटके प्रामुख्याने पौराणिक व ऐतिहासिक असत. क्वचित सामाजिक नाटक असे. विशेषत:संगीत नाटकांवर अधिक भर असे. या सर्व नाटकांना गावातील श्रीमंत, प्रतिष्ठित व्यक्तींचा सक्रिय पाठिंबा असे. पुण्या-मुंबईकडच्या प्रसिद्ध नाटक कंपन्या मात्र इकडे फारशा आल्या नाहीत. स्थानिक लोकांच्या नाट्यप्रेमावरच देगलूरचा ' नाट्यप्रपंच ' वाढत राहिला. याशिवाय गणेशोत्सवानिमित्त लहान मोठी नाटके होत. गेल्या पंधरा- वीस वर्षात मात्र नाट्यक्षेत्रात देगलूरला नाव घेण्यासारखे फारसे काही घडले नाही. मध्यंतरी मात्र येथील मानव्यविकास विद्यालयाच्या शिक्षकांनी भ्रमाचा भोपाळा हे नाटक सादर केले. या नाटकाचे वैशिष्ट्य असे की देगलूरसमध्ये प्रथमच स्त्री-पुरूषांनी एकत्र येऊन नाटक सादर केले. देगलूरच्या इतिहासात ही गोष्ट अपूर्व होती.

नाट्यक्षेत्राप्रमाणेच देगलूरचे संगीतक्षेत्रही नामांकित होते. गायन वादनाचे प्रसंगविशेषी कार्यक्रम होत असत. जाहीर कार्यक्रमापेक्षा या कार्यक्रमाचे स्वरूप खाजगी मैफिलीसारखे असे. या कार्यक्रमात संगीत नाटकातून काम करणारे गायक नट भाग घेत असत. याशिवाय इतरही काही संगीताची जाणकार मंडळी होता. श्री. रामकृष्ण हकीम व श्री. बाळकृष्णबुवा देगलूरकर हे दोघेही गायक व सितार वादक म्हणून प्रतिद्ध होते. श्री नारायणराम देशपांडे ऊर्फ सत्चिदानंद स्वामी हेही सितार व तबला वाजवण्यात कुशल होते. यांनी राग, रागिण्याची माहिती असलेले एक पुस्तक लिहिले आहे. या हस्तलिखिताची प्रत अजूनही अप्रकाशित आहे. यशवंत तात्या, गुरूबाळ, गोविंदराव चाकूरकर व गंगाधरपंत दफ्तरबंद यांनी देगलूरला गायनाच्या मैफिली गाजविल्या आहेत. याशिवाय गुंडामहाराजांच्या घराण्यातील महिपती महाराज हेही उत्तम मृदंग वाजवत असत. बंडामहाराजांचे गायन म्हणजे संगीताची मेजवानीच असे. भावभक्तीने ओथंबलेला अभंग जेव्हा त्यांच्या गळयातून बाहेर पडे तेव्हा मूर्तिमंत नादब्रह्म साकार होई बडामहाराजांची कीर्ती देगलूर पुरतीच सीमित नव्हती तर दूरवर पसरली होती. चुडामणी महाराजांचे वशज श्री रगनाथ बुवा देगलूरकर हे तबला वादक म्हणून आजही प्रसिद्ध अहेत. श्री काशीनाथराव जोशी, श्री रघुनाथराव जोशी, श्री. रामराव नक्लनवीस, श्री. गुंडेराव हकीम, श्री नरसिंग इत्यादींनी संगीत क्षेत्रात नाव घेण्यासारखा लौकिक मिळविला आहे. विशेषत: ' हकीम ' घराणे हे संगीतप्रेमी घराणे म्हणून प्रसिद्ध आहे.

संगीत, नाट्य या दोन्ही क्षेत्रांत एकेकाळी देगलूरचा सधन सृशिक्षित उच्च मध्यम वर्ग आघाडीवर-होता. एकीकडे या क्षेत्रातील रसिकता वाढत होती, तर दुसरीकडे बहुजनांचे मनोरंजन करणारी लोकाभिरूची कलगीतुऱ्याच्या रूपाने वाढत होती. देगलूरला कलगीतुऱ्याचे नामांकित फड होते. त्यापैकी अजूनही काही आहेत. हे फड शिमग्याच्या वेळी उभे राहात. त्यांच्या मिरवणुकाही निघत. त्याला ' डफ सवारी ' असे म्हणत. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या फडवाल्यांना सरकारमधून वर्षासन मिळे आणि सरकारी पातळीवर त्यांचे

कार्यक्रम होते. ह्या फडवाल्यांचे आश्रय दाते म्हणजे देशपांडे-देशमुख घराणे होते. देशपांडे घराणे हे तुऱ्या वाल्यांचे आश्रय दाते तर देशमुख घराणे कलगीवाल्यांचे आश्रय दाते. फडवाल्यात निराळी, भोई व सालेवार या जमातीचे फडकरी होते. लोकसंस्कृतीचे संवर्धन करणारी देगलूरची ही कलगीतुऱ्याची परंपरा अजूनही टिकून आहे. देगलूर शहरच्या आसपासही होट्टल, पाळा, जाहूर, खानापूर, एकलार याठिकाणी कलगीतुऱ्याचे कार्यक्रम होतात. या क्षेत्रातला गंगाराम भोई हा प्रसिद्ध शाहीर होय.

नाटय, संगीत, शाहिरी याबरोबगरच साहित्यिक क्षेत्रातही देगलूरने आपली चमक दाखविली आहे. धुंडामहाराज हे जून्या संत परंपरेचे अभंग रचनाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. नारायणराव उर्फ सत्‌चिदानंद स्वामी यांच्या नावावरही ग्रंथकर्तृत्व आढळते. ' दत्तजन्म ' हे नाटक व ' गुडाख्यान ' हा पद्यमय चरित्रग्रंथ व इतर आध्यात्मिक स्फुट रचना त्यांच्या नावावर आहे. याशिवाय व्यंकटेश आख्यान, देवीअख्यान मल्हारी नाटक चरित्र अशी जुन्या वळणाची रचना त्यांच्या नावावर उपलब्ध आहे. भक्तराजकवी उर्फ बप्पजी देशपांडे यांनीही वेदांतपर स्फुट रचना केली आहे. श्री धुंडामहाराज देगलूरकर यांचे लेखन तर महाराष्ट्राला सुपरिचित आहे. हरिपाठ विवरण, संतवचनामृत हे दोन ग्रंथ म्हणजे संतसारस्वताचे भूषण होत. याशिवाय महाराजांनी मुमुक्ष, प्रसाद, माऊली, ज्ञानमंदिर, जीवन विकास इत्यादी नियतकालिकांतून वेळोवेळी केलेले लेखन निश्चितच अल्लेखनीय आहे.

श्री. राम सुधाकर पाटील गळेगावकर यानीही काही स्फट रचना केली आहे. त्यांचा ' हुतात्मा पानसरे यांचा पोवाडा ' प्रसिद्ध आहे. श्री. शा. ल. देसाई बल्लरकर ॲडव्होकेट यांनीही उर्दू मराठीतून काव्यरचना केली आहे. श्री जब्बार अबी, श्री. काजी तन्वीर, श्री. जोश इत्यादींनी उर्दू काव्यात भर घतली आहे. साहित्यिक जीवनाला पूरक असे वातावरणही देगलूरला एकेकाळी होते ' बाल गोपाल वाचनालय ' हे देगलूर मधील पहिले वाचनालय. या वाचनालयाची स्थापना इ. स. १९२३ साली करण्यात आली. त्यातूनच पुढे ' ज्ञानवर्धक श्रीकृष्ण वाचनालय ' निर्माण झाले. पुढे आणखी ' नगर वाचनालय ' निघाले आणि १९६१ साली ' समर्थ वाचनालय 2 सुरू झाले या शिवाय आज देगलूरमध्ये नगरपालिकेचे सुसज्ज असे नगरपालिका वाचनालय आहे. ' समर्थ वाचनालय ' आणि ' नगरपालिका वाचनालय ' ह्या दोन्ही संस्था देगलूरच्या साहित्यिक वातावरणाला पूरक ठरत आहेत याशिवाय मराठवाडा साहित्य परिषद, बहि:शाल शिक्षण मंडळ, वसंत व्याख्यानमाला अंजुमन तरक्की उर्दू. मराठी तरूण मंडळ या संस्था साहित्यिक वातावरण सतत गतिमान ठेवण्याचा आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. मराठवाडा साहित्य परिषद शाखा देगलूरने मोठया प्रमाणात येथे कै.दे.ल. महाजन यांच्या अध्यक्षते खाली ' देगलूर तालुका कवी संमेलन ' घेतले होते. व याचवेळी महाराष्ट्र कवी यशवंत यांचा भव्य सत्कार करण्यात आला होता. १५ ऑगस्ट, २६ जानेवरी निमित्त देगलूरला मुशायरा व कवी संमेलन आयोजित करण्यात येत असे. पहिल्या महाराष्ट्र दिनी असेच एक भव्य हिंदी, उर्दू, मराठी भाषेचे कवी संमेलन घेण्यात आले होते. साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे देगलूरहून नियतकालिके काढण्याचे प्रयत्न झाले. ' हालात ' (उर्दू साप्ताहिक),

' शब्दगंध ' (संपादक गो. व्यं. मत्सावार), ' कल्हार ' (संपादक, कमलाकर देशपांडे), अशी नियतकालिके छापील स्वरूपात निघाली. हस्तलिखितांची संख्या तर पुष्कळच होती. या कार्यक्रमानिमित्त देगलूरला सोनोपंत दांडेकर, महाराष्ट्रकवी यशवंत, डॉ. नांदापूरकर, डॉ. शं.गो. तुळपुळे, आचार्य अत्रे, अनंत भालेराव, ना. ग गोरे, एस्.एम्. जोशी, डॉ. श्रीधरराव कु ळकर्णी, प्रा. भगवंत देशमुख इत्यादी माहित्यिकांनी भेटी दिल्या.

देगलूरच्या सांस्कृतिक जीवनात येथील आर्यसमाज मंदिराचेही कार्य नजरेत भरण्यासारखे आहे. आर्यसमाजामुळे येथील जनतेत एक प्रकारची जागृती निर्माण झाली. आर्य समाजाच्या व्यासपीठावरून पंडित बन्सीलाल व्यास यांची भाषणे ऐकण्याचा लाभ देगलूरकरांना मिळाला. बहि: शाल केंद्रानेही गेल्या दोन वर्षांत उल्लेखनीय कार्य केले आहे.

देगलूरच्या सांस्कृतिक जीवनाची मुहूर्तमेढ १९०८ साली स्थापन झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाने झाली. सार्वजनिक गणेश मंडळ हेच देगलूरचे पहिले गणेश मंडळ त्यानंतर विद्यार्थी गणेश मंडळ स्थापन झाले. आज देगलूर शहरात लहान मोठी ४० - ५० गणेश मंडळ आहेत. गणेशोत्सवाच्या निमित्ताने व्याख्याने, कीर्तने, रामलीला, प्रहसने नाटके वगैरे कार्यक्रम होतात. काही ठिकाणी अद्यापही तेलगू भाषेतून रामायण गायिले जाते. त्याचे स्वरूप आपल्या ' ललिता ' सारखे असते. हा आंध्र संस्कृतीचा विशेष होय.

सणवार, यात्रा, उत्सव याशिवाय कुठलेही लोकजीवन परिपूर्ण असत नाही. सांस्कृतिक जीवनात अशा कार्यक्रमाचा फार मोठा वाटा असतो. देगलूरला परमेश्वराचे देऊळ हे ग्राम दैवत समजले जाते. गाव म्हसाई ही इथली ग्रामदेवता आहे. देगलूरला प्रामुख्याने पांडूरंग, बालाजी ही लोकांची कुलदैवते आहेत. पोचम्मा देवीची यात्रा मोठया प्रमाणात भरते. बतकम्माचा सणही साजरा केला जातो. बतकम्मा व पोचम्मा ह्या दोन देवता आंध्रसंस्कृतीच्या निदर्शक आहेत. हरि महाराजांचा उत्सव व यात्राही मोठ्या प्रमाणात होते. ह. भ. प. गुंडामहाराजांच्या घराण्यातील खास ' चक्रीभजन ' हे तर वारकरी सांप्रदायचे एक विशेष भूषण ठरले आहे. आंध्र, मद्रास इत्यादी ठिकाणी या भजनाची परंपरा पोहचली आहे. औसा, निजामाबाद या ठिकाणीही या पद्धतीचे भजन अजूनही होत असते. ' सदाशिव, जानकीदास ' ही येथील सर्वात जूनी पेढी, या पेढीवर पूर्वी कलगीतुऱ्याचे कार्यक्रम होत असत कलावताचे आश्रयदाती अशी ही पेढी या भागात नामांकीत होती इस्लामी संस्कृतीचे उत्सवही येथे होत असत. ' जियाउद्दी वलीचा ' उरूस हा या भागातला फार मोठा उरूस समजला जातो. माहरमची यात्राही मोठ्या प्रमाणात भरत असे. हिंदू मुसलमानांची भांडणे न होता दोन्ही संस्कृतीचे इथे संवर्धन होत राहिले. देगलूरला वैदिक विद्वानांची परंपराही फार मोठी होती. काही अग्निहोत्री घराणीही होती. नरहराचार्य, दादा महाराज उर्फ त्र्यंबकसांब, बाळशास्त्री, दत्ता वैद्य, काशीराम, भाऊ जोशी, त्र्यंबक, दीक्षित, बाळंभट ही या क्षेत्रातील प्रसिद्ध मंडळी. या वैदिक परंपरेने देगलूरचे सनातन, धार्मिक जीवन जाज्वल्य ठेवले होते. व्यायामाचे खास शिक्षणही देगलूरला देण्यात येतअसे. समर्थ व्यायाम शोळेने या क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली आहे.

# ५. देगलूरचे धार्मिक जीवन

वै. ह.भ.प. धुंडामहाराज देगलूरकर

एका मर्यादित परिसराचे देगलूर हे बराच काळ सांस्कृतिक केंद्र राहिले आहे. ज्या काहात जाती होत्या पण जातिद्वेष नव्हता, भिन्न भाषा होत्या पण भाषिक हेवेदावे नव्हते, वेगळे धर्म होते पण धार्मिक वैमनस्य नव्हते अशा गेल्या तीस ते शंभर वर्षापूर्वीच्या काळात देगलूरचे सांस्कृतिक वैशिष्टय काही अंशानी का असेना पण ते होते. त्याकाळी सांस्कृतिक वैशिष्ट्य वगैरे गणथटी जाणवत नसाव्यात पण आज मागे वळून त्या काळाकडे पाहिले म्हणजे आजच्या देगलूरमध्ये जे नाही ते जीवन संपन्न करणारे काही तरी त्या काळच्या देगलूरमध्ये होते असे जाणवते. आजचे जीवन, ज्ञानेश्वरीतला शब्द वापरावयाचा झाला तर, 'जित्राफ्ळा' सारखे झाले आहे. सांस्कृतिक चळवळीचा अट्टहासपूर्वक प्रयत्न होत असतानाही सध्याच्या जीवनातील कमतरता जाणवत राहणे हे आज सार्वत्रिक आहे ते काही फक्त देगलूरपुरते मार्यदित नाही. त्या काळी, साधारण चाळीस वर्ष पूर्वी असे वाटत असे की आपण जीवनाच्या नदीत मस्त आनंदाने पोहतो आहोत. पुष्कळदा पाणी थंडही लागत असे पण पोहण्याचा आनंद मिळे. आज त्याच नदीच्या पुरात आपण वेगाने वहात चाललो आहोत असे वाटते आहे. आपणच आपल्या ताब्यात नसल्यासारखे असे वाटण्याची काय कारणे असावीत? हा फार गुंतागुंतीचा प्रश्न आहे, पण एक प्रमुख कारण असे आहे की अन्न, वस्त्र, निवारा यांच्या चरकात मनुष्य आगतिकपणे पुढे ढकलला जातो आहे. या सार्वत्रिक वातावरणाचा परिणाम देगलूरवरही झाल्याशिवाय कसा राहील? पण या प्रवाहप-तितत्वापासूनही माणसाची संस्कृतीच त्याचे रक्षण करू शकेल, नसता अन्नवस्त्राच्या नावाखाली मनुष्य कुठे वहावत जाईल हे सांगता येत नाही. देगलूरलाही अभिमान बाळगण्योग्य संस्कृती आहे. तिचा वारासा आपण यथाशक्य चालविला पाहिजे.

देगलूरचे तेलंगण, मराठवाडा आणि कर्नाटक याच्या सीमारेषावर असलेले भौगोलिक स्थान हे देगलूरच्या विविधरंगी समाजजीवनास मुख्यत: कारणीभूत आहे. त्या त्या प्रांतातील

विशिष्ट संस्कृतीचा ठसा देगलूरच्या सर्व जीवनावर बाहेरून आलेल्या माणसाना जाणवतो. यात पुन्हा हे गाव पूर्वीच्या निजाम हैद्राबाद संस्थानात होते म्हणून मुसलमानी संस्कृतीचा प्रत्ययही येतोच. मराठी, तेलगू, कन्नड व उर्दू या चारही भाषा कामचलाऊ स्वरूपात का असेनात पण बोलणारी माणसे इथे दिसून येतील. या संमिश्र भाषांचा परिणाम देगलूरच्या मराठी भाषेवर मात्र खूपच झाला आहे. त्यामुळे 'तेन फौत झाला' आणि 'मी आटकुल खाल्लो' अशा प्रकारचे प्रयोग देगलूर भोवतालच्या परिसरातच ऐकायला मिळतात. पण याच देगलूरमध्ये अतिशय शुद्ध मराठीमध्ये काव्यरचना करणारी माणसे जुन्या काळीही झाली आहेत हे विशेष. देगलूरचा समाज हा मुख्यत: ब्राह्मण, कोमटी, मराठा, लिंगायत, पद्‌मशाली, भावसार, निराळी, गोलेवार, हरिजन आणि मुसलमान या जातीचा बनलेला आहे. साधारण पंचवीस तीस वर्षापूर्वीचा काळ आठवला तर या सर्व वर्गांच्या पोषाखांत, राहाणीच्या पद्धतीत व भाषेत फरक आढळून येत असे. पण त्यांच्यात आंतरिक एकोपा होता. विशेषत: त्यांच्यात एकमेकांना समजावून घेण्याचा आज दुर्मिळ होत चाललेला गुण दिसून येत असे. त्यांच्यात स्वत:च्या जातीचा अभिमान असे, जातीची बंधने पाळली जात, पण दुसऱ्या जातीच्या केवळ जातीमुळे द्वेष नसे. आज बाह्यत: सर्व जाती एकरूपच दिसत आहेत पणे आजच्या एवढा जातिद्वेष, धर्मद्वेष आमच्या पिढीतील कोणत्याही माणसाला माहिती नाही. देगलूरचा मोहरम त्या काळात फार मोठया प्रमाणात साजरा व्हायचा, पण त्यात उत्साह अधिक असे. हिंदूचा आमच्या घरच्या उत्सवात मुसलमान अधिकारीही आदराने हाजरी देऊन जात असत संघर्ष होत नसत असे नाही पण समजूतदारपणामूळे ते वाढत नसत. जातीपेक्षाही माणसांच्या गुणावगुणाकेडे अधिक लक्ष दिले जाई. आमचे मूळपूरूष श्रीगुंडामहाराज यांनी सत चोखामेळा यांच्याविषयी केलेला एक अभंग उपलब्ध आहे. त्यावरून साधारण शंभर वर्षांपूर्वी देखील जातीच्या संबंधात त्यांचा किती मनमोकळा दृष्टिकोन होता हे दिसून येते. त्या अभंगात शेवटी ते म्हणतात, 'म्हणे गुंडा चोखामेळ्या । तुझ्या घरी वहाव्या मोळ्या ॥'

श्री गुंडामहाराजांच्या आधी काही वर्षे देगलूरचे सांस्कृतिक जीवन श्रीचुडामणीमहाराज या परम साक्षात्कारी संतपुरूषाने व्यापले होते असे दिसते. ते महान योगी आणि भगवद्‌भक्त हाते. नाथ परंपरेतील ते असल्यामुळे योग आणि भक्ती दोन्हीही त्यांना साध्य होती. ज्ञानेश्वरांनी देवनाथ यांना साक्षात्काराने उपदेश केला त्या देवनाथाचे चुडामणी हे शिष्य. मराठीच्या जुन्या वाङ्‌मयात ज्या देवनाथांची भक्तीपर पदे प्रसिद्ध आहेत तेच हे देवनाथ असावेत असा एक तर्क आहे, पण त्याबद्दलची निश्चित माहिती उपलब्ध नाही. श्री चुडामणीमहाराज यांच्याकडे अनेक विद्यार्थी वेद, व्याकरण, पुराणे व संगीत शिकण्यासाठी येत असत. त्यांचेच शिष्य श्री गुंडामहाराज हे होत गुंडामहाराजांनी आपल्या गुरूसंबंधी असे म्हणून ठेवले आहे-

धन्य गुरू चुडामणी । मामासारखी ॥ १ ॥

नाम सोनाबाई बाळा । हाती कथिलाचा वाळा ॥ २ ॥

ऐसा नोहे स्वामी माझ्या । सकळ योगियांचा राजा ॥ ३ ॥

काय उत्तराई त्याला । ज्यानें हाती विठ्ठल दिला ॥ ४ ॥

त्याच्या चरणाचा किंकर । गुंडा सराफाचा पोर ॥ ५ ॥

श्रीचुडामणीमहाराजांनतर देगलूरचे सांस्कृतिक जीवन अत्यंत संपन्न करणारी, सांस्कृतिक दृष्ट्या देगलूरला महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देणारी व्यक्ती म्हणजे श्रीगुंडामहाराज. ते एक साक्षात्कारी व थोर आध्यात्मिक अधिकार असलेले संत होऊन गेले आहेत. त्यांची अभंगरचना अत्यंत प्रासादिक व इतर भागवतधर्मीय संताप्रमाणेच विठ्ठलाच्या भक्तीत रंगलेली आहे. १८५४ साली महाराष्ट्रातील कवींच्या काव्यातील वेच्यांचा एक संग्रह श्री. परशुराम तात्या गोडबोले यांनी ' नवनीत ' या नावाने प्रसिद्ध केला होता, त्यातही श्रीगुंडामहाराजकृत एक पद संग्रहीत करण्यात आले आहे. पांडूरंगाच्या भजनात ते देहभान विसरून नाचत असत. त्यातूनच त्यांच्या प्रसिद्ध चक्र भजनाची निर्मिती आहे. अव्याहत ज्ञानेश्वरी ग्रंथाची त्यांनी उपासना केली. अन्नदान व ज्ञानदानाचे कार्य त्यांच्या हातून सतत होत असे. त्यांचा लौकिकही फार दुरवर पसरलेला होता. हैद्राबादचे तत्कालीन दीवण राजा चंदूलाल व श्रीमंत राजे रायरायना बहादूर हे त्यांचा संप्रदायातील होत. पेशव्यांचे सेनापती सरदार बापू गोखले हे त्यांच्या सांप्रदायिक चक्रीभजनात मागे वीणा घेऊन उभे राहात, अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. त्यांचे सर्वात मोठे कार्य काही असेल तर भागवत धर्माचा प्रसार त्यांनी अगदी नव्या प्रांतात व नव्या लोकात केला. औसा, कुश्तापूर, रेगोडयरपल्ली आदलाबाद तिकोटे (विजापूर), श्री. गोंदे इत्यादी गावी भक्तिभाव, समदृष्टी आणि सदाचारण शिकविणाऱ्या साध्या सरळ भागवत धर्मांची केंद्र त्यांनी स्थापन केली. आजही त्याच्या शिष्यप्रशिष्य परंपरेतील लोक भागवत धर्माचे कार्य तेथे यथाशक्ती करीत आहेत. श्रीगुंडामहाराज यांच्या प्रभावामुळे या भागात व लगतच्या तेलंगणात भागवत धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. त्यांच्यानंतर त्याच्या वंशात श्रीहरीमहाराज, श्री. नारायणमहाराज, श्री महिपतीमहाराज अशी थोर माणसे होऊन गेली. परंपरेने प्राप्त कार्ये त्यांनी वाढविले, त्याबरोबर देगलूरचा लौकिकही. श्रीनारायणमहाराजांची हैद्राबाद येथील त्यांच्या सरदार मंडळीतील शिष्यवर्गाने हत्तीतरून मिरवणूक काढली होती. पौष महिन्यात हरिमहाराजांचा जो मोठा उत्सव सध्या देगलूरला होतो तो यांनीच सुरू केला. त्यांचे तेज, सदाचरण. निष्ठा व तप अलौकिक हाते. त्यांचे कनिष्ठ बधू महिपतिमहाराज यांनी तर देगलूरच्या सांस्कृतिक जीवनात फार मोलाची भर घातली आहे. त्यांचा लोकसंग्रह फार मोठा होता. ते प्रतिवर्षी आषाढात पंढपुरास पायी जात व चातुर्मासात तेथे व राहत. नित्य पांडुरंगाच्या मंदिरात चक्रीभजन, धरी ज्ञानेश्वरी प्रवचन व मोठ्या प्रमाणात अन्नदान त्यांनी आयुष्यभर केले. त्यांच्या चक्रीभजनात लोक अत्यंत रंगून जात. त्यांनीही महाराष्ट्राबाहेर मद्रास व मछलीपट्टण येथे भागवत धर्माची शाखा स्थापन केली. त्यांचे एक विय शिष्य मद्रासचे श्री. कोदडराम अय्यर हे होते. त्यांनी मद्रासच्या ट्रिप्लिकेन भागात पांडूरंगाचे एक मोठे मंदिर बांधून त्या भागात भागवत धर्माच्या प्रसारास प्रारंभ केला.

तसेच आंध्र प्रदेशात मछलीपट्टण जवळ श्रीमहिपतिमहाराजांचे दुसरे शिष्य नरसिंहदास यांनी कीर पंढरपूरम् नावाचे एक गांवच वसविले आहे. श्री. नरसिंहदास यांचे ज्येष्ठ चिरजीव श्री. सत्यनारायण यांनीच ज्ञानेश्वरीचे तेलगू भाषेत भाषांतर करण्यात पुढाकार घेतला होता. ते भाषांतर प्रसिद्ध झाले असून लोकप्रियही झाले आहे. देगलूरचा संबंध या भाषांतराशी फार जवळचा आहे.

जून्या काळी सर्वसामान्य माणसापुढे प्रपंच आणि परमार्थ ही दोनच ध्येये होती. त्यामूळे बहुतेक सत्प्रवृत्त माणसे प्रपंचातून वेळ मिळाला की परमार्थात मन गुंतविण्याचा प्रयत्न करीत. भजन, कीर्तन प्रवचन नामसप्ताह, पुराणे, यज्ञयाग यांतच लोक परमार्थ आणि करमणूक ही दोन्हीही पहात. अर्थात नाटक, तमाशे हे प्रकार नव्हते असे नाही, पण ते गौण समजले जात. नायकिणीचे गाणे तर धार्मिक समारंभात, विवाहत, इतकेच नव्हे तर मुंजीतही होत असे व त्याचे कुणाला काही वाटत नसे. पण देगलूरच्या पृष्टीने त्यावेळी तरी खरे सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे मोठ्या प्रमाणात साजरे होणारे धार्मिक उत्सव.

श्री महिपतिमहाराजांना असे कार्यक्रम प्रचंड प्रमाणात घडवून आणण्याचा फार नाद. जवळ एक पैसाही नसताना अशा कार्यक्रमाच्या अवाढव्य योजना ते आखीत व उत्साहाने पार पाडीत. त्यांच्यासाठी अनेक ठिकाणांहून अनेक लोक एकत्र येत व चार दिवस एका वेगळ्याच सात्विक वातावरणात सगळ्यांचा काळ अत्यंत आनंदात जात असे. चाळीस वर्षापूर्वी देगलूरपासून जवळच असलेल्या रामपूरच्या रामलिंगासमोर फार भव्य प्रमाणात भागवत स्वाहाकार त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. डेरे राहुट्या घालून शेकडो लोकांची राहण्याची व्यवस्था केलेली होती. त्या निर्जन अरण्यालाही एका मोठ्या जत्रेचे स्वरूप आले होते. तसा समारंभ त्यानतर पुन्हा देगलूरच्या पिरसरात झाला नाही. कै. नारायणराव देगावकर यांनी जवळ जवळ संपूर्ण आर्थिक भार आपल्या शिरावर घेतला होता. देगलूरच्या सांस्कृतिक जीवनात खास आठवावा असा तो समारंभ होता. दरवर्षी शिवरात्रीच्या सुमारास रामपुरला होणारा सप्ताहही अनेक वर्षे मोठ्या समारंभाने सोजरा होत असे. सुरूवातीच्या काळात कै. देवराव पाटील राजूरकर या कार्यक्रमाची जबाबदारी सांभाळीत. देगलूरची अनेक माणसे दोन चार दिवस त्या काळात तिथे येऊन राहात असत. तेव्हा तिथे बरेच दाट जंगल होते व वाघांची वस्तीही होती, तरी पण ते सात दिवस फार आनंदात जात. आमच्या घरच्या रामनवमीच्या उत्सवात व हरिमहाराजांच्या उत्सवातही काही चांगले गायक व हरदास हजेरी लावून जात, पण या उत्सवात मुख्य भर असे अन्नदानावर.

साधारणतः चाळीस वर्षापूर्वीच्या काळी देगलूरला अनेक छोटयामोठया हरदासांची व गवयांची रीघ लागलेली असे. मुख्यतः महिपतिमहाराजांच्या प्रेमाखातर कितीतरी त्यांच्या क्षेत्रातील थोर माणसे इथे येत. रंगनाथबुवा निगडीकर, पंढरपूरचे काळभैरव, प्रसिद्ध विनोदी कीर्तनकार विठ्ठलबुवा लातूरकर व ह. भ. प. संतकवी श्रीदासगणूमहाराज यांच्या सारख्या प्रसिद्ध व्यक्ती येथे येऊन गेल्या आहेत. हैद्राबादचे प्रसिद्ध गायक कलाकार लछमनसिंग व

बाबूसिंग, उत्कृष्ट तबलावादक मार्तंडाव, हार्मोनियम वादनात अत्यंत कुशल असलेले विठ्ठलराव व माधवराव न्यालकल ही आपल्या भागतील फार श्रेष्ठ दर्जाची कलाकार मणसे देगलूरला नेहमी येत. त्या काळात देगलूरमध्ये संगीताची आवड असलेले कलाकारही बरेच होते. विशेषत: सतारवादनाची आवड त्याकाळी विशेष होती. श्रीचुडामणीमहाराजांच्या घराण्यांतील बाळकृष्णबुवा, रामकृष्णबुवा वैद्य व त्यांचे बंधू रघुनाथ बुवा व काशीनाथराव इत्यादी व्यक्ती देगलूरमधील संगीत राखून ठेवीत होती. विनायकबुवा नावाचे एक चांगले जाणकार गवई महिपतिमहाराजांनी आपल्याकडे कायमचे वास्तव्यासच ठेवून घेतले होते. त्यामुळे आमच्या घरात आमच्या पिढीला तरी ताल स्वरांचे चांगले ज्ञान झालेले होते. देगलूरने महाराष्ट्राला दिलेली संगीताची सर्वात मोठी देणगी म्हणजे वै. बंडामहाराज. संगीत भजनातील महाराष्ट्रातील त्यांचे स्थान अद्वितीय होते.

देगलूरच्या तत्कालीन संस्कृतिक जीवनात मोलाची भर टाकणारी अजून एक व्यक्ती म्हणजे कै. श्री. नारायणराव देशपांडे तथा स्वामीमहाराज. उत्तरायुष्यात त्यांनी संन्यास घेतल्यानंतर त्यांचे स्वामी महाराज हे नाव रूढ झाले. त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैल होते. ते वेदांताचे चांगले अभ्यासक तर होतेच पण उत्कृष्ट कवी, संगीतज्ज्ञ व नाटककारही होते. देगलूरच्या सांस्कृतिक कार्यक्रमात ते नेहमी पुढाकार घेत असत. देगलूरच्या सांस्कृतिक वातावरणात भर घालणारी व त्याबाबतीत मनापासून झीज सोसणारी त्यावेळची अनेक माणसे आज मला आठवतात. त्याकाळची माणसेच काही विलक्षण होती असे आज वाटते. ही माणसे एखादा गुण एवढया मोठया प्रमाणात घेऊन येत असत की त्यापुढे त्यांच्या लहरी स्वभावाकडे दर्लक्ष होऊन त्यांचे मोठे मनच फक्त मनात भरत असे. रामलिंगम् चित्रावार, देवजी मोतेवार, देवराव पाटील राजूरकर, बाबा व राजाराम पेंडकर, व्यंकटरामण मत्सावार, रामराव तेजराव देशमुख, चांदपाशा देशमुख, अप्पासाहेब खांडेकर, शेषराव देशपांडे, कोंबल बापूराव, नारायणराव देशपांडे देगावकर इत्यादी माणसे देगलूरच्या जीवनात प्राण ओतीत असत.

***

# ६. देगलूरचे शैक्षणिक वातावरण

- प्रा. सत्यनारायण जाजू

देगलूरच्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करीत असताना शैक्षणिक दृष्टया संपूर्ण देगलूर तालुक्यावर ओझरता दृष्टिक्षेप टाकणे अयोग्य होणार - नाही.

देगलूर तालुक्यात १०६ खेडी आहेत व त्यांची लोकसंख्या जवळ जवळ ९०,००० आहे. यातील जवळ जवळ १३६०० लोक साक्षर आहेत. या विभागातील साक्षरतेचे प्रमाण १५ टक्के आहे. या तालुक्यात ८० प्राथमिक शाळा, १२ माध्यमिक शाळा, १० हायस्कूल्स, व एक महाविद्यालय आहे. वरील माहितीवरून या विभागाची शैक्षणिक प्रगती अत्यंत मंद आहे हे दिसून येते. फक्त देगलूर शहराचाच विचार करावयाचा झाल्यास या शहराची लोकसंख्या सुमारे १४,८०० (१९६१ च्या जनगणनेप्रमाणे) व यातील फक्त ४,७५० लोक साक्षर आहेत. येथे तीन बालक मंदिरे, ५ प्राथमिक शाळा, ४ हायस्कूल्स व एक महाविद्यालय आहे. शहर महाराष्ट्र, आंध्र व म्हैसूरच्या सीमेवर वसलेले असल्यामुळे या तिन्ही प्रांतांच्या भाषा व संस्कृतीचा परिणाम येथील लोकांवर दिसून येतो. येथील मराठी भाषा देखील अविकृत राहिली नाही तिच्यावर देखील उर्दू, हिंदी, तेलगू व कानडीचा प्रभाव दिसून येतो.

देगलूरच्या शैक्षणिक इतिहासाचा आरंभ येथील जिल्हा परिषदेच्या विद्यालयापासून होतो या विद्यालयाच्या स्थापनेपूर्वी येथे काही खाजगी शाळा होत्या व तेथे फक्त मोडी व गणित हे दोनच विषय शिकवले जात असत. दैनंदिन जीवनात या दोन विषयांचे ज्ञान पुरेसे असल्याकारणाने लोकांना इतर विषय शिकण्याची आवश्यकताच भासत नसे. जिल्हा परिषद विद्यालयाची स्थापना १९३६ फसलीस झाली. आरंभी या विद्यालयात फक्त सातवीपर्यंतचे वर्ग होते. पुढे याच विद्यालयाचे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले. पूर्वी येथे H.S.C. परीक्षेचे केंद्र नसल्यामुळे येथील विद्यार्थ्यांना परीक्षेकरिता हैद्राबादला जावे लागे. आता S.S.C. चे केंद्र सुरू झाल्याने ही गैरसोय दूर झाली आहे. आज जिल्हा परिषद विद्यालयात ५२५ विद्यार्थी आहेत. २२ अध्यापक असून यातील १० अध्यापक प्रशिक्षित आहेत. पुर्वी या शाळेचे माध्यम

फक्त उर्दू होते. आज उर्दू व मराठी या दोन्ही भाषांमधून शिक्षण दिले जाते विद्यालयात चित्रकला शिक्षणाचेही केंद्र आहे. बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण विभागातून आलेले आहेत. शिक्षणाबरोबरच या विद्यालयात क्रीडा विषयक विशेष शिक्षण दिले जाते. सांस्कृतिक कार्यक्रम, बौद्धिक स्पर्धा, वादविवाद स्पर्धा इत्यादी कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरविले जाते.

कन्या शाळेमुळे मुलींच्या शिक्षणाची उत्तम सोय झाली आहे. या भागात पूर्वी सहशिक्षण लोकप्रिय नसल्या कारणाने हुशार मुलींना घरीच बसावे लागे. येथील शिक्षणप्रेमी नागरिकांच्या प्रयत्नामुळे १९६२ साली कन्याशाळा सुरू करण्यात आली. आज ही शाळा ११ वी पर्यंत शिक्षण देते मुलींची संख्या जवळ ५०० आहे व सारखी वाढत आहे. ३० अध्यापक आहेत प्रशिक्षित अध्यापिका कमी आहेत. अशा परिस्थितीतही कन्याशाळेने S.S.C. चा निकाल ७० टक्के लावला आहे.

'मानव्यविकास विद्यालय' हे शिक्षणक्षेत्रात उत्कर्षाच्या दृष्टीने पाऊल टाकणारे विद्यालय आहे. या विद्यालयाच्या स्थापनेपूर्वी देगलूर शहरात सरकारी हायस्कूल हेच एकमेव हायस्कूल होते. एकमेव हायस्कूल असल्याकारणाने त्यातच विद्यार्थ्यांची गर्दी होत असे. वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन १९५५ साली ही संस्था अस्तित्वात आली. मानव्य विकास विद्यालय म्हणजे मूळच्या नीतिनिकेतन शिक्षणसंस्थेची शाखा होय. आरंभीच्या वर्षी या विद्यालयांच्या विद्यार्थ्यांची संख्या फक्त ३७ होती व ९ अध्यापक होते आज या विद्यालयाची विद्यार्थीसंख्या ७०० आहे व अध्यापक वर्गाची संख्या २४ आहे. यापैकी ११ अध्यापक प्रशिक्षित आहेत.

या विद्यालयात शिक्षणविषयक नवीन प्रयोग नेहमी चालत असतात. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त राष्ट्रभाषेच्या, संस्कृतच्या, गणिताच्या, सामान्यज्ञानाच्या परीक्षांचे वर्ग चालविण्यात येतात. राज्य सरकारतर्फे चालविण्यात येणाऱ्या 'All India English development' परीक्षेकरिता देखील विद्यार्थी तयार करण्यात येतात व विद्यार्थी या परीक्षेत उत्साहाने भाग घेत असतात. विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक व बैध्दिकविकास सर्वांगीण दृष्टीने व्हावा म्हणून विविध खेळ घेण्यात येत. या विद्यालयास N.C.C. प्रशिक्षणाची सोयही उपलब्ध आहे. बौद्धिक स्पर्धा घेण्यात येतात व विधार्थ्यांकडे व्यक्तीगत लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांना विज्ञानाचे प्रयोग करता यावे म्हणून विज्ञान क्लबाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थी वर्ग गायनवादनकलेत निपुण व्हावा म्हणून गायनवादन कलेचे वर्ग या संस्थेतर्फे चालविण्यात येतात. सांस्कृतिक क्षेत्रातही या संस्थेने मोलाची भर घातली आहे. आतापर्यंत या संस्थेने भ्रमाचा भोपळा, साष्टांग नमस्कार, दुरिताचे तिमिर जावो. बाभळगावचे जाहागीरदार या नाटकांचा यशस्वी प्रयोग करून दाखविला आहे. देगलूर - उदगीर रोडवर या संस्थेने इमरतीसाठी जागा घेतली असून इमारतीचे बांधकाम व्यवस्थितपणे सुरु आहे. देगलूरच्या शैक्षणिक विकासात या संस्थेने महत्त्वाचा भाग घेतला आहे. विद्यालयाच्या मानव्य

विकास या नावावरूनच या विद्यालयाचे उद्दिष्ट स्पष्ट होते. हे उद्दिष्ट गाठण्याचा यशस्वी प्रयत्न येथील अध्यापक वर्ग करीत आहे.

' साधना विद्यालय, देगलूर ' हे संत गाडगेबाबा शिक्षण प्रसारक मंडळातर्फे सुरू करण्यात अलेले एक वैशिष्ट्यपूर्ण विद्यालय आहे. या विद्यालयाची स्थापना सन १९६० ला झाली. या ठिकाणी प्रारंभी फक्त माध्यमिक शिक्षणाचीच सोय होती. १९६४ साली या विद्यालयास हायस्कूलचे स्वरूप प्राप्त झाले. सुरवातीस तिन्ही वर्गाची संख्या एकूण ५१ होती. आज येथे ६०० च्या वर विद्यार्थी व विद्यार्थींनी शिक्षण घेत आहेत. या विद्यालयात एकूण १६ शिक्षक आहेत. या विद्यालयाला साधना प्राथमिक विद्यालयाची जोड देण्यात आली आहे. पहिल्या वर्गा पासून ते ११ वी पर्यंत शिक्षण देणारी खाजगी क्षेत्रातील ही एकमेव शाळा आहे. आज विद्यालयापुढे इमारतीचा प्रश्न आहेच. नजीकच्या काळात हे विद्यालय उत्कर्षाच्या दिशेने वाटचाल करील अशी आशा आहे. हे विद्यालय शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सांस्कृतिक, समाजिक व सामुदायिक कार्यातही आस्थेने भाग घेते.

प्राथामिक शाळाशिवाय देगलूरला तीन बालकमंदिरे आहेत. एक स्थानिक महिला मंडळाच्या वतीने चालविले जाते तर दुसरे येथील नगरपालिका चालविते. याशिवाय सिद्धार्थ बालकवाडीही आहेच. या तीनही बालक मंदिरात छोटया बालकांची खुप गर्दी आहे. या बालक मंदिरामधून बालकांना पूर्वप्राथमिक शिक्षण दिले जाते. महिला मंडळ बालक मंदिर व नगरपालिका बालक मंदीर या दोन्हीचेही प्रसंगविशेषी छोट्या छोट्या बालक-बालिकांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येतात. येथील नगरपालिकेने शिक्षण क्षेत्रात केलेली ही आदर्श कामगिरी होय. अपूऱ्या व लहानशा जागेत असलेली ही बालक मंदिरे एखाद्या रम्य परिसरांत सुसज्ज व स्वतंत्र इमारतीत गेली तर बालमनाचा विकास होण्यास अधिक पोषक ठरेल.

या सर्व शैक्षणिक वातावरणाचा विचार करता देगलूरची शैक्षणिक प्रगती अगदीच निराशाजनक नाही. तरीही काही उणिवा आहेतच आज वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे शहरात विद्यार्थाच्या भोजननिवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा किमान ५०० विद्यार्थी राहूशकतील असे वसतीगृह देगलूरला आज हवे आहे. त्याच बरोबर विद्यार्थिनीचेही स्वतंत्र वसतीगृह पाहिजेच शहरात विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सांस्कृतिक समागृहाची नितांत गरज आहे. या शिवाय क्रीडांगण व उद्यान देखील पाहिजेच. विद्यार्थ्यांच्या बुद्धीमत्तेचा कस वाढेल असे उपक्रम नियमित सुरू राहिले पाहिजेत. बालक मंदिर ते महाविद्यालय इथपर्यंत विस्तारलेले देगलूरचे हे शैक्षणिक जीवन समृद्ध करणे आजच्या काळाची गरज आहे.

***

# ७. देगलूरच्या परिसरातील मराठी भाषा

– प्रा. सुग्राम पुल्ले

नांदेड जिल्हयातील देगलूर हा महाराष्ट्र आणि आंध्र यांच्या सीमेवरील मरठी भाषिक असलेला शेवटचा तालुका. येथून अवघ्या दोन मैलावरून आंध्रप्रदेशाची सीमा सुरू होते. देगलूर हे ठिकाण म्हणजे महाराष्ट्राची पूर्वसीमाच होय. निजामी राजवट ही जवळ जवळ संपूर्ण मराठवाड्याला व्यापून होती. त्यामुळे देगलूर हा तालुका मध्यवर्ती ठिकाणासारखा होता आणि व्यापाराच्या दृष्टीने पाहिल्यास देगलूर हे अजुनही तितकेच महत्त्वाचे ठिकाण आहे. निजामी राजवटीत उर्दू ही भाषा प्रभावी असल्याने मराठवाड्यातील बोलीभाषेवर तिचा ठसा अद्यापही जाणवतो. देगलूर हा तेलंगणाला लागून असल्याने उर्दू भाषेबरोबरच तेलगू भाषेचा प्रभाव या परिसरात वावरणाऱ्या बोलीभाषेवर बराच जाणवतो. या प्रभावामुळेव की काय, देगलूर परिसरातील बोलभाषा ही शिष्टमराठी भाषेपेक्षा थोडीसी वेगळी तर जाणवतेच परंतु मराठवाड्यात वावरणाऱ्या बोलभाषेपेक्षाही. ती निश्चितच कांहीशी वेगळी आहे हे आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही. तेलगू भाषचा येथील बोलीभाषेशी घनिष्ठ संबंध आल्याने तिच्या उच्चार प्रक्रियेचा बराचसा परिणाम या भागातील बोलीभाषेवर झालेला आहे. त्यामुळे खेड्यापाड्यांतून बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेचे उच्चार थोडेसे कर्कश व कठोर वाटतात. अलीकडे सुशिक्षितांच्या बोलीवर शिष्ट मराठीचा थोडाबहूत परिणाम झाल्याचा दिसून येतो. परंतु अशिक्षित समाजामधून बोलीभाषेचे स्वरूप शिष्टमराठीभाषेहून बऱ्याचबाबतीत वेगळे आहे. हे दिसून येते. उच्चारप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया, प्रयोगप्रक्रिया, शब्दवैचित्र्य इ. बाबतीत मला जाणवलेल्या काही ठळक वैशिष्ट्यांचा मी खाली निर्देश करीत आहे.

येथील बोलीभाषेचा विशिष्ट हेलामध्ये उच्चार करतात. एकमेकांना जवळून बोलताना किंवा बोलावताना हिंगऽऽ, हंगंऽऽ असा हेल काढून उच्चार करतात. 'ए', 'य' चा वापर करण्याकडे अधिक प्रवृत्ती दिसते. उदा. बाईल-बायल, आई-आये इ. भूतकालीन क्रियापदाच्या अंत्याक्षराला 'या' हा प्रत्यय लावण्याची प्रवृत्ती आढळून येते. उदा. आल्या गेल्या, झाल्या इ.

क्रियापदाचे रूप तिन्ही लिंगांत सारखेच राहते. लिंगाप्रमाणे ते बदलत नाही. स्त्रियांदेखील पुरूषांप्रमाणेच क्रियापदाचा प्रयोग करतात. त्यामुळे स्त्रियांची भाषा ही काही बाबतीत स्त्रीसुलभ वाटत नाही. उदा. मी गेले-आले या ऐवजी मी गेल्या-आल्या, गेलो-आलो आणि येतेजाते या ऐवजी येतो-जातो असा प्रयोग सरसिपणे करताना आढळून येतात.

भूतकाळीन आणि भविष्यकालीन क्रियापदांचा उच्चार साधारणत: क्रियापदांच्या शेवटी ' आ ' ' आव ' हा प्रत्यय लावून करतात. उदा. गेलतॉव, अलतॉव, जातॉव, येतॉव इ. आणखी एक विशेष म्हणजे वर्तमानकालीन सहाय्यक क्रियापदांचा प्रयोग करताना मध्यवर्णलोप करण्याकडे प्रवृती दिसून येते उदा. गेलता, आलता (गेला होता, आला होता), येत नाही-येईना, येना, जात नाही-जाईना, जायना इ. ही प्रक्रिया साधारणपणे उच्चार सुलभीकरणार्थ दिसून येते. परंतु त्यामुळे अर्थप्रक्रियेत कसलाच फरक पडत नाही.

प्रश्नार्थक सर्वनाम ' काय ' च्या ऐवजी ' की ' हा वर्ण वापरून प्रश्नार्थक वाक्य पूर्ण करतात उदा. तुम्ही येता की ?, तुम्ही जाता की ? (काय ?) काही वेळी ' की ' ह्या वर्णाचा शिष्ट मराठी भाषेप्रमाणे हो, ना, सारखा वापर होताना दिसतो. उदा. याकी (या, हो, या ना) जाकी (जा, हो, जा, ना,) प्रथम पुरूषवाचक व द्वितीय पुरूषवाचक अनेकवचनी सर्वनामाचा उच्चार साधारणे ' आम्ही ' च्या ऐवजी हामी, आमी व ' तुम्ही ' च्या ऐवजी तुमी करतात. तृतीय पुरूषवाचक एकवचनी सर्वनाम ' तो ' चा उच्चार अशिष्ट मराठी लोक अजूनही ' त्यो ' असाच करतात.

**शब्दसमूह :** आंबडणे (पोहचणे), वाडकी (वरवा दुधाचा), बंगला (माडी), खडोळ (गढूळ), उंबरवट्टा (उंबरठा), खापर (कवेलू), कठ्ठू (कडू) देशाई किंवा देसाई (श्रीमंत या अर्थी), न्हनागा (लहान), मोळा (खिळा), लाह्या (मुरमुरे), खनाळ (दुष्ट), अडकूल (पोहे), फुटाणे (दाळवा), चाटा (कापड विक्रेता).

वरील शब्द या परिसरातील बोलीभाषेचे स्वतंत्र वैशिष्ट्य सिद्ध करतात.

**वाक्प्रचार :** दिवस कानोडा जाणे (कलणे), नदी येणे (पूर येणे), बेजाबेजा नाचणे (थयथय नाचणे) वाक्प्रचारच्या बाबतीतही ही बोलभाषा समृद्ध आहे.

येथपर्यंत देगलूर परिसरात वावरणाऱ्या बोलीभाषेची काही ठळक वैशिष्टये पाहिली या वैशिष्टयांवरून येथील बोलीभाषा ही शिष्ट मराठीपेक्षा उच्चारप्रक्रिया, शब्दवैचित्र्य, वाक्प्रचार इ. बाबतीत थोडीशी वेगळी आहे हे नक्कीच. हे वेगळेपणच येथील बोलभाषेचे वैशिष्टय आहे. हे वेगळेपण जमेस धरून ही बोलीभाषा मराठवाडयात वावरणाऱ्या बोलीभाषेपेक्षा एकदम वेगळी आहे असे मुळीच नाही. ही मराठवाडयाचीच बोलीभाषा आहे.

***

# ८. मराठी अध्यापनाचे स्वरूप

– प्रा. श्री. विद्याधर कानोले

या तालूक्यातील मरठी अध्यापनाचे स्वरूप बघताना प्रादेशिक वैशिष्टय नजरेआड करून चालणार नाही. समाजात ज्या भिन्न भाषा बोलल्या जातात त्यांचाही मुलांच्या मायबोलीवर परिणाम होत असतो. भिन्न भाषीक लोक एकत्र येतात व त्यांची मुले परस्परात संमिश्र भाषा बोलू लागतात. इतर भाषांच्या परिणामामुळे जी बोलभाषा तयार होते ती लौकिक भाषापेक्षा किती तरी अशुद्ध असते. अध्यापनामध्ये अशा या भाषेचा फार मोठा अडसर असतो. देगलूर तालुक्यात नेमकी हीच परिस्थिती आहे.

देगलूर तालूका हा आंध्र व कर्नाटक यांच्या सीमेवर आहे. नांदेड जिल्हयातील हा सर्वात लहान पण वैशिष्टयपूर्ण असा तालुका आहे. राज्यपुनर्रचनेनंतर या तालुक्यातील बराचसा भाग आंध्र राज्यास जोडला गेला. या तालुक्यातील ' वझ्झर' या गावापासून कर्नाटकाची सरहद्द मैल दोन मैल, तर आंध्राची सरहद्द ५-६ मैलावर आहे. या तालुक्यातील हाणेगांव व वझ्झर टापूतील मराठी भाषा व संस्कृतीवर कानडी छाप जाणवते तर शहापूर भाग हा आंध्राचाच एक भाग वाटतो. आंध्र-कर्नाटकाच्या सीमेवर असणाऱ्या या तालुक्यातील मराठी भाषेवर द्रविड कुलोत्पन्न तेलगू व कानडी भाषेचा परिणाम मोठया प्रमाणात आढळून येतो. मराठी भाषेमध्ये तेलगू व कानडी हेल बेमालूमपणे आले आहेत. विभक्ती प्रत्यय, लिंगभेद प्रयोग वाक्यरचना वाक्प्रचार वगैरे बाबतीत उपरोक्त भाषेचा परिणाम झाला आहे. त्या भाषांचा सखोल अभ्यास असणारा या बाबतीत अधिक चिकित्सकपणे लिहू शकेल. परंतु ढोवळ मानाने या प्रादेशिक वैशिष्टया मुळे विद्यार्थी चुका करतात त्याचे काही नमुने खाली देत आहे.

पुरूष असो किंवा स्त्री असो ' मी काम केलो ' ' मी आंघोळकेलो ' असा वाक्प्रयोग करताना आढळून येतात हा परिणामही तेलगु व कानडी भाषेतील प्रयोगामुळेच झाला असावा असे मला वाटते. मराठी कर्त्याच्या लिंगभेदानुसार क्रियापद बदलते तसा प्रकार इंग्रजीप्रमाणेच तेलगु व कानडी भाषेत नसावा असे वाटते.

| मराठी | तेलगु | कानडी |
|---|---|---|
| पुल्लिंग-मी जातो | नेनु पोता | नानु व्हईता |
| स्त्रीलिंग-मी जातो | नेनु पोता | नानु व्हईता |

या भागातील विद्यार्थ्यात ' ण ' व ' न ' या उच्चारातील फरक लक्षात येत नाही व कित्येक वेळा नाम व सर्वनामास ' न ' जोडून त्याचा शब्दयोगी अव्ययासारखा उपयोग केला जातो.

उदा:- तून जेवलीस का?

तून काम केलीस काय ? इत्यादी.

काही विद्यार्थ्यात एकवचनी कर्त्याचे क्रियापद अनेकवाचनी वापरण्याचीही पद्धत मला आढळून आली.

उदा. तुम्ही गेला का ? ऐवजी तुम्ही गेल्या का ? तसेच आम्ही आलो ऐवजी आम्ही आल्या. तो गेला, तो जेवला, या प्रथमान्त कर्त्याऐवजी त्याने गेला, त्याने जेवला अशी तृतीयान्त कर्त्याची रूपे वापरण्याची प्रथा आढळते.

क्रियापदाच्या प्रयोगाबाबतही इचारले, पुसले, गवसल, असे हेलयुक्त प्रयोग आढळतात. अशा प्रकारची अनेक उदाहरणे दाखविता येतील पण सर्वत्र येथे देणे शक्य नाही. देगलूर तालूक्यातील ग्रामीण भागात विद्यार्थ्यांच्या भाषेतील अशुद्धता प्रादेशिक वैशिष्टयामुळेच आहे. म्हणूनच या तालुक्याती मराठी अध्यापन थोडेसे अवघड आहे.

मराठी अध्यापनात प्रादेशिक वैशिष्याचा अडसर कसा आहे. हे मी स्पष्ट केलेच आहे. अनेक शिक्षकांनी ही बाब नमूद केली आहे. माझ्याकडे या तालुक्यातील निरनिराळया माध्यमिक शाळांतील २५ शिक्षकांच्या व १५ मुख्याध्यपकांच्या प्रश्नावल्या भरून आल्या आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारानेच या तालुक्यातील मराठी अध्यापनाचे प्रचलित चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे १५ पैकी ४ हायस्कुलांमध्येच मराठी विषय विनीत पदवीधर शिकवीत असतात. ७ शाळेतून अविनीत पदवीधर मराठी विषय शिकवितात. व बाकीच्या ४ शाळेतून मॅट्रीक विनीत शिक्षक मराठी शिक्षवितात. मी मुख्याध्यपकांना प्रश्न विचारला होता की, मराठी शिकणाऱ्या तज्ज्ञ शिक्षकाची अडचण भासते का ? १५ पैकी १२ मुख्याध्यापाकांनी अडचण भासते असे उत्तर दिले आहे. मराठी भाषा शिकवणाऱ्या सर्वच पदवीधराना त्या विषयांची आवड असतेच असे नाही. मराठी शिक्षकाचा भाषेकडे नैसर्गिक कल असावा व त्यास त्याची आवडही असावी. त्या विषायाची आवड असणाराच तो विषय परिणामकारकपणे शिकवू शकेल. इतर भाषा भगिनींचा परिचय मराठी शिक्षकास असणे अध्यापनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. हिंदी, इंग्रजी, उर्दू जाणणारे बरेच शिक्षक आहेत. संस्कृत जाणणारे तीन, कानडी जाणणारे तीन व तेलगु जाणणारे दोन असे प्रमाण आहे. केवळ तेलगु, कानडी बोलणारे शिक्षक बरेच आहेत परंतु त्या भाषांचा त्यांना व्यासंग नाही. ग्रामीण भागात

काम करणारे अनेक शिक्षक याच तालुक्यातील आहेत व त्यामुळे साहजिकच त्यांच्या भाषेवरही प्रादेशिक छाप पडली आहे. नित्य सरावामुळे व वातावरणामुळे या शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या भाषेतील चुका लक्षात येत नाहीत असे मला आढळून आले आहे. मराठी शिक्षकांची सर्वसाधारण अशी स्थिती आहे.

शिक्षक निरनिराळया अध्यापन पद्धतींचा अवलंब करतात. अध्यापन ही एक कला आहे व त्याबाबतीत कलाकारास स्वातंत्र्य मिळाल्यास त्यात वावगे काही नाही तरीपण कलेसाठीही तंत्राची आवश्यकता असतेच. ट्रेनिंग कॉलेजातील हर्बार्ट पद्धतीप्रमाणे शिक्षक प्रत्येक पाठ घेऊ शकत नाही. तरीपण सर्वसाधारण शिक्षक प्रश्नोत्तर व चर्चा पद्धतीचा अवलंब करतात असे आढळून आले आहे.

मराठी अध्यापनात निबंध-लेखन व व्याकरण अत्यंत महत्त्वाचे असते. परंतु व्याकरणाच्या बाबतीत सर्वत्रच शिक्षकांना कमालीचा कंटाळा व अनुत्सुकता आहे मुख्याध्यापकांना प्रश्न विचारण्यात आला होता. शिक्षक व्याकरण शिकविण्यास उत्सुक असतात का अनुत्सुक ? १३ मुख्याध्यापकांनी अनुत्सुक असतात असा अभिप्राय दिला आहे. विद्यार्थ्यांकडून काही निबंध-लेखन करून घेतलेले असते; परंतु ते व्यवस्थित तपासले जात नाही व त्यांच्या चुका सुधारून घेतल्या जात नाहीत. व्याकरणाचे अध्यापन जुन्या प्रत्यक्ष पद्धतीनेच केले जाते; त्यामुळे विद्यार्थ्यांतही या विषयाबद्दल अनास्था व अप्रीती वाढतच आहे. मराठी साहित्य महामंडळाच्या नवीन शुद्धलेखनाच्या नियमांची ओळख बहुतांश शिक्षकांना नाही.

मराठी अध्यापनात कोणत्या साहित्य साधनांचा वापर करावाअसा प्रश्न विचारला जातो. अध्यापक स्वत: च एक परिणामकारक असे साधन आहे. त्याच्या शब्दचित्रापुढे इतर चित्रादी साहित्यही फिके पडेल. व्याकरण शिकविताना मात्र तक्त्यांचा उपयोग आवश्यक आहे. अशा प्रकारचे काही तक्ते मला केवळ एक दोन शाळेत बघावयास मिळाले. मराठी अध्यापनात वाचन, लेखन व भाषण या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शिक्षकाचे वाचन विस्तृत हवेच, परंतु विद्यार्थ्यांनाही भरपूर वाचावयास मिळणे आवश्यक आहे. या दृष्टीने बघता या तालूक्यातील अनेक माध्यमिक शाळांमधून पुस्तकांची संख्या अपुरी आहे. जेवढी पुस्तके उपलब्ध आहेत त्यांचाही वापर होत नाही. यासाठी वर्गनिहाय वाचनालयाची आवश्यकता आहे. बऱ्याच शाळांमधून वर्षातून एक वेळेस वर्गवाचनालयासाठी पुस्तके देण्यात येतात. ही पुस्तके विद्यार्थी वाचतात की नाही हे अजमावले जात नाही. १०० ते ५०० पुस्तकांची संख्या असणाऱ्या ४ शाळा आहेत. ५०० ते १००० पुस्तके असणाऱ्या ७ शाळा आहेत. व १००० च्या वर पुस्तके असणाऱ्या ४ शाळा आहेत. या शाळांमधून पुस्तकांची संख्या वाढणे अत्यावश्यक आहे. वाचनाने विद्यार्थ्यांची बुद्धी चौफेर होते व अनुकरणाने तो भाषा अवगत करू शकतो.

विद्यार्थ्यांच्या लेखनशक्तीचा विकास करण्याच्या दृष्टीने वर्गातील निबधलेखनाशिवाय हस्ताक्षर स्पर्धा, हस्तलिखीत मासिक, निबंध-स्पर्धा यासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. शहरातील काही शाळांमधून हस्तलिखीत मासिक माझ्या आवलोकनात आले.

परंतु ग्रामीण भागातील शाळांमधून अशा प्रकारचा कोणताही उपक्रम आढळला नाही. आंतरशालेय क्रीडा- स्पर्धाच्या निमित्ताने हस्ताक्षर-स्पर्धा निबंध स्पर्धा निबंधस्पर्धा वक्तृत्व-स्पर्धा आयोजित केल्या जातात, पण त्यांतही भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या समाधानकारक नाही.

विद्यार्थ्यांना शुद्ध बोलता यावे व उत्तम भाषण करता यावे यासाठी शाळेत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धाचे नियोजित कार्यक्रम घेण्यात आले पाहिजेत. अनेक माध्यमिक शाळांमधून हे कार्यक्रम घेण्यात येतात. परंतु त्यात नियोजन नसते व कार्यक्रम घ्यावयाचे म्हणून घेण्यात येतात. या अभ्यासानुषंगिक कार्यक्रमांचा व अध्यापनाचा काही अन्योन्यसंबंध आहे याची दाखल घेतली नाही भाषाध्यापनाला हे कार्यक्रम पूरक आहे याची दाखल घेतली नाही भाषाध्यापनाला हे कार्यक्रम पूरक आहेत ही दृष्टी समोर ठेवून या कार्यक्रमाची आखणी केली पाहिजे.

देगलूर तालुक्यातील मराठी अध्यापनाची अशी ही परिस्थिती आहे. विद्यार्थी ३०-३५ गुण मिळवून पास होतात परंतु त्यांची भाषा अशुद्धच राहते एस्.एस्.सी. च्या परीक्षेस इतर भागांतील विद्यार्थीबरोबरच येथील विद्यार्थ्यांचे पेपर तपसले जातात. प्रादेशिक वैशिष्ट्यामुळे त्यांच्या भाषेतील अशुद्धतेचा विचार तेथे कोणी करीत नाही. साहजिकच या विषयात त्याला कमी गुण पडतात. महाविद्यालयात भाषा सुधारण्यास अवसर मिळत नाही. तेथिल प्राथमिक शिक्षकांच्याकडे दोष लावून मोकळे होतात. माध्यमिक शिक्षण हे महाविद्यालयीन शिक्षणाचा पाया आहे. तो मजबुत झाला पाहिजे तरच इमारत पायवर उभी राहू शकेल.

***

# ९. स्वातंत्र्य लढयातील ' देगलूर '

– प्रा. गोविंद गोपछडे

देगलूर भाग पूर्वी मोगलाईतला ! निजामी अंमलातला, हैद्राबाद रियासतीतला ! स्वातंत्र्यापूर्वीची देगलूरच्या सामाजिक परिस्थितीचा विभागणी ढोबळमानाने दोन वर्गात करता येईल. जमीनदार, वतनदार, वकील आणि व्यापाऱ्याचा वरिष्ठ वर्ग ! शेतकरी आणि मजुरांचा कनिष्ठ वर्ग ! वरिष्ठ वर्गाविषयी कनिष्ठ वर्गाच्या मनात आदर निष्ठा होती. जमीनदार आणि वतनदारांच्या मनात इंग्रजीविषय चीड ! पण निजाम घराण्याविषयी आदर आणि निष्ठा असल्याचेच दिसून येते. कारण चोपडया आणि सनदा निजामाकडून बहाल झालेल्या होत्या. स्वामीनिष्ठेबरोबरच स्वत्वाची जोपासना करणे हा जिवंतपणा होय. पारतंत्र्यातील देगलूरची आर्थिक परिस्थिती बरी असल्याचेच आढळून येते. त्यामुळे वर्गभेद वाढून संघर्षाला किंवा चळवळीला पोषक असे वातावरण निर्माण झाले नाही. महत्त्वाचे देगलूर म्हणजे हे आडमार्गावरील गाव ! निजामाची राजधानी हैद्राबादशीच काय ते संबंध ! पंढरपूर व्यतिरिक्त महाराष्ट्रातील इतर पुढारलेल्या आणि जागरूक शहरांचा फारसा संबंध नसल्याचेही दिसून येते. इत्यादी कारणामुळे कदाचित देगलूरमधील स्वातंत्र्य चळवळीला फारशी धार आलेली नसेल ! पण " गाव जळे हनुमान बाहेर " अशीही परिस्थिती नव्हती. ह्या पंचक्रोशीतील स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य गाव असाच देगलूरचा उल्लेख करावा लागेल.

ज्या गोष्टीच्या प्रभावामुळे चळवळीला जोर चढला, प्रेरणा मिळाली लोक जागृती झाली त्यात गणेशोत्सवाचा प्रामुख्याने निर्देश करावा लागतो. स्वातंत्र्य चळवळ लोकांपर्यंत नेऊन पोहचणाऱ्या आणि त्याच्यात संघटना निर्माण करणाऱ्या प्रमुख साधनांवर (सभा, संमेलन, संघटना, वर्तमानपत्र इत्यादीवर) सरकारतर्फे बंदी घालण्यात आली. स्वातंत्र्यप्रिय व्यक्तीत निसर्गतः कृत्रिम बंधने तोडण्याचे सामर्थ्य असते. इच्छा तेथे मार्ग असतोच ह्यातून मार्ग काढण्यासाठी काँग्रेसमधील जहाल गटाचे नेतृत्व करणाऱ्या युगकर्त्या लोकमान्यांनी धार्मिक स्वातंत्र्याचा आधार घेऊन स्वातंत्र्य धर्माची जोपासना आणि प्रसार करण्यासाठी १९०१

मध्ये प्रथमत: पुण्यात सार्वजनिक गणेशाची स्थापना केली. बरोबरच आठ वर्षानंतर म्हणजे १९०८ मध्ये (फसली) देगलूरलाही सार्वजनिक गणपतीची स्थापना करण्यात आली आणि अद्यापही चालू आहे. हा स्तुत्य उपक्रम करण्यात देगलूरच्या वकील आणि वतनदार मडळींनी प्रामुख्यानी पुढाकार घेतला कारण त्यावेळीही थोडोशी जाणीव असलेला आणि इतरांपेक्षा बाहेरच्या जगाशी अधूनमधून संपर्क ठेवणारा वर्ग होता.

गणपती स्थापनेची प्रेरणा देगलूरपर्यंत कशी येऊन पोहचली हा एक वादाचा प्रश्न आहे. कारण विसाव्या शतकाच्या सुरूवातीला सध्या सारख्या दळवळणाच्या सोई उपलब्ध नव्हत्या. आतासारख्या वर्तमानपत्राचाही सुकाळ नव्हता. निजामी सल्तनतीत ' केसरी ' सारखे ' अखबार ' कुणी लपून आणल्यास तो देगलूरकरांचा पर्वणीचाच दिवस आणि असा दिवस क्वचितच उगवत असे तेही लपवून वाचावे लागे. सरकार तर सोडाच पण हिंदू समाजातील जुन्या पिढीचा वर्तमानपत्र वाचण्याला कडवा विरोध होता, तरी पण स्वातंत्र्याला आसुसलेली तरूण पिढी या विरूधची क्षिती बाळगायची नाही.

१८८८ (१२९ फसली) मध्ये ' जिल्हेबंदी ' करून देगलूरचा भाग बिदर जिलह्यातून नांदेड जिलह्यात सामील करण्यात आला म्हणून कोर्टाच्या कामानिमित्त नांदेडशी संबंध आला आणि याच सुमारास (१३० फ. मनमाड हैद्राबाद रेल्वेमार्ग सुरू झाला.)

विशेष म्हणजे देगलूरच्या वायव्येस अंदाजे तीस मैलावर असलेल्याकुबेर (बासर जवळ सध्या आंध्रात) या गावी खापर्डे घराण्यातील लग्नसमारंभात लोकमान्य टिळक आल्याचे निश्चित सांगितले जाते. कुबेर या गावाशी तेव्हाही आणि आजही देगलूरचे सोयरसंबंध आहेत.

दळणवळणाची साधने विपूल प्रमाणात उपलब्ध होण्यापूर्वी देगलूर आणि महाराष्ट्रातील इतर शहरांशी संपर्क साधणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे जवळ जवळ दिडशे वर्षापासून नियमितपणे पंढरपूरला पायी जाणारी ह. भ. प. धुंडा महाराजांची दिंडी. ही दिंडी दरवर्षी पंढरपूरला जाते. पंढरपूर हे भाविकांचे महाराष्ट्रातील पवित्र तीर्थस्थान. आध्यात्मिक आणि राष्ट्रीय संताचा मेळावा भरण्याचे ठिकाण लोकजागृतीचे माध्यम.

गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाची मोहीम टिळकांनी सुरू केली आणि ती प्रेरणा देगलूरपर्यंत कशी येऊन पोहचली याचे अनेक अंदाज बांधता येतात. छापखाने-वर्तमानपत्राइतकीच लोकजागृतीची टपालखात्याची कामगिरी नाकारता येत नाही. १९०८ मध्ये झालेली गणपतीची स्थापना नंतर जवळ जवळ चोवीस वर्षे म्हणजे १९३२ पर्यंत देगलूरसारख्या गावीही बंद पाडण्यात आली हे ही लक्ष्यात घेण्यासारखे आहे. सरकारच्या मनात काही शंकाकुशंका किंवा जुजबी तपासणी सोडल्यास गणेशोत्सवातील अकरा दिवसांचे सांस्कृतिक कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. पण शेवटच्या दिवशी मात्र अनपेक्षित अभद्र घडले. देगाव वेशीजवळ गणपतीचा रथ आला असता अंधाराचा फायदा घेऊन जुलूसावर हमला झाला. मशिदीतून

दगडांचा मारा सुरू झाला. हे सगळे अनपेक्षितच घडले म्हणून गोंधळ उडणे साहजिकच आहे. त्यामुळे पुढचे लोक पुढच आणि गणपतीचा रथ मात्र मागे परत आणावा लागला. त्यानंतर १९५३ मध्ये पुनरूस्थापना करण्यांत आली. कारण त्यावेळेस ' बॉंबेहुकुमान्वये ' महजबी व कौमी आजादी हिंदूंना देण्यात आली होती, ती फक्त कागदावर. नांदेड जिल्हयाचे पोलीस प्रमुख श्री. दौवलतराव मोहतमीमांनी देगलूर येथे हिंदू-मुसलमानांची बैठक घेऊन मशिदी वगळून गणपतीची स्थापना होत आहे आणि त्याबरोबरच दुपारीच गणपतीची मिरवणूक काढण्याची प्रथा पडली आहे. गणेशोत्वाच्या कार्याक्रमानिमित्त श्री. विनायकरावजीनी वेळोवळी भेट देऊन स्वातंत्र्य चळवळीची बीजे पेरली.

मुस्लिम आबादी असलेल्या आणि निजामी रियासतीत हैद्राबादशी संबंध असलेल्या देगलूरात रझाकार असणे साहजिकच आहे. पण इतर विकाणच्या मानाने फारसे हिंदू-मूस्लिम दंगे किंवा लूटमार, जाळपोळ असे प्रकार रझाकारी काळात किंवा पोलीस ॲक्शनच्या वेळेसही झाले नाहीत. शहीद पेंटय्या पेंडकूरवारच्या खुनाचा संबंध रझाकार चळवळीशी लावला जातो. रात्री दुकानांचे संरक्षण करण्यासाठी व्यापारी मंडळीने स्थापन केलेल्या रक्षक दलाचे नेतृत्व हुतात्मा पेंटाजीकडे होते. म्हणून त्याच्यावर भरबाजारात गोळी घालण्यात आली. पण प्रचलित राजवटीने या खुनाचा संबंध वैयक्तिक शत्रुत्वाशी लावला. असे एकदोन प्रसंग सोडल्यास हिंदू-मुसलमानात सख्य असल्याचेच बोलले जाते. पण प्रतिष्ठित खानदानी घराण्यातील व्यक्तीने रझाकाराची दीक्षा घेतल्याबद्दल खेद व्यक्त केला जातो. कदाचित देगलूरच्या वरिष्ठ वतनदार वर्गात काही मुसलमान वतनदार असल्यामुळे हे घडले असावे.

१९३७ मध्ये (दो अवन १९४७ फसली) H.E.H. निझामी सलतनने अहकाम मुमानियत (बंदी हुकुम) काढून हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस बेकायदा ठरविली, आणि महाराष्ट्र परिषदेच्या १९४५ मधील उमरी येथील सभेनंतर देगलूरच्या राजकीय चळवळीने मूळ धरले. आणि १९४७ ते १९४८ या काळात चळवळीला अधिक धार चढली. हा काळ म्हणजे कसोटीचा काळ, निर्णायक काळ ! आंध्र आणि कर्नाटक परिषदेच्या धर्तीवरच स्वतंत्र हैद्राबादाचे शिल्पकार पू. स्वामीजीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली. पण या परिषदेचे स्वरूप राजकीय होते. १९३७ मध्ये स्व. श्री गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली परतूर परिषदेची पहिली सभा झाली. आणि १९३८ मध्ये लातूर येथे ऐतिहासिक सभा झाली या परिषदाने निजामी सलतनतने स्टेट कॉंग्रसवर घातलेल्या बंदीचा निषेध करून बंदी उठविण्याची सरकारला ताकीद दिली. निजामी राजवटीला विरोध करण्याचे धोरण आखण्यात आले. ही परिषद प्रति स्टेट कॉंग्रेसच होती असे म्हणायला काही हरकत नाही. ह्या परिषदेने स्टेट कॉंग्रेसचे कार्य हाती घेतले. आणि कॉंग्रेसमधील कार्यकर्त्यांनीच ही परिषद स्थापन केली होती. याच वेळेस ' रियासत हैद्राबादमध्ये ' ' निजामी सलतनत ' विरूद्ध ' महाराष्ट्र परिषद, ' ' हिंदू सिव्हिल लिबर्टीज, ' ' आर्यसमाज ' या तिन्ही संघटनांनी एकाच वेळेस सत्याग्रह सुरू केला.

१९४५ च्या सुमारास श्री. काशीनाथराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली उमरी येथे भरलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या सभेला देगलूरहून श्री हणमंतराव पाटील, राजूरकर, पोशट्टी उनग्रतवार, तुकाराम पाटील देगावकर स्व. डी. किशनराव, स्व. श्री. संगवई, श्री गोपाळरावजी, श्री बालाप्रसादजी इत्यादी स्वातंत्र्य सैनिकांनी देगलूरचे प्रतितिधित्व केले. विशेष म्हणजे या परिषदेच्या आठ दिवस अगोदरच रझाकारांच्या अत्याचाराचा बळी हुतात्मा पानसरे. महाराष्ट्र परिषदेचा आदेश आणि थोर नेत्यांचा आशीर्वाद घेऊन आल्यानंतर देगलूरलाही महाराष्ट्र परिषदेची शाखा स्थापन करण्यात आली आणि त्यानंतर देगलूरच्या स्वातंत्र्य चळवळीला एक वेगळे स्वरूप आणि आकार आला. योग्य दिशा आणि गती मिळाली. भारताला स्वातंत्र्य मिळण्याआधी एक आठवडा म्हणजे ७ ऑगस्ट १९४७ रोजी महाराष्ट्र परिषदेने भारतीय संघराज्यात विलीनीकरण (Join Indian union diy) दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला आणि परिषदेच्या आदेशानुसार देगलूर शाखेनेही हा दिवस साजरा करण्याचे ठरविले. राष्ट्रीय ध्वजासह मिरवणूक काढण्यासाठी श्री. सय्याजी सायन्ना चोपावार, श्री. बाबू राजेन्न, श्री. गंगाराम चिमन्नाजी वरटी, सायन्ना मष्णाजी गोलेवार, श्री. मौलाना टाकळीकर या पांच स्वयसेवकाची तुकडी तयार करण्यात आली. ' मुतहैदा इन्जमात रियासतची मागणी असफजाही दस्तूरच्या खिलाफ होती.' म्हणून ' इन्तजामे सलतनतमे मदाखलत ' आणि ' खतरे आमन ' हे दोन गुन्हे लादून सत्याग्रहींना कैद करण्यात आले. देगलूरच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील हा पहिला सत्यग्रह होय. देगलूरच्या ह्या स्वयंसेवकांनी मिळविला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वतंत्र्य मिळाले. ऐतिहासिक परंपरा असलेली जवळ जवळ ५१६ लहान मोठी संस्थाने १९४८ ला खालसा करण्यात आली. नव्या भारतीय प्रजासत्ताकाचे ऐक्य टिकविण्यासाठी अनेक लहान मोठी जुनी देशी राज्ये जपून ठेवण्यापेक्षा, एक मोठे संघटित प्रजासत्ताक उभे करणे केव्हाही चांगले. याच देशहिताच्या कल्पनेपुढे मान लववून आमच्या राजे राजवायांनी विलिनीकरणाच्या करारावर सह्या केल्या. पण रियासते हैद्राबादातील जनता अद्याप निजामी सलतनताच्या अमलाखालीच होती. इतर बरोबरीच्या संस्थनिकांप्रमाणे देशहितांच्या विचारांना निजाम प्रभावित झाला नव्हता. इंग्रजांच्या फुसीनुसार अन्य मार्गाच्या आडरानात शिरण्याचा मोह त्याने धरला. म्हणून महाराष्ट्र परिषदेला लढा चालू ठेवणे भाग पडले. निजाम राजवटीचे प्रभुत्व अमान्य करण्यासाठी २-९-१९४७ रोजी महाराष्ट्र परिषदेच्या देगलूर शाखेच्या ' गणेश मंदिरात ' जाहीररीत्या राष्ट्रीयध्वज-वंदनाचा कार्यक्रम पार पाडला.

' युनियन जॅक ' उभारून परचमे आसिफजाहीची ' तोहीन ' आणि हुकूमत व वतनकी वगावत केल्याचा आरोप लावून ताजीरात आसिफाजाही ऐलान ४४ मधील दफे ३७ बतालूख ३३ (अ) खाली स्वातंत्र्य सैनिक श्री. पोशेट्टी उनग्रतवार, श्री. बाबूराव नाईक. श्री. सुंदर गुंडाजी महेंद्रकर, श्री दिगांबर चौधरी, स्व. श्री व्यंकटी भरडे, स्व. श्री. बळीराम दमय्या चिद्रावार, स्व. श्री. गोविंदराव रामचंद्र कोळी व श्री. मारूती पाटील टाकळीकर यांना ' मुलजीम ' ठरवून एक साल सक्त मजुरी आणि बारा जरब फी खस ताजीयाना (प्रत्येकी बारा फटक्याची) सजा

फरमावण्यात आली. हा देगलूरचा दुसरा सत्याग्रह आणि कैद झालेली दुसरी तुकडी.

यानंतर देगलूर येथील स्वातंत्र्य आंदोलन चालू ठेवण्यासाठी श्री. बाबूराव मास्तर, श्री. किशनराव कोलंबीकर, श्री. शंकरप्पा एकलारे श्री. हणमंतराव पाटील राजूरकर, श्री. विठ्ठल दत्तात्रय महेंद्रकर, श्री. गोपालरावजी मुजळगेकर या भूमिगत कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र परिषदेचे कार्य हाती घेतले.

स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यासाठी रौलट ॲक्टसारखे कायदे इंग्रजांनी केले. तरीही, ही चळवळ जास्तच उफाळून आल्याची साक्षस्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासावरून पटते ! स्वातंत्र्याच्या वेडाने भारलेला सैनिक कैद, गोळीबारा, फटक्यांनी हदरणारा नसतो, हे देगलूरानेही पटवून दिले. पहिल्या दोन सत्याग्रहींच्या तुकडयांना कैद केल्याचा अनुभव जमेस असताना हैद्राबादेतच शर्मा बिल्डिंगमध्ये पू. स्वामीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या गुप्त बैठकीला देगलूरनेही प्रतिनिधित्व केले या संयशावरून वकील मंडळीपैकी स्व. श्री. दत्तात्रयराव संगवई, स्व. श्री. डी. किशनराव, श्री गोविंदराव येवतीकर, शेषाद्री जोशी इत्यादींना चौदा महिने औरंगाबादेत कारावास भोगावा लागला.

' महराष्ट्र परिषदेच्या ' स्थापनेच्या एक वर्ष अगोदर काँग्रेसशी हातमिळवणी न करणारी पण निजामी राजवटीला विरोध करणारी ' हिंदू सिव्हिल लिबर्टीज' ही संघटना हैद्राबादला १९३६ च्या सुमारास अस्तित्वात आली होती. या संघटनेच्या नावांत ' हिंदू ' हा शब्द असल्यामुळे मुसलमान विरूधी असेल अशी शंका येणे साहजिकच आहे. ही संघटना मुसलमानाविरूधी नसली तरी मुसलमानांना ह्या संघटनेत स्थान नव्हते. जाणून बुजून त्याना वगळण्यात आले होते. कारण मुसलमानाइतकेच हिंदूना स्वातंत्र्य व सवलती मिळवून देणे हे या संघटनेचे ध्येय ! या संघटनेच्या संस्थापकापैकी देगलूरचे वकील श्री. शा. ल. देशाई बल्लरकर हे एक होत. या संघटनेच्या ध्येयपूर्तीचा मार्ग म्हणजेच गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग ! या संघटनेच्या सत्याग्रहींच्या तिसऱ्या तुकडीचे नेतृत्व शा. ल. नी. केल्यामुळे सिटी-मॅजिस्ट्रेट हैद्रबाद ह्यानी दफा १६० प्रमाणे ४ नोव्हेंबर १९६६ ला ६ महिन्याची शिक्षा ठोठावली.

आर्य समाजाचा उल्लेख केल्याशिवाय ' जंगे अझादी ' हैद्राबादाचा इतिहास पुर्ण होत नाही. तसे पाहता आर्य समाज ही सामाजिक संघटना. हिंदू धर्मातील कर्मकांडाचा फोलपणा दाखविणे आणि थोतांड माजविणाऱ्याचे पितळ उघडे करून हिंदू धर्मांचे पुनरूज्जीवन करणे हे आर्यं समाजाचे कार्य. पण हैद्राबाद प्रांतात इतर संघटनेच्या बरोबरीने या संघटनेनेही मोलाची राजकीय कामगिरी बजावली आहे. देगलूरला आर्यसमाज मंदिराची स्थापना १९५० ला झालेली असली तरी ही संघटना साधारणत: १९३७ पासून कार्य करीत आहे. स्वातंत्र्यापूर्वी पंडित नरेंद्रजी, बन्सीलाल व्यास, रामचंद्रजी देहलवी ह्या प्रभावी जहाल आर्यसमाजी कार्यकर्त्यांनी प्रचारार्थ देगलूरला भेट दिल्यामुळे तरूण पिढी आर्य समाजाकडे आकर्षित झाली. देगलूरला झालेल्या दोन्ही सत्याग्रहात बहुतांशी सत्याग्रही आर्यसमाजीच आहेत. आर्य समाजाचे उद्दिष्ट आणि तत्त्वे येथील वतनदार आणि वरिष्ठ वर्गाला मान्य नसलीतरी

स्वात्र्यांचा पुरस्कार करणारी आणि निजामी हुकुमतीला कडवा विरोध करणारी संघटना म्हणून या संघटनेच्या कार्याला त्यावेळच्या वरिष्ठ वर्गातील मंडळीनी पाठिबा दिला.

इंग्रजांच्या गुरुमंत्रानुसार निजामाने हिंदूच्या गळचेपीचे, ' जंगे अजादी ' ची चळवळ दडपून टाकल्याचे आणि त्याबरोबरच नागरी आणि राजकीय स्वातंत्र्य दिल्याचा देखावा असे दुहेरी धोरण आखले.' रियासते हैद्राबादेतील ' ' आसिफजाहा सलतनतच्या ' सार्वभौमत्वाला मोगलाईतील आमजनतेचा पाठिंबा आहे म्हणून सार्वभौम प्रजासत्ताक संघराज्यात सामील होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही हे सिद्ध करण्यासाठी ' मुजलिसे मुकनन्ना ' (विधिमंडळ) चा चुनाव घेण्यात आला. पण आतासारखा मतदानाचा हक्क विस्तृत करण्यात आलेला नव्हता. २५ रू. पेक्षा जास्त इन्कम-टॅक्स आणि ५० रू. पेक्षा जास्त महसूल असणारांना मतदानाचा हक्क होता. विशेष म्हणजे विधिमंडळातील १३२ पैकी ५७ नामजाद आणि उरलेले वरील मतदारांतर्फे निवडले जात. या विधिमडळाचे स्वरूप लोकशाही नव्हते. ह्या निवडणुकीच्या प्रश्नावरून येथील वकील आणि वतनदार मंडळीत, कॉंग्रस मधील जहाल आणि मवाळ गटाच्या धर्तीवरच दोन गट पडले. कारण मतदानाचा हक्क फक्त ह्यांनाच होता. सर्वसामन्य जनतेसाठी ही निवडणूक नव्हती. अनुकूल गटाच्या मते या निवडणूकीत भाग घ्यावा, सरकारात राहूनच विरोध करावा असे होते. पण हे दाखवयाचे दात असल्याचे बोलले जाते. प्रतिकूल गटाच्या मते निवडणुकीवर बहिष्कार टाकावा, कारण त्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. विरोधी उमेदवार उभे करण्याची मूभाअसती तर या विरोधाला मूर्त स्वरूप आले असते. आणि निजामाचेही पितळ उघडे पडले असते.

१७ सप्टेंबर १९४८ ला महाराष्ट्र परिषदेचे स्वप्न साकार झाले. स्वतंत्र हैद्राबाद प्रांताच्या कल्पनेला मूर्त स्वरूप आले. मोगलाई स्वतंत्र झाली. इतराबरोबर देगलूरच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कष्टाचे आणि त्यागाचे सार्थक झाले. १९४८ चा निर्णायक लढा संपला. स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री, संस्थानिकांच्या सामिलीकरणाचे सूत्रधार पोलादी पुरूष स्व. श्री. वल्लभभाई पटेलांच्या आदेशानुसार सेवानिवृत्त हुकमी एक्का माजी जनरल चौधरींच्या नेतृत्वाखाली (सध्याचे कॅंनडातील भारतीय वकील) १२ सप्टेंबर १९४८ ला रियासते हैद्राबादवर मिलिटरी कारवाई करण्यात आली. आणि अवध्या पाच दिवसातच निजामाच्या बाजार बणग्या रझाकरांनी आणि सैन्यांने शरणागती पत्कारली. ' निजामी सल्तनत ' बुडाली ' परचमे आसिफजाहीच्या ' जागी तिरंगा फडकला. आणि हैद्राबाद रियासतचे विलीनीकरन " भारतीय प्रजासत्ताक संघराज्यात " झाले.

***

# १०. देगलूर तालुक्याची औद्योगिक विकासक्षमता

- प्रा. रामचंद्र घोंगडे

आपण आपल्या भारतात कार्यान्वित झालेल्या पंचवार्षिक योजना पाहात आहोत. संपूर्ण भारताचा शेतीविषयक व औद्योगिक कायापालट व्हावा, भारत सर्वबाबतीत अग्रगण्य असलेल्या राष्ट्राच्या बरोबरीचे राष्ट्र व्हावे, आपण भारत्तीयानी सर्व बाबतीत स्वयंपूर्ण व्हावे या व अशाच अद्देशातून पंचवार्षिक योजनांना आकार मिळत गेला, मिळत आहे.

भारताचा विकास म्हणजे भारतातील सर्व प्रांतांचा विकास, प्रत्येक प्रांतातील प्रत्येक जिल्हयाचा विकास, प्रत्येक जिल्ह्यातील हरएक तालूक्याचा व त्यात समाविष्ट झालेल्या खेड्यापाड्यांचा विकास-सर्वांगीण विकास भारतातील कोन्याकोपऱ्यातील सर्वच गावे आणि खेडी जर शेतकीदृष्टया, औद्योगिकदृष्टया व आर्थिकदृष्टया स्वत: चा विकास करू शकतील तरच सबंध भारताचा विकास झाला असे म्हणता येईल. आणि भारताच्या विकासाचे स्वप्न साकार होईल. भारतातील एकच प्रांत खूपच सुधारला, पुढारला आणि बाकीचे प्रांत यात मागे राहिले तर भारताचा विकास झाला असे म्हणता येणार नाही.

या द्दष्टिकोणातून देगलूर तालूका हा विकासोत्सुक भारताचा एक छोटासा भाग आहे. या तालुक्याने जर आपला सर्वांगीण विकास केला आणि इतर तत्सम भागाप्रमाणे स्वत: चा विकासातून भारतांच्या विकासास हातभार लावला तर भारत विकासाचे भारताच्या स्वंय पूर्णतेचे, भारतात पुनश्च सुवर्णयुग अवतर विण्याचे स्वप्न साकार झालेले पाहण्यास फारसा अवधी लागू नये !

हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आपण देगलूर गाव व देगलूर तालुका याच्या औद्योगिक विकासक्षमतेचा विचार करू. एकाद्या तालुक्याची औद्योगिक विकासक्षमता म्हणजे त्या तालुक्यातील नियमित येणारी पिके. काही सुधारणा केल्या असता संभाव्य व्यापारी पिके, त्या विभागास कच्च्य मालाचा पुरवठा आसपासच्या भागातूत होण्याची संभाव्यता आणि , त्या

विभागास कच्या मालाचा पुरवठा आसपासच्या भागातून होण्याची संभाव्यता आणि त्या तालुक्याच्या आसमंतात उपलब्ध असणारे खनिज द्रव्य व नैसर्गिक कच्चा माल या सगळ्यांचा विचार करून त्या तालुक्यात ह्या सगळ्या उत्पदनाचा कच्चा माल म्हणून उपयोग करून त्यावर चालणारे उद्योगाधंदे वाढवून गिरण्या सुरू करून व गिरण्यांचा विस्तार करून या उपलब्ध कच्च्या मालाचे पक्या मालात रूपांतर करण्याची संभाव्यता. तेव्हा या गावात व तालुक्यात नवीन औद्योगिक गिरण्या वाढण्याची कितपत शक्यता आहे त्याचा आपण विचार करू.

देगलूर तालुक्यातील औद्योगिक विकासक्षमतेबद्दल विचार करीत असताना सध्या देगलूर गावाच्या व तालुक्याच्या झालेल्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणे अनाठायी होणार नाही. सध्या देगलूर गांवात काही गिरण्या अस्तित्वात आहेत. देगलूर तालुक्यातील इतर भागातून औद्योगिक विकासाचे वाटचालीस अद्याप सुरवात व्हावयाची आहे. सध्या देगलूर मध्ये असलेल्या गिरण्या खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| जिनींग मिल्स | २ |
| प्रेसींग फॅक्टरी | १ |
| भूईमुगाच्या तेल्याच्या गिरण्या | ४ |
| लाकूड कापण्याच्या गिरण्या | ३ |
| तांदुळ सडण्याच्या गिरण्या | १ |
| पोहे तयार करण्याच्या गिरण्या | ० |
| दाळीच्या गिरण्या | १ |

देगलूर तालुक्याच्या औद्योगिक विकासक्षमतेचा विचार करताना आपल्याला देगलूरच्या परिसरातून होणाऱ्या व होऊ शकणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्याबद्दल आढावा घेतला पाहिजे. हा आढावा घेत असताना कच्च्या मालाचे दोन भागात विभाजन करून १) शेतीमुळे मिळणारा कच्चा माल २) खनिजद्रव्याचा व नैसर्गिक कच्च्या मालाची संभाव्याता त्यावरून कुठल्या गिरण्या देगलूरच्या परिसरात निघणे शक्य आहे हे पाहणे उचित होय.

म्हणून आपण शेती मालातून उपलब्ध होणारा कच्चा माल व या कच्च्या मालाचा उपयोग करून कोणत्या गिरण्या वाढविता येतील किंवा नवीन काढता येतील याचा प्रथम विचार करू.

देगलूर तालुका व त्या लगतच्या परिसरात मूग, उडीद, भुईमूग, कापूस, साळ, तुर, पिवळी ज्वारी, वऱ्हाडी ज्वारी ही पिके खरीपाचे हंगामात तर मिरची, जवस, गहू , ज्वारी, धने हरभरा व करडी ही पिके रब्बीच्या हंगामात येतात. देगलूर बाजारपेठेतून मूग, उडीद, तूर, हरभरा ही कडधान्ये कोठलीही प्रक्रिया न करता कडधान्याच्या डाळी किंवा त्यांचे पीठ

न करता बाहेर पाठविल्या जातात. या कडधान्यावर प्रक्रिया करून त्यांच्या देगलूर परिसरातच डाळी वगैरे तयार करून बाहेर पाठविणे देगलूरचे औद्योगिक विकासाचे दृष्टीने हितावाह आहे. तसा प्रयत्न केल्यास देगलूर गावात व परिसरात २-४ डाळ-गिरणी सुरू होण्यास व व्यवस्थित चालण्यास प्रत्यवाय नसावा.

त्याचप्रमाणे भूईमूग हे या भागातील दुसरे चांगले व्यापारी पीक. भूईमुगाचे या भागातील उत्पादन लक्षात घेता देगलूर तालूक्यात २-३ तेलाच्या गिरण्या सहज निघू शकतील व कच्च्या मालाच्या भरपूर उत्पादनामुळे चांगल्या चालू शकतील. या संदर्भात लातूर येथे सुरू झालेल्या वनस्पती तुपाचा कारखाना, वनस्पती तुपाची सारखी वाढत असलेली मागणी लक्षात घेऊन देगलूरचे परिसरात होणारे भुईमूगाचे भरपूर उत्पादन लक्षात घेऊन लातूर सारखा एखादा वनस्पती तुपाचा कारखाना निघण्याची कितपत शक्यता आहे याचा विचार करावयास काहीच हरकत नाही.

कापूस हे देगलूर बाजार- पेठातील दुसरे महत्त्वाचे व्यापारी पीक या पीकाचे गेल्या काही वर्षातील वाढते उत्पादन लक्षात घेता सध्या कार्यान्वित असलेले जिनींग-प्रेसिंग कारखाने वाढविण्यास बराच वाव आहे असे दिसून येते. निदान नजीकच्या भविष्यकाळात १-२ जिनींग प्रेसिंग नवीन कारखाने काढण्यास काही प्रत्यवाय नसावा. तशात नांदेडला सुरू होऊ घातलेली सूत काढण्याची गिरणी या गिरण्या काढण्यास पोषक ठरावी.

देगलूरमध्ये १५-२० पावरलुम्स चालतात या पावरलुम्ससाठी मुंबईहून सूत आणावे लागते. नांदेडची सूत काढण्याची गिरणी सूरू झाल्यानंतर सुताचा पुरवठा देगलूरला त्वरीत व मोठया प्रमाणावर होऊ शकेल. तेव्हा देगलूरातील पॉवर लुम्सची संख्या वाढण्यास व एक छोटीशी कापडगिरणी देगलूरचे परिसरात चालण्यास काहीच हरकत नाही.

साळ हे या भागातील आणखी एक महत्त्वाचे पीक. शिवाय देगलूर हे आंध्राच्या सरहद्दीजवळ असल्याने व तेथील मुख्य पीक भात हे असल्याने देगलूर गांवात भात सडण्याच्या दोन तीन गिरण्या तसेच पोहे करण्याच्या एकदोन गिरण्य चालण्यास हरकत नाही. जवसाचे ही उत्पन्न या भागात भरूपूर आहे. व जवस नागपूर अकोला या भागात मोठया प्रमाणावर विकली जाते. तेव्हा जवसावर कुठली ही प्रक्रिया न करता जवस दुसऱ्या ठिकणी पाठविण्यापेक्षा जवसाचें तेल कढण्याची गिरणी येथे चांगली चालू शकेल. तसेच कापसापासून वेगळी केलेली सरकी तशीच दुसरीकडे न पाठविता तिचे तेल काढत ते पाठविले तर सरकीचे तेल काढण्याची एक गिरणी या भागात सहज चाल शकेल शिवाय या सरकीच्या तेलाचा शेंगादाण्याचे तेलाबरोबर वनस्पती तुपाचे उत्पादनासाठी उपयोग होऊ शकेल.

मुगाचे पीक या भागात कडधान्याच्या पीकात महत्त्वाचे व बऱ्याच मोठया प्रमाणावर उत्पन्न होणारे आहे. मोसमात मुगाची या बाजार पेठेतून फार मोठया प्रमाणावर बाहेर जावक होते मुगाची जावक तशीच न करता मुगाची डाळ करून पाठविल्यास या परिसरात एकदोन डाळीच्या गिरण्या चांगल्या चालू शकतील. शिवाय तूर हरभरा यांच्या डाळी तयार करण्यासाठी सुध्दा

एखादी-दुसरी गिरणी या भागात काढता येईल.

देगलूर - विकास गटातील उद्योग विस्तार अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्याशी या संदर्भात बोलताना असे समजले की या भागात नीळ तयार करण्याचा धंदा २०-२५ वर्षापूर्वी फार मोठया प्रमाणावर चालत होता. परदेशी रंगाच्या आयातीमुळे किंवा तत्सम कारणानी हा धंदा बसला तरीसुध्दा आपले भारतीय धोबी परीट भारतीय नीळीचाच कपडयासाठी उपयोग करतात. शिवाय नीळीचे उत्पादन माळरानावर सुद्धा चांगले होऊ शकते. तेंव्हा या भागातील माळरान व नापीक जमीन या पीकाचे उत्पादन करण्यासाठी वापरता येईल. व या भागातील एक काळी भरभराटीत असलेल्या या उत्पादनाचे पुनरूज्जीवन करता येईल.

नजीकच्या भविष्यकाळात एखादा साखरेचा कारखाना देगलूर भागात निघण्यास हरकत नाही. हे विधान करत असताना मुक्रमाबाद येथे होत असलेले तळे व तेथून देगलूर भागात होऊ शकणारा पाणीपुरवठा मी गृहीत धरतो. मुक्रमाबादचे तळे लवकरच होऊ घातले आहे. व त्याचे कालवे देगलूरच्या परिसरात पाणीपुरवठा करणार आहेत असे समजते. देगलूर आसमंतातील काळी जमीन व मुक्रमाबाद तळयापासून होऊ घातलेला पाणी पुरवठा लक्षात घेता या भागात नजीकच्या काळात उसाचे भरपूर उत्पन्न निघू शकेल व त्यावर एखादा साखर कारखाना सहज चालू शकेल. त्यादृष्टिकोणातून या भागात आतापासूनच हालचाली व्हावयास पाहिजेत.

आता आपण देगलूरच्या परिसरात उपलब्ध असलेला खनीज द्रव्याचा साठा लक्षात घेऊन त्या कच्या मालाचा उपयोग करून घेउन या भागात कोणकोणते कारखाने निघणे शक्य व काढणे शक्य आहे, याचा विचार करू.

देगलूर तालूक्यात ग्रेनाईट Graynite नावाचा दगड करडखेड, धुळा, वळग या भागात मोठया प्रमाणावर सापडतो. त्या खडकावर संशोधन होऊन तसेच त्याचा कशासाठी उपयोग होऊ शकेल याचा अभ्यास करून त्यावर शक्य असल्यास संबंधीत करखाने काढण्याचा पयत्न व्हावयास पाहिजे. तसेच या तालुक्यातील अमदापूर धुळा, अबलगांव मरतोळी ह्या खेडयांचे आसमंतात विविध संयुगयुक्त खडी (Slicates) मोठया प्रमाणावर आढळते. या खडीचा कच्चा माल म्हणून उपयोग करून त्यापासून चिनी मातीच्या भांडयाचा कारखाना येथे काढल्यास चांगला चालू शकेल या खडीमध्ये उपलब्ध असलेल्या खडकांचे ससायनिक पृथक्करण करून त्यापासून मिळणाऱ्या शुद्ध घटकाचा उपयोग करून घेऊन वार्निश तयार करण्याचा व चष्म्याची भिंगे तयार करण्याचा असे दोन कारखाने या भागात छोटया प्रमाणावर चालण्यास काही हरकत नसावी.

देगलूरचे परिसरात चुनखडी मोठया प्रमाणावर मिळते. याच चुनखडीचा उपयोग निजामसागर धरण बांधण्यास व लेंडी नदीवरील देगलूर-नांदेड या रस्त्यावरील मोठा पूल बांधण्यास मोठया प्रमाणावर केला गेला असे कळते. तेव्हा या उपलब्ध असलेल्या चुनखडीच्या

साठयाचा उपयोग करून घेऊन त्याच्यावर सिमेंटचा कारखाना निघण्याची कितपत शक्यता आहे, यावर सशोधन व्हावयास पाहिजे. सध्या या चुनखडीचा उपयोग रंग देण्यासाठी (डिस्टेंपर) व चुना म्हणून करतात.

या भागात Engineering Workshop नाव घेण्यायोग्य एकही नाही. नांदेड सोडल्यानंतर निझामाबाद पर्यंत एकही मोठे गाव नाही. व Work shop (वर्कशापही) नाही. तेव्हा प्रयत्न केल्यास या गांवात एक दोन चालण्यास काहीच हरकत नाही.

शिवाय सांगवी येथे सिमेंट पाईप तयार करण्याचा कारखाना फार चांगला चालू शकेल. सध्या बिलोली तालुक्यातील अर्धापूर येथे सुरू असलेल्या सिमेंट कारखान्यासाठी येथील रेतीचा उपयोग केला जातो. येथे रेती उपलब्ध आहे. शिवाय वांद्रा नदी या गावाजवळून वाहते. वाहत्या नदीच्या पाण्याचा व रेतीचा उपयोग करून घेऊन येथे एक सिमेंट कारखाना चांगला चालू शकतो.

***

# ११. वैज्ञानिक दृष्टिकोणातून देगलूर

– प्रा. रघुकृष्ण शेटये व प्रा. एकनाथ विसपुते

आपल्या सभोवती असलेल्या सृष्टीचे निरीक्षण केल्यास आपणांस अनेक पदार्थ दिसतात. त्यांपैकी काही सजीव व काही निर्जीव असतात. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व सजीव पदार्थाचे वनस्पती व प्राणी हे दोन घटक होत. वनस्पती व प्राणी यांचा विस्तारही फार मोठया प्रमाणावर झालेला आहे. वनस्पतींना जीव असतो हे सर जगदीशचंद्र बोस यांनी सर्व जगाला सप्रयोग सिद्ध करून दाखविले आहेच.

वनस्पती शास्त्रज्ञाच्या दृष्टीतून जर देगलूरचा अभ्यास केला तर देगलूरच्या आसपास बऱ्याच प्रकारच्या वनस्पती सापडतात. येथे अपुष्प व सपुष्प या दोन्ही प्रकारच्या वनस्पती सापडतात. येथे अपुष्प वनस्पतीमधील निवरय व शेवाळ वर्गातील वनस्पतीसुद्धा येथे आढळतात. याशिवाय थोडया प्रमाणात टेरिडोफाईटस् सुद्धा सापडतात. परंतु त्या सर्वच वनस्पतीबद्दल लिहिणे येथे शक्य नाही. म्हणून खालील लेखात मी वनस्पतीची वाढ वनस्पतीची वाढ व त्याच्या इतर जीवनक्रियाबद्दल न लिहिता केवळ आवश्यक तेवढी व उपयोगाचीच माहिती येथे सविस्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे.

देगलूरच्या आसपास आपणास खालील अपुष्प व वनस्पती सापडतात.

निरवय वनस्पतीपैकी Thallophyta या वर्गामधील खालील वनस्पती आपणास देगलूरच्या आसपास सापडतात.

१ Spirogura (स्पयरीगायरा) २. Nostoo (नॉसटॉक) ३. शेवाळे ४. Ulothrix (युलोथ्रीक्स), ५. Cladophora (क्लोराफ्लोरा) ६. Chara (क्यारा), ७. Fewdiatoms (डायअॅटमस्), ८. Some members of phodophyceas. इत्यादी वनस्पती आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वत: जमा केलेल्या असून प्रयोग शाळेत ठेवलेल्या आहेत.

याशिवाय आळीव वर्गातील खालील वनस्पती विद्यार्थ्यांनीच स्वत:जमा करून त्यांचा अभ्यास केलेला आहे.

1. भूछत्र 2. Pezzion cups 3. Ustilaga 4. Erysiphse 5. Some spores of rust and smuts 6. Mosses. इत्यादी.

**शेवाळ वर्ग :–** या वर्गातील जास्त वनस्पती देगलूरच्या आसपास मिळत नाही. तरीही पण Riccia (रिक्सीया), Anthoceros (अँन्थोरिरॉस) आणि Mosses आमच्या विद्यर्थांनी शोधून काढलेच आहेत.

**टेरिडोफाईटस् :–** यामधील काही फर्मचे (रेधारेणूधारकाचे) प्रकार येथे मिळतात. याशिवाय मला येथे लिहिण्यांत विशेष आनंद होतो की देगलूरच्या जवळच असलेल्या मिर्झापूर गावाजवळ आमच्या विद्यार्थांना Ophilglossum (ऑफिओग्लासम्) या वनस्पतीचे दोन प्रकार मिळालेले आहेत. ही वनस्पती कशा तऱ्हेने व कशा प्रकारच्या जमिनीत वाढते हे आमच्या विद्याथर्यांनी स्वत: पाहून अभ्यास केला आहे.

नग्नबीज वनस्पतीच्या प्रकारातील एकही वनस्पती या भागात होत नाही. अक्त Cycas (सायकस) Thuja (थुजा) इत्यादी वनस्पतीची बोटावर मोजण्याइतकी झाडे आपणास देगलूरच्या आसपास पाहावयास मिळतात. ती झाडे सुद्धा दुसरीकडून आणूनच लावलेली होती.

आतापर्यंत आपण अपुष्प वनस्पतीबद्दल माहिती मिळविली. परंतु आता आपण काही सपुष्प वनस्पतीबद्दलही विचार करू.

मनुष्याच्या व प्राण्याच्या उपयोगात येणाऱ्या वनस्पतीचे जीवन म्हणजे अगदी त्यागी जीवन समजले पाहिजे. जसे वनस्पती आपणास वाटेल तेवढया उपयोगी व मौलिक वस्तू देतात. परंतु त्यांच्य बदल्यात त्या वनस्पती माणसांकडून कशाचीही अपेक्षा करीत नाहीत. वनस्पतीच्या उपयोगावरून त्याचे खालील भाग पडतात.

१. Food Crops :- ज्या वनस्पतीपासून आपण आपले अन्न तयार करतो, त्या प्रकारात खालील वनस्पतीचा समावेश होतो.

१. कडधान्य, २. डाळी, ३. पालेभाज्या, भाज्या, ४. तेलयुक्त बिया ५. फळे ६. मसाल्याचे पदार्थ इत्यादी.

मनुष्यजीवनास आवश्यक असलेले अन्नाचे चार प्रकार पडतात.

१. Heat or energy producing food. ज्या अन्न पदार्थापासून मनूष्यास शक्ती मिळते यामध्ये कर्बयुक्त पदार्थ व स्निग्ध पदार्थांचा समावेश होतो.

२. Book building food या अन्नाचा आपले शरीर वाढविण्यास मदत होते. यामध्ये

Protenus (प्रोटीन्स) येतात.

३. Protecting food या मध्ये Vitamines व काही धातूंचा समावेश केला जातो.

४.Luxury food यामध्ये गोड व चविष्ट पदार्थ येतात.

हे सर्व प्रकारचे अन्न देणाऱ्या वनस्पती थोडयाफार कमीजास्त प्रमाणात आपणास देगलूरच्या सभोवती मिळतात. जसे तांदूळ-तांदूळ देगलूर विभागात बऱ्याच प्रमाणात पिकतो. तांदळामध्ये स्टार्च ७० ते ८० टक्के; प्रोटीन्स ७ टक्के व तेलयूक्त पदार्थ १.४ टक्के व व्हिटॅमिन्स अ, ब, क सापडतात. याशिवाय गहू, मका, ज्वारी हराभरा, वाटाणे, मूग उडीद इत्यादी वस्तू देगलूर मध्ये वाढतात. स्टार्च, प्रोटीन्सयुक्त, तेलयुक्त पदार्थांचे प्रतीशेकडा प्रमाण खालील प्रमाणे असते.

| स्टार्च | प्रोटीन्स | तेलयुक्त पदार्थ |
|---|---|---|
| १. गहू ६०-७० % | १२% | १५% |
| २. मक्का ६७-७० % | १० % | ३.६.५% |
| ३. जवारी ७२ % | १% | २% |
| ४. उडीद ८४% | २२% | १% |

**भाजीपाला :-** कोबी, फुलकोबी, बटाटे, सफरचंद, भोपळा, काकडी गवार याशिवाय बराच भाजीपाला देगलूरच्या बाजारात मिळतो. कोबी व फुलभाज्यामुळे Vitamines चा समावेश बऱ्याच प्रमाणात असतो. म्हणूनच रोजच्या जेवणात त्याचा समावेश केलेला असावा.

याशिवाय तेलयुक्त बियासुद्धा येथे सापडतात उदा. भूईमुंग, मोहरी, एरंडी, जवस, करडी, अंबाडी इत्यादी.

**फळे :-** देगलूरच्या परिसरात चांगली व उत्तम प्रतीची फळे मिळतात उदा. आंबा. आंबा सर्व फळांत उत्तम फळ व फळांचा राजा म्हणून सबोधिले आहे.

**केळी :-** देगलूरच्या परिसरात केळी जास्त प्रमाणात मिळत नाहीत. केळीमध्ये २० साखर आणि ४७ प्रोटीन्स असते. परंतु यामध्ये स्टार्च नसतो याशिवाय अ, ब, क, ड, इ इत्यादी व्हिटमिन्स सापडतात केळीमध्ये फॉस्फरस, लोखंडव पोटयॉशियम बऱ्याच प्रमाणात आढळतात.

**संत्री:-** देगलूरच्या सभोवार संत्र्या, मोसंब्याची झाडे फार जास्त प्रमाणात आढळत नाहीत. तरीपण थोडया प्रमाणात आहेत. संत्र्याच्या रसात Nitric acid Vitamine, c असते.

**पपई :-** पपईची झाडे सुद्धा देगलूरच्या आसपास असणाऱ्या बगीच्यात थोडया प्रमाणात

पहावयास मिळतात. पपईमध्ये Protines नावाचा रासायनिक पदार्थ असतो.

**ऊस :-** ऊसाच्या बाबतीत लिहावयाचे म्हणजे पग ऊस देगलूरच्या अस पास मिळतच नाही. ऊसामध्ये साखरेचे प्रमाण २० असते. व याचे उत्पन्नसुद्धा फायदेशीर ठरते. म्हणून ऊसाचे उत्पादन वाढविण्यास काही हरकत नाही.

ऊसाचे उत्पन्न येण्याकरिता साधारण १२ ते २० महिने लागतात. ऊसाची लागवड ऊसाच्या खोडापासूनच करतात. कांडे असलेले खोड जर जमिनीत लावले तर त्याला नवीन मुळ तयार होऊन ऊस तयार होऊ शकतो ऊसाच्या उत्तम लागवडीकरिता केवळ पाणी व मधून मधून आवश्यक ती रसायनिक खते यांची आवश्यकता असते.

**औषधोपयोगी वनस्पती :-** देगलूरमध्ये औषधीपयोगी वनस्पतीसुद्धा फार प्रमाणात आढळून येते. खाली काही वनस्पतीची नावे देऊन त्याचे महत्त्व सांगितले आहे.

**कडूनिंब :-** कडूनिंबाचा रस रक्त शुद्धीकरिता उपयोगात येतो. हा रस म्हणजे उत्तम रेचक व वांतीकारक औषध समजले जाते.

**२. द्रांक्ष :-** जरी देगलूरात फार मोठया प्रमाणात होत नसतील तरी पण अलीकडे द्रांक्षांचे औषधी वनस्पती म्हणून विविध उपयोग आहेत. द्राक्षांपासून उत्तम प्रकाराची दारू काढता येते. याशिवाय द्राक्षांच्या वाळलेल्या पानाची पूड आतडीच्या रोगावर उपयोगी ठरते.

३. तरोटया सारख्या आढळणाऱ्या वनस्पतीचा उत्तम रेचक म्हणून उपयोग होतो. याशिवाय यापासून उत्तम औषधी पण तयार करता येते.

**४. गुलाब :-** गुलाबाच्या पाकळयामध्ये रेचकाचेच गुणधर्म अढळतात व त्याच्यापासून उत्तम प्रकाराचा गुलकंद तयार करता येतो. याशिवाय त्यापासून सुवासिक तेल तयार करता येते.

**५. शेवंती** :- शेवंतीच्या वाळलेल्या फुलाची पूड कीटकनाशक औषधी म्हणून उपयोगात आणतात. त्या पावडरास सामान्यत: पायरेथ्रस असे म्हणतात.

**६. रूई** :- रूईच्या झाडाच्या मुळांचा उपयोग औषधी तयार करण्यात होतो.

७. **Ipomea** :- या वनस्पतीच्या पानाचा रस पोटदुखीवर वरून लावतात व त्याच पानाचे उकळलेले पाणी संधीवातावर उपयोगात येते.

**८. धोत्रा :-** ही वनस्पती विषारी वनस्पती म्हणून समजली जाते. परंतु ही तितकीच औषधीपयोगी वनस्पती होय. ही वनस्पती गुंगी अणणारी वनस्पती होय. तिच्या बियाचा उपयोग तापावर औषधी म्हणून केला जातो. त्याचप्रमाणे पानाचा रस आमवातावर व सुजलेल्या भागावर लावण्याकरिता होतो. याशिवाय याच पानाचा रस डोळयांचा रोगावर सुद्धा उपयोगात येतो.

याशिवाय देगलूरमध्ये औषधी वनस्पती विपुल प्रमाणात आहे. काही वनस्पती चांगल्या पाचक असतात. त्याचप्रमाणे काही पाले- फळे-भाज्यांचा उपयोग औषधी म्हणून केला जातो. याशिवाय लिंबू इत्यादी वनस्पती औषधोपयोगी वनस्पती म्हणून संबोधिल्या जातात.

इमारतीस उपयोगात येणारे लाकूड पुरविणाऱ्या वनस्पती देगलूरच्या आसपास होत नाहीत. जसे सागवान, खैर इत्यादी परंतु साधे दरवाजे, टेबल खुर्च्या इत्यादी बनविण्याकरिता काही वनस्पतीच्या लाकडांचा उपयोग करून घेण्यात येतो. जसे बाभूळ बाभळीचे झाड टणक असते. त्याचा उपयोग जास्त प्रमाणात सरपण म्हणून करतात निंब, चिंच, इत्यादी वनस्पतींचा उपयोग टेबल, खूर्ची, दरवाजे, इत्यादी करण्याकडे केला जातो.

ज्या वनस्पतीपासून धागा तयार करता येतो अशा वनस्पती देगलूरात थोडयाशा प्रमाणात होतात. जसे, कापूस, अंबाडी बास इत्यादी वनस्पती येथे होतात.

**कापूस** :- देगलूरात कापूस चांगल्या प्रकारे पिकतो. कापसापासून धागा तयार करता येतो. कापसात सुद्धा बरेच प्रकार असतात, जसे आखुड धाग्याचा कापूस इत्यादी. त्याचप्रमाणे कापासाच्या बोयात सुद्धा बरेच प्रकार आहेत. जसे देशी पराटी, विदेशी पराटी इत्यादी. आजकाल कापसा च्या झाडावर संशोधन करण्यासंबंधी भारतात खूप प्रयत्न करण्यात येत आहेत व त्यावर संशोधन जोरात सुरूच आहे. कापसास काळी जमीन लागते कापसावर दह्या नावाचा रोग पडतो व तो रोग मोरचुद पाण्यात मिसळून शिपडल्यात कमी होतो.

**ज्यूट किवा ताग** :- ताग आपणास अंबाडीच्या झाडापासून किंवा बोरूच्या खोडापासून मिळतो. त्यापैकी आपल्या भागात अंबाडी व बोरू दोन्ही वनस्पती सापडतात. ह्या काढून घेऊन बरेच दिवस सडू देतात व नंतर त्या आपटून त्यापासून ताग काढता येतो. ज्यूटचे उपयोग बरेच आहेत. त्यापासून पोते, सतरंज्या, ब्लॅकेंटस् वगैरे तयार केले जातात. इत्यादी सपुष्प वनस्पती देगलूरच्या भागात सापडतात.

**खते**:- जमिनीचा प्राण म्हणजे खत होय. जमिनीची सुपीकता कायम ठेवावयाची असल्यास व वनस्पतीची वाढ उत्तम प्रकारे करावयाची असल्यास जमिनीस खताची अत्यंत गरज असते. जमिनीला म्हणजेच वनस्पतीच्या वाढीकरिता विशेषक करून तीन प्रकारची खते लागतात. १) नैट्रयुक्त २) पोटॅशियम युक्त ३) फॉस्फरस युक्त खते इत्यादी. यांपैकी आपणास देगलूरमध्ये कोणती खते उपलब्ध आहेत याचा विचार करू.

खताची मुख्यत: दोन प्रकार आहेत. १) नैसर्गिक खते. २) कृत्रिम खते. यांपैकी दोन्ही प्रकाची खते देगलूरमध्ये उपलब्ध आहेत. याशिवाय नैसर्गिक मिळणाऱ्या खतामध्ये १) शेणखत, २) तेलाची ढेप ३) घोडयाची लीद ४) पालापाचोळा, ५) सोनखते, ६) Compost खत इत्यादी खतांचा समावेश असून ही सर्व प्रकारची खते देगलूरमध्ये सहजरीत्या मिळतात.

देगलूर आणि त्याच्या परिसराचे रासायनिक दृष्टिकोणातून अवलोकन करू लागलो तर त्याचे महत्त्व असामान्य आहे हे कोणीही कबूल करील. देगलूर आणि देगलूरच्या परिसरातील

जमिनीकडे दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला असे दिसून येईल की येथील जमीन खडकाळ असून ती काळवट व चिवट आहे. जमिनीत पिकांना आवश्यक असणारे निरनिराळे क्षार सर्व साधारण १ ते ५ % प्रमाणात उपस्थित आहेत. त्याचप्रमाणे नायट्रोजन मूलद्रव्य, ज्याचे इंग्रजोतून ' Feeder of life ' असे वर्णन करता येईल, तो .०१ ते .२५% या प्रमाणात जमिनीत उपस्थित आहे. त्यामुळे तुलनात्मक दृष्टया इकडील पिके बरी येतात. कारण झाडाच्या वाढीसाठी नायट्रोजन मूलद्राव्याची पहिल्या क्रमाकांची जी गरज असते, ती या मुलद्रव्यामुळे पूर्णहोते. देगलूर तालुक्यातील जमिनीचा बराचसा भाग नदीच्या गाळानी भरून निघालेला आहे. म्हणून तो इतर जमिनीपेक्षा विशेष सुपीक गणला जातो.

या पिरसरात Calcite कॅलशियम मूलद्रव्यांची निरनिराळी संयुगे वेगवेगळया स्वरूपांत मिळतात. तसेच ग्रेनाईट (Graynite) नावाचा दगड करडखेड. धुळा, वळग या भागात जास्त सापडतो. त्याला जे निरनिराळे रंग असतात ते त्यातील आवश्यक घटकाच्या उपस्थितीमुळे असतात. सारांश, तो अशुद्ध स्वरूपात सापडतो. त्याच प्रमाणे अमदापूर, धुळा अंबुलगा, मरतोळी या भागात पुष्कळ प्रकारच्या संयुगाची खडी (Stlicates) मिळते. याचा उपयोग चीनी मातीची भांडी (Porceleinwares) तयार करण्यासाठी होऊ शकेल. तसेच या घटकाचे रासायनिक पृथक्करण करून त्याच्या शुद्ध भागाचा उपयोग वार्निसमध्ये तसेच चष्म्याची भिगे तयार करण्यासाठी होऊ शकेल. चुणखडी (Limestomes) या भागात फार मोटया प्रमाणावर सापडते. मरखेल व इतर देगलूर तालुक्यातील खेडयांतून या चुनखडीचा व्यापार होतो. विशषत: या चुनखडीचा उपयोग ' डिस्टेंपर ' व चुना म्हणून करतात.

***

# १२. लोकसाहित्यातील देगलूर

– प्रा. सौ.तारा परांजपे

मराठवाडयाच्या पूर्वसरहद्दीवर जे संस्कृति-संगमाचे दृश्य आंपणास दिसते त्याचे सुस्पष्ट स्वरूप देगलूर तालुक्यात पाहावयास मिळते. हा तालुका भौगोलिकदृष्टया आंध्र. व कर्नाटक प्रदेशाच्या हातात हात घालून उभा आहे. देगलूर शहरापासून अवध्या दोन मैलावार आं. प्रदेशाची सरहद्द सुरू होते. या तालुक्यातील ' वझर ' या गावापासून आंध्र प्रदेश १० मैलावर तर कर्नाटक प्रदेश फक्त दोन मैलावर आहे ऐतिहासिकदृष्टया हा प्रदेश एकाच राज्याच्या अंमलाखाली एकत्रितपणे बऱ्याच काळापासून नांदलेला आहे. अगदी अलीकडे म्हणजे दोन-तीनशे वर्षापासून हा सर्व प्रदेश निजामी राजवटीत, मुसलमानी संस्कृतीच्या राजवटीत नांदत होता. म्हणून येथील भाषा, रीतीरिवाज, धार्मिक कल्पना आणि आचारविचार प्रत्येक गोष्टीत एक आगळेपण जाणवते.

मराठवाडयाच्या पूर्व सरहद्दीवर एकमेकीस भेटणाऱ्या भाषिक संस्कृती या मुळ एकाच भारतीय संस्कृतीतून निर्माण झालेल्या असल्या तरी स्थानरपरत्वे त्यांच्यात वेगळेपणा निर्माण झालेला आहे. त्यातही पुन्हा मराठी ही संस्कृत निर्मित भाषा आणि आर्य संस्कृतीचे पुरस्करित आणि कानडी व तेकगू या द्रविडकुलोत्पन्ना व द्रविडसंस्कृतीच्या अभिमान्य. या त्रैभाषिक लोकांच्या सहवासातून निर्माण झालेल्या भाषेला व संस्कृतीला एक आगळेच वैशिष्ट लाभलेले आहे. हे वैशिष्टय आपल्याला तेथील लोकजीवनातून प्रतीत होते आणि हे लोकजीवन तेथे उपलब्ध होणाऱ्या लोकसाहित्यात प्रतिबिंबित झालेले आहे.

महाराष्ट्रात उपलब्ध होणाऱ्या लोकसाहित्यात जात्यावरील ओव्याचा भरणा सर्वात जास्त असतो. ओवी वाङ्मय हे साहित्याच्या दृष्टिकोणात पाहत असताना तोकडे पडते. भाषेच्या दृष्टीने त्यात प्राचीन अर्वाचीन ठरविता येत नाही आणि त्यात पुष्कळदा, दुसऱ्या त्याच प्रकारच्या विषयाची किंवा रचनेची नक्कल केलेली असल्यामुळे कंटाळवाणा तोच तोपणा येत असतो हे सगळे दोष गृहीत धरून सुद्धा एक गोष्ट मात्र निश्चित असते. अन् ती म्हणजे लोकसाहित्य हा

त्या प्रदेशातील लोकजीवनाचा आरसा असतो. लोकसाहित्याकडे पाहण्याच्या नवा चिकित्सक दृष्टिकोन प्राप्त होतो. लिोकजीवनाच्या अभ्यासाचे एक साधन मानतो. याच दृष्टिकोणातून देगलूर तालुक्यात मिळालेल्या लोकसाहित्याचा अभ्यास केला असता येथील लोकजीवनाचे काही विशेष पैलू नजरेस पडतात.

येथील लोकजीवनावर तेलगू भाषा व आंध्रा प्रदेशातील संस्कृती यांचा बराच परिणाम झालेला आढळतो. या परिणामांचा विचार करीत असता व्रतेवैकल्ये येथल्या सर्वसामान्य लोकांनी घेतलेली आहेत. (अर्थातच देगलूर जवळच्या आंध्र प्रदेशातील मदनूर, बिचकुंदा कींवा त्याच्या आसपासच्या लोकांनी महाराष्ट्रांतील देवदेवतांची पूजा व्रतेवैकल्ये घेतली आहेत.) असे होण्याचे एक कारण असे की दोन्ही प्रदेशातील बहुसंख्य लोक धर्माने हिंदू आहेत. तेहतीस कोटी देव मानणारा हिंदू समाज, दुसऱ्या धर्माच्या देवांनासुद्धा जिथे आपल्या धर्मात स्थान देतो तिथे तो परस्परांच्या प्रदेशातील आपल्याच धर्मातील देवदेवतांची पूजा उचलतो यात कांहीच विशेष नाही. दुसरी गोष्ट म्हणजे परस्परांच्या देवदेवतांना मान्याता देण्याची ही प्रक्रिया आर्य-द्रविड संघर्षापासून चालत आलेली आहे. महाराष्ट्र हा आर्य व द्रविड दोन्ही संस्कृतीच्या सीमारेषेवर वसलेला बसल्यामुळे येथे हा संघर्ष आणि संगम या दोन्हीचीही चिन्हे आढळतात. तिसरी गोष्ट अशी की ग्रामीण जीवनात जिथे संस्कृतीचा विकास मोठया प्रमाणात झालेला नाही अशा ठिकाणी लोकांची देवाबद्दलची भावना भिताची आणि भितीतूनच निर्माण झालेली असते त्यामुळे खेडयातले लोक म्हणतात की, " आम्ही आडव्या आलेल्या प्रत्येक देवांची पूजा करतो." देगलूर तालुक्यात, तेलंगाणातील एक ग्रामदेवता ' पोचम्मा ' हिची पूजा करण्याची प्रथा मोठया प्रमाणात आढळते. महाराष्ट्रातल्या ' मरीआई ' प्रमाणे ही देवी, गोवर, कॉलरा वगैरे रोगाची देवी आहे. ती मुळची महिषासुरमर्दिनी असावी असे तिच्या नावाच्या व्युत्पत्तीवरून वाटते. तेलगू भाषेत ' पोतु ' म्हणजे रेडा व ' अम्मा ' म्हणजे आई. रेडयावर बसलेल्या असुराला मारणारी आई ती ' पोतम्मा ' व तिचेच अपभ्रष्ट रूप ' पोचेम्मा '. सिकंद्राबादला ' पोचम्मा ' चे मोठे स्थान आहे. तेथे तिला रेडा बळी दिला जातो. व या रेडयाच्या गळयाची शीर या देवीच्या पोतराजाने आपल्या दांताने तोडावयाची असते ही प्रथासुद्धा ती महिषासुरमर्दिनी असल्याचे दर्शविते. या विभागात आषाढी, माघो आणि चैत्री पौर्णिमेला पोचम्मालाघरा घरांतून दहिभाताचा नैवेद्य जातो. महार व मांग जातीतून आंबिल, खिचडयाचा आणि कोमटी जातीतून ' आळका ' काढतात. या प्रसंगो रंगलेले दोन माठ एकावर एक ठेवून वरच्या माठात, पाण्यात कडूनिंबाचे फाटे ते ठेवून, डोक्यावर घेऊन पुढीलप्रमाणे गाणी म्हणत देवीला (लिंबाच्या झाडाखाली, दगडाची शेंदूर लावलेली आकारहीन, तिला लाकडाच्या बाहुल्याकरून वाहतात.) जातात.

पोचम्मा मजी माय। तुजं माजं गं वचन

करी बाळाला जतन.

पोचम्मा ही उग्रदेवता म्हणून, भीतीतून पूजिली जाते तर बदकम्माही प्रजनन देवता

उत्सवप्रियातून पुजिली जाचे. बदकम्मा या नावाची व्युत्पत्ती तेलगू ' बदकुटा ' म्हणजे जिवंत राहणे या क्रिपापदापासून साधलेली आहे. तिच्यासबंधीची आख्यायिका असे सांगते की, चोळ देशातील धर्मराज व सत्यवती या जोडप्याला शंभर व्रते करून शंभर पुत्र होतात ते सर्व युद्धात मारले जातात. नंतर लक्ष्मीच्या कृपाप्रसादाने, तिचाच सत्यवतीच्या उदरी जन्म घेतो. तीच बदकम्मा तिच्या जन्मानंतर तिची मेलेली भावंडे जिवंत होतात. ही आख्यायिका व तिचे नाव आपल्या कडील जिवतीशी साम्य दाखविते. मात्र तिच्या पूजाविधीला हादग्यासारखे मुलींच्या खेळाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. भुलईवर किंवा हादग्यात जशी कुमारिका व काही ठिकाणी प्रौढ सुवासिनीसुद्धा फेर धरून गाणी म्हणतात. तसाच प्रकार बदकम्माचाही असतो. फुलांनी सजविलेली तबके किंवा कामटयांनी बनवलेली त्रिकोणाकृती ही बदकम्माचे प्रतीक असते. बदकम्माची गाणी बहुतकरून स्त्रीजीवनावर आधारित पण बडबडगीताच्या स्वरूपाची-पुष्कळशी असंबद्ध अशी गीते असतात. त्यापैकी ' कोलाटाबाई कोऽलाऽऽटा ' हे गीत तेलगू गीताचे भांषातर असून (कोलु-टिपरी, आटा-खेळ) कोलाटा म्हणजे टिपरीवरचा खेळ या शब्दाने सुरू होणारे हे गाणे टिपरीवरच म्हणावयाचे असते.

या विभागात पूजिली जाणारी तेलंगणातील आणखी एक देवता म्हणजे बालाजी. ही समृद्धीची देवता म्हणून सर्व भारतभर पूजिली जाते. काही संशोधकाच्या मते ही देवता असीरियातून उत्तर भारतात व तेथून दक्षिणेत आली. मूळची ही देवता कोणत्याही ठिकाणाची असो आज तरी तिचे स्थान तेलंगणात आहे. आणि लोकगीतात तिचा उल्लेख ' तेलंगा ' म्हणून होतो. उदा.

आठवाडया शिकुरवारी । लवंगाचं राइत

तेलंग्याला शाकाव्रत । देवा मज्या बालाजीला

किंवा

आठा दिवशी शिकुरवारी । दह्यादुधानी मोरी वाहे

तेलंगा राजा नाहे । देव बालाजी.

देवदेवतांच्या नंतर दुसरा मोठा परिणाम दिसतो तो भाषेवर झालेला याशिवाय राहणी, जेवणाखाण्याच्या पद्धती, विवाहातील रीतिशिवा वेचकथण्ड शब्द, वाक्यरचना आणि व्रतेवैकल्य अशा कितीतरी गोष्टीवर भाषा व संस्कृतीचा परिणाम दिसतो. भाषेच्या परिणामांच्या दृष्टीने पाहता तेलगू किंवा कानडीचा उच्चारपद्धती, तीमधले शब्द, वाक्यरचना म्हणी व वाक्प्रचार किंवा त्यांची भाषांतर अशा अनेक गोष्टी दिसतात. या विभागात आढळणाऱ्या काही म्हणी उदाहरणादाखल घेता येतील. ' काम थोडं गर्दा फार ' ही म्हण ' मंत्रम् लेनदी पूजा मापडदानका ' या म्हणीचं रूपांतर आहे. ' जावं म्हणून धूर करावा. ' हा वाक्प्रचार ' पोम्मना जालगा पोगा पेट्टुटा ' या वाक्प्रचारांचे भाषांतर आहे. याशिवाय,

पाऊस पडतो । जिनीमिनी येगं कोंडा डोंगर

कृष्णातीरी तूजा । झेंडा । देवा बालाजी

अवगं निंदन सरलं । कोप्पेरचापा ईरले झालाय जड आता न्हाई आवगड.

असे कितीतरी तेलगू शब्द ओवी, उखाणे वैगरेमधून आढळतात. याशिवाय रोजच्या जीवनात कुडदी-आंबोण, अटकू-माळा यासारखे शब्द इतके रूढ झालेले आहेत की त्यांचे मराठी प्रतिशब्दच येथील लोकांना माहीत नाहीत.

या प्रदेशात तेलगू भाषेच्या खालोखाल उर्दू भाषा व मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव आहे. भारतात सर्वच ठिकाणी हिंदूंनी पीराला भजण काही नवीन नाही. तेच याही प्रदेशात दिसते. उर्दू ही परवापरवापर्यंत येथील राज्यकर्त्यांची भाषा होती त्यामुळे अनेक हिंदू घरांतसुद्धा मोठ्या प्रमाणात उर्दू भाषा वापरीत पण त्याचे कौतुक होत ते असे:

साडा सावडयाची । मुसुलमान बोली

कशी तूला समजली । बहीनाबाई

***

# १३. होट्टलचे शिवालय

– प्रा. पुरूषोत्तम देशमुख

संत-महंतांच्या वाङ्मय-स्त्रोताने पावन झालेली भूमी म्हणजे मराठवाडा. येथेच महाराष्ट्र-शारदेला ललामभूत झालेले ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, नामदेव, मुक्ताबाई आदी संतांची महान परंपरा उदयाला आली, आणि तिने अमृतातेहि पैजेसी जिंकणाऱ्या मऱ्हाटी भाषेचे वाङमय समृद्ध केले. या भागाला जसा वाङ्मयीन वारसा मिळाला तसाच कलेचा आणि कलात्मकतेचाही चिरंतन वारसा मिळाला. अजिंठा-वेरूळ तर यासाठी जगभर विख्यात आहेतच, पण त्याशिवाय मराठवाडयाच्या इतर भागांतही कलात्मकतेची प्रसादचिन्हे विखुरलेली आहेत. येथली चित्रकला आणि शिल्पकला हजारो वर्षांपूर्वी पासूनच प्रगतीच्या अत्युच्य शिखरावर विराजमान झालेल्या आहेत.

येथे चित्रकला अवतरली ती भित्ती-चित्रांच्या (Mural Painting) स्वरूपात. नानाप्रकारच्या रंगांनी नाना प्रकारच्या आकृतींना साकार केले. नुसते साकारच केले नाही तर चिरयौवनाचा आशीर्वाद दिला. आणि नुसत्याच आकृती निर्माण केल्या नाहीत, तर त्या आकृतीमध्ये नाती निर्माण करून रामायण-महाभारतातील कथा त्या योगे सामान्यांपर्यंत नेऊन पोचविल्या. महाकाव्येच, पण जी सामान्यजनांना उद्यापपर्यंत दुर्बोध होती, दुर्लभ होती, ती या ठिकठिकाणच्या कलाकारांनी महाराष्ट्रातच काय, सबंध भारतवर्षात रंग-रेषांच्या सहाय्याने चितारली. लोकांना सुसंस्कारित केले. प्रथम कलात्मकतेचे, सौंदर्याचे आणि त्या द्वारे नीतीमत्तेचे, उपदेशाचे धडे दिले. रंगरेखांना सजीव केले आणि दगडांना बोलके केले.

पत्थराला गाता येते म्हटले तर जरा नवल वाटेल. पण ते आपल्या या अज्ञात कलामहर्षींनी घडवून आणले आहे. अशक्यतेला शक्यतेची, वास्तवतेची लेणी चढवली आहे. या पत्त्थरांनी ठिकठिकाणी आपल्या पूर्वजांच्या शौर्यगाथा गायिल्या आहेत, भूतकाळाला वाचा फोडली आहे. हजारो वर्षापूर्वीच्या अनेक सत्यकथा आजही आपल्याला ऐकवणाऱ्या अनेक साधनांत या पत्थरांचा वाटा फार मोठा आहे. मदराईचे मीनाक्षीचे मंदिर काय, कोणारचे सूर्य मंदिर काय, घारापुरीच्या त्रिमूर्ती काय, किंवा अजिंठा-वेरूळच्या भव्य शिल्पकृती काय, या सर्वांना शाश्वततेचा, चिरंतनाचा जो वर मिळाला आहे, तो या पत्थरामुळेच. दगडाला देवपण लाभते

ते टाकीचे घाव सोसूनच, असे जे म्हणतात ते अक्षरश: खरे आहे. दगडातून देव-देवतांच्या मूर्ती कोरल्या जातात, आपण भाविकतेने त्यांचे दर्शन घेतो, त्यात समरस होतो आणि त्यांच्या ठायी आपल्याला परमेशाचे प्रसन्न वरदायी रूप दिसू लागते.........

या पत्थरांनी जशी परमात्म्याची भक्ती-गीते गायिली, तशी अशाश्वत सौंदर्याची शाश्वत गीतेही गायिली आहेत. वेरूळ-अजिंठाखेरीज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातही सौंदर्याचा साक्षात्कार घडवणाऱ्या अनेक शिल्पकृती अनेक ठिकाणी आहेत. आपल्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यात होट्टल नामक एक गाव आहे. हे गावही आपल्या कुशीत सौंदर्याचे एक लेणे घेऊन उभे आहे. येथल्या शिल्पकृतींचा आस्वाद अनेकांनी घेतला असला तरी त्याविषयी माहिती नसणारांचीच संख्या अधिक आहे.

देगलूरपासून सुमारे पाच मैलांवर दक्षिण दिशेला हे होट्टल गाव आहे. कुणी या गावाला होटूळही म्हणतात. नक्की शब्द काय असावा हे जरी माहीत नसले तरी त्या मूळ मराठी नावावर तेलगू भाषेचा परिणाम झाल्याचे लक्षात येते. कारण या भागातल्या गावांची नावे ' ऊर ' ' ऊळ ' या अक्षरांनी संपतात. उदाहरणार्थ देगलूर, मदनूर, कळमनूर (आपण सध्या कळमनुरी म्हणतो), नेकनूर वगैरे तसेच होट्टल किंवा होटूळ कदाचित पूर्वी होट्टलूरही असावे. तर हे होट्टल गाव इतर गावांपासून दूर आहे. नाही म्हणायला जवळपास रामपूर व वाडी ही अगदीच लहानशी खेडी आहेत. इकडे जाणारा रस्ता जरा दुर्गम वाटतो. रस्ता कसला, शेता-शेतांतून, पाणंदीतून जाणाऱ्या -येणाऱ्या माणसांमुळे पाऊलवाट झाली आहे. ही पाऊलवाट कधी चढ चढते तर कधी उतारावर घसरते. होट्टलचे कलावैभव पाहायला जाणाऱ्या हौशी पण शहरी माणसाला ही पायवाट जरा बिकट वाटली तर नवल नाही. एरवी सराईत माणसे देगलूर-होट्टल पायपीट दीड-पावणे दोन तासांत संपवतात पण आम्हाला मात्र सुमारे चार तास लागले !

आम्ही होट्टलला पोचलो तौ संध्याकाळचे पाच वाजले होते. मला तर रस्त्याने चालताना वाटले की पोहचेपर्यंत जर अंधार पडला तर आतापर्यंतची पायपीट व्यर्थ जाईल. पण सुदैवाने तसे झाले नाही. होट्टल गाव आले, आणि आम्ही गावातून तेथल्या बहुर्चीचत शिवालयाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. गावाकडे, तिथल्या घराकडे पाहिल्यावर मलाच काय कुणालाही वाटणार नाही की याच लहानशा खेड्यात सुंदर शिल्पकलेचे भांडार लपलेले आहे. कारण गाव आणि तिथली घरे अगदीच बाळबोध, कलात्मकतेची आणि सौंदर्याची चाहूलही न लागलेले ते गाव ! नाही तरी मदुराईच्या, अजिंठा-वेरूळच्या किंवा आग्र्याच्या लोकांना आपल्या गावाचे काय महत्व ! ते आपल्याला असते., दूरच्या लोकांना ! आपण ते डोळे भरून पाहतो आणि त्याचे तोंड भरून कौतुक करतो ! तिथल्या लोकांना त्याचे काहीच नसते. काहीकाहींच्या तर गावीही नसते. आपल्या गावाचे अमूक एक महत्त्व आहे हे !

गावाच्या एका टोकाने आम्ही गावात शिरलो तर अगदी दुसऱ्या टोकाला हे शिवालय आहे. अत्यंत जीर्णावस्थेत काळाशी झुंज देत जुन्य कलावैभवाची साक्ष पटवीत हे सूंदर शिवालय अजून उभे आहे. भारतीय शिल्पशास्त्रात देवालयाला एक महापुरूप कल्पिलेले

आहे. होट्टलचा हा महापुरूष झुंज देत खंगत चाललाय. परंतु अजून ताठरपणा कायम आहे. मागच्या काही भागांत हे मंदिर पडले आहे. पण भाग्याची गोष्ट ही की त्या पाशवी मूर्तिभंजकाचा हस्तस्पर्शही येथे झालेला नाही ! येथली मर्ती न मूर्ती अजून शाबूत आहे ! (एक संपूर्ण मूर्तीच चोरली गेली ही गोष्ट वेगळी !)

हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. त्याची बांधणी हेमाडपंती थाटाची आहे हे, मंदिर पाहताच जाणकाराच्या लक्षात येते. अशा पद्धतीची रचना चुन्याच्या किंवा इतर कसल्याही सहाय्यावांचून केवळ एकावर एक दगड ठेवून केली जाते. दुसऱ्या कोणत्याही पद्धतीपेक्षा अगदी वेगळी असलेली या मंदिराची घडण हे प्रमुख हेमाडपंती वैशिष्ट्य आहे. देवालयाच्या पायाची आखणी जशी असेल अगदी त्याच प्रकारची लहान आकृती शिखराच्या वरच्या बाजूला असते, त्याला आमलक म्हणतात. चारही दिशांना कोन येतील असा चौरस कल्पून एका कौनासमोर प्रवेशद्वार असलेल्या या इमारतीच्या पायाची आंखणी अनेक कोनबद्ध अशी असते. त्या पायावर उभारलेल्या भिर्तीनी जे कोन बनतात त्या सर्व कोनांच्या रेषा जमिनीपासून शिखरापर्यंत गेलेल्या असतात. आणि त्या शिखराच्याच छोटया छोटया प्रतिकृती खालपासून वरपर्यंत एकावर एक प्रमाणबद्ध बसवल्यामुळे या लहान शिखरांचे मिळूनच मोठे शिखर बनल्यासारखे वाटते.

मंदिराच्या कोनाकृती भिती पायापासून वर चढत गेल्यामुळे त्या ठाशीव दिसतात. आणि छायाप्रकाशाच्या परिणामामुळे अधिकच उठून दिसतात. या देवळाचे स्तंभ बहुधा एकसंध पाषाणातून कोरलेला असतो. उपलब्ध होणाऱ्या त्या अखंड शिलाच्या लांबीनुसार मंदिराचे प्रमाण ठरवावे लागते. म्हणूनच काही हेमाडपंती देवळे उभट आकाराची असतात तर काही ठेंगणी असतात. एकसंध पाषाणाचा कातीव स्तंभ चौकोनी, षट्कोनी, अष्टकोनी असे भिन्न आकाराचे दगड एकावर एक रचून ठेवल्यासारखा दिसतो.

हे मंदिर वरील माहितीबरहुकूम ते जमिनीपासून सात-आठ फूट उंचीवरच्या पायावर बांधलेले आहे. प्रवेशद्वारानंतर मधोमध चार कोरीव स्तंभ आहेत. ते या भागाला मंडप म्हणतात. या मंडपाच्या छतावर चार खांबांमध्ये सुरेख नक्षीकाम आहे. प्रवेशद्वाराच्या अगदी समोरच देवालयाचे द्वार आहे. दाराच्या चौकटीवरही नक्षा आहे. दोन्ही बाजूंना जयविजय दगडावरच सुरेख मुद्रा घेऊन कोरलेले आहेत. मंदिरातल्या शंकराच्या पिंडीचे मी दर्शन घेतले. पण मी उत्सुक होतो आजूबाजूच्या शिल्पकृती पाह्यला.

मी पायऱ्या उतरून देवळाबाहेर आलो. पश्चिमेच्या दिशेने अत्याधुनिक विश्वात संचार करणाऱ्या सूर्यनारायणाने आपल्या किरणांनी देवळाचा तो भाग उजळून काढला होता. आणि जणू तो आम्हाला सुचवीत होता की, ' बाबानो ! प्रथम इकडे बघा ! इकडे उशीरा आलात तर साराच उशीर होईल !' खरेच, साराच उशीर झाला असता; त्या भागातल्या सुरेख शिल्पाकृती पाह्यला आम्हाला तिथे तंबू ठोकावा लागला असता. आम्ही त्याच्या आवाहनाला मान देऊन तिकडे वळलो. सर्वप्रथम दिसली ती मूर्ती आहे बासरी वाजवणाऱ्या कलावतीची. आकृतीची

आकर्षता फारशी नसली तरी मुद्रेवर कमालीची तन्मयता आहे बासरी वाजवतानाची. ही कालिदासाची तन्वंगी नसली तरी सुडौल, भरगच्च शरीराजी रमणी खास आहे. कानात मोठाली कर्ण फुले गुंफली आहेत, तर डोळे बासरीच्या सुरात जणू देहभान विसरून उभी आहेत किती शतकापासून ! तिच्याकडे पाहत पाहत माझेही डोळे मिटले गेले आपोआपच, आणि क्षणभरच, पण मला भास झाला बासरी ऐकू येत असल्याच !

तेथून पाऊल उचलले तो दिसली एक विरहिणी. आपल्या डौलदार उजव्या पायावर यौवनाने रसरसलेल्या शरीराचा भार टाकलेला आहे, डावा पाय आपल्या नाजूक अंगठयावर टेकवलेला आहे आणि उजव्या हाताने हलकेच भितीवर चित्र रेखते आहे. जणू आपल्या प्रियकराचे ! मान अशी लाडिकपणे वर केली आहे की ब्स- पाहणाराने मुलून जावे ! मला ते शिल्प, शिल्प, वाटलेच नाही. मला वाटली शकुंतला किंवा मेघदूताबरोबर संदेश पाठवणारी यक्षपत्नी-विरहिणी...!

विरहाच्या दु:खाची कल्पना करून आणि माझ्या असमर्थतेची जाणीव हाऊन मी जरा पुढे झालो तो तिथे हाते गणराजाचे तांडवनृत्य. डावा पाय टेकवून उजवा अलगद वर घेतला होता, सोंड ऐटीने डावीकडे वळवली होती, डाव्या हाताने नृत्याची मुद्रा घेतली होती, तर उजवा आशीर्वादासाठी समोर केला होता. उरलेल्या हातात आयुधे होती. गणेशाची ही मूर्ती पाहून त्याच्या बालबोध पणाविषयीचा माझा समज दूर झाला. मूषकाचे वाहन करून हिंडणारा तो विध्नहर्ता त्रिनेत्रधारी शंकराचा पुत्र आहे हे पहिल्यांदाच मला जाणवले !

थोडीशी नजर आणखी पुढे नेली तर दिसली एक मृदंगवादिनी - जणू तो गजानन हिच्या मृदंगाच्या तालावर नाचतोय ! हिची चर्या धीर-गीर आहे, तरीपण अस्पष्टसे स्मितही आहे. कानामध्ये लांब आभूषणे आहेत. अंगावर नाना तऱ्हेचे अलंकार आहेत. वस्त्रांनी कटिभाग झाकलेला आहे, पण भरदार उरोजानी कंबर जणू वाकली आहे ! एकेक अवयव विलक्षण रेखीव आहे.

***

# १४. देगलूर तालूक्यातील ग्रामपंचायती

– प्रा. आर.के. कुलकर्णी (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

लोकशाहीमध्ये सत्तेच्या केंद्रीकरणापेक्षा विकेंद्रीकरणाला अधिक महत्त्व असते. कारण जोपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होत नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने लोकशाही नांदू शकत नाही म्हणून ग्रामपंचायती हे लोकशाही सरकारचे खेडयांतील एक महत्त्वाचे केंद्र बनलेले आहे.

पंचायत राज्य आणि ग्रामपंचायती म्हणजे विकेंद्रित लोकशाहीचा भारतातील एक क्रांतीकारक प्रयोग. महाराष्ट्रात १९६२ साली पंचायत राज्याच्या पद्धतीला आरंभ झाला. तसे भारतीयांना नवीन नाही. कारण पूर्वी भारतात ग्रामपंचायती होत्या. आधुनिक काळांत ग्रामपंचायतीची स्थापना झाली म्हणण्यापेक्षा पूर्वीच्या काळी असणाऱ्या ग्रामपंचायतीचे पुनरूज्जीवन केले गेले असे म्हणणे अधिक संयुक्तिक होईल. आधुनिक काळातील ग्रामपंचायती म्हणजे पूर्वीच्या ग्रामपंचायतीची सुधारून वाढविलेली आवृत्ती होय.

पंचायत राज्य पद्धतीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण मुख्यत: तीन वेगवेगळ्या पद्धतीवर झालेले आहे. म्हणून सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे आपल्याला तीन टप्पे सांगता येतील. ह्यातील पहिला टप्पा म्हणजे जिल्हा परिषदा होत. जिल्हा पातळीवर सत्तेचेज विकेंद्रीकरण झालेले आहे त्याला जिल्हा परिषद म्हणतात. म्हणजे सत्ता विकेंद्रीकरण ह्या कल्पनेच्या प्रेरणेने जिल्हा परिषदा निर्माण केल्या गेल्या.

जिल्हा परिषदांमध्ये असणाऱ्या लोकांची विभागणी अनेक भागांमध्ये गटामध्ये केलेली आहे. म्हणजे तालुका पातळीवर असणाऱ्या पंचायत समित्या होत. येथे प्रत्येक गटाला 'क' तालुका कल्पून त्या ठिकाणी पंचायत समित्या निर्माण केल्या गेल्या.

तसेच सत्तेच्या विक्रेंदीकरणाचा तिसरा आणि शेवटचा टप्पा म्हणजे ग्रामीण पातळीवर असणाऱ्या ग्रामपंचायती होत. अशा प्रकारे जिल्हा पातळीपासून ते ग्रामीण पातळीवर असणाऱ्या ग्रामपंचायतोचे अतिशय महत्त्व आहे. कायद्याच्या दृष्टिकोणतून सुद्धा ग्रामपंचायती अत्यंत

महत्त्वाच्या ठरतात. कारण ग्रामपंचायत ही खेडयांतील लोकशाहीची एक प्रतिमा म्हणून अस्तित्वात आलेली आहे.

देगलूर तालुक्यांतील ग्रामपंचायती व त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे म्हणजे ग्रामपंचायतीची रचना, निवडणूक, उत्पन्नाचे मार्ग आणि महाराष्ट्र शासनाने संमत केलेल्या कायद्याप्रमाणे ग्रामपंचायतीची स्थापना ही खेंडयातील लोकसंख्येवर अवलंबून आहे. विशिष्ट आवश्यक असणारी लोकसंख्या असलेल्या खेडयांत ग्रामपंचायत स्थापिली जाते.

ज्या खेडयांची संख्या आवश्यक संख्येपेक्षा कमी आहे अशा खेडयांना एकत्रित करून घटक ग्रामपंचायती स्थापिल्या जातात.

देगलूर तालुक्यातील खेड्यांची एकंदर संख्या १०३ असून ग्रामपंचायतीची एकूण संख्या ८० आहें म्हणजे या तालुक्यांत काही खेडी अशी आहेत ज्यांची लोकसंख्या आवश्यक लोकसंख्येपेक्षा कमी आहे. एकंदर ८० ग्रामपंचायती पैकी २० ग्रामपंचायती घटक ग्रामपंचयती म्हणून आहेत. पैकी काही घटक ग्रामपंचायती ह्या दोन खेंडयांच्या मिळून बनलेल्या आहेत तर काही तीन खेडयांच्या मिळून.

कायद्यात नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्खा ७,९ किंवा ११ असू शकते या संदर्भात देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतीचा विचार केल्यास असे आढळून येते की सर्व ग्रामपंचायती मधून सभासदांची संख्या ७ आहे ग्रामपंचायतीच्या एकूण सभासदाच्या तीन प्रकारांत वर्गीकरण करता येईल. सभासदाच्या वर्गीकरणाचा पहिला प्रकार म्हणजे सर्वसधारण जातीच्या मागासलेल्या जातीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागा. (या दोन आहेत). आणि तिसरा प्रकार म्हणजे स्त्री लेली (Nominated) स्त्री सभासद असते ह्या दृष्टाने विचार केल्यास देगलूर तालुक्यात एकूण ८० स्त्री सभासद, १६० मा. जातीचे सभासद आणि ४०० सर्वसाधारण सभासद आहेत असे आढळून येते. केवळ एक स्त्री सभासद वगळल्यास ग्रामपंचायतीचे बाकीचे सर्व सभासद निवडून आलेले (Elected by the people) असतात.

ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्याचे ठरविण्याचे व पार पाडण्याचे काय जिल्हाधिशाचे असते, तालुका पातळीवर असणाऱ्या मामलतदाराच्या मदतीनेच तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पाडल्या जातात. वास्तविक पाहता खेडयात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका ह्या राजकीय पक्षांच्या आधारावर (Political Party basis) लढविल्या जाऊनयेत पण प्रत्यक्षांत निराळेच चित्र दिसते. संपूर्ण महाराष्ट्रातून होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका ह्या राजकीय पक्षाच्या आधारावर लढविल्या जातात. त्याचा परिणाम म्हणजे खेडयांतील ग्रामपंचायतीमधून दिसून येणारे पक्षीय राजकारण (Party politics) होय. याला देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत असताना पक्षीय राजकारण खेळले जाते. ग्रामपंचायतीच्या एकूण निवडणुकापैकी केवळ १५ ते २० टक्के निवडणुका बिनविराध असतात. अशा बिनविरोध निवडून आलेल्या देगलूर तालुक्यातील

ग्रामपंचायतीची उदाहरणे म्हणून आपल्याला लोणी, होणेगाव, शिळवणी, नरंगल, होट्टल, किनी इत्यादी नांवे सांगता येती.

ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत असतांना कांही ठिकाणी बराचसा गोंधळ होतो, केला जातो. हा गोंधळ केंव्हा खेडयातील जनतेकडून, केंव्हा राजकीय पक्षांच्या लोकांकडून तर केंव्हा शासनाच्या गैरकारभारामुळे होतो असे दिसते. निवडणुका होत असतांना कांही गोंधळ झाल्यास निवडणुका रद्दकेल्या जातात. याची उदारणे केवळ मराठवाडयाच्या नव्हेतर महाराष्ट्रांतील ग्रामपंचायतीची देता येतील जेथील निवडणुका रद्द केलेल्या आहेत. ह्या बाबतीत देगलूर तालुका वैशिष्ठयपूर्ण आहे. आतापर्यंत झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकामध्ये कसलाच गोंधळ झालेला नाही आणि म्हणून निवडणूका रद्द झाल्याचे एकही उदाहरण आढळून येत नाही. अशा वेळी बरेचसे ग्रामपंचायतीचे सभासद आपल्या सभासदत्वाचा राजिनामा देतात. तसाही काही प्रकार या तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सभासदाबाबत घडलेला नाही. मृत्युसारख्या कांही नैसर्गिक कारणारमुळे आतापर्यंत १५ सभासदांच्या जागा रिकाम्या झाल्या होत्या. कायद्याप्रमाणें त्या भरण्यांत आलेल्या आहेत.

ग्रामपंचायतींना ग्रामसभा घ्याव्या लागतात पूर्वी वर्षातून कमीतकमी दोन वेळा ग्रामसभा घेणे आवश्यक होते अलिकडे वर्षातून ४ वेळा ग्रामसभा घेतल्या जातात ग्रामपंचायाती मार्फत घेण्यात येणारी पहिली ग्रामसभा जानेवारी महिन्यात तर दुसरी मे महिन्यांत, तिसरी ऑगस्ट महिन्यांत तर चौथी ऑक्टोबर महिन्यांत अशा घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभेत अहवाल वाचन, अंदाजपत्रकांतील तरतूद, ऑडिट वाचन, नवीन कराराबद्दलच्या आकारणीची चर्चा आणि अविश्वासाचा ठराव (असले तर) वगैरे कामे केली जातात. ह्या संदर्भात देगलूर तालुक्यांपतील ग्रामपंचायतीचे स्वरूप निराळे आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीकडून वर्षातून चार वेळा ग्रामसभा घेतल्या जातात पण वैशिष्टय म्हणजे त्यांची माहिती गांवातील बहुतेक लोकांना नसते. (ग्रामपंचायतीचे सभासद सोडून) यावरून देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमधून समाज कार्य करणाऱ्या सभासदाची सभाजाविषयीची व गांवाविषयीची आस्था दिसून येते. यात जनतेचा दोष नसून ग्रामपंचायतीच्या सरपंचाचा व इतर पंचाचा आहे. कित्येक वेळा ग्रामसभा खेडयांतील लोकांना पूर्व कल्पना न देता घेतल्या जातात. कांही वेळेस ग्रामसभा न घेता केवळ घेतल्या गेल्या असे कागदोपत्री दाखविले जाते अशी बरीचशी उदारणं देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायती मधून दिसून येतात.

कुठलीही संस्था कोणत्याही पातळीवर असो तिच्या आर्थिक बाजूला अत्यंत महत्त्व आहे. कारण आर्थिक बाजू चांगली असल्याशिवाय इच्छा असतांनाही कार्य केले जाऊ शकत नाही. ग्रामपंचायतीची आर्थिक बाजू म्हणजे त्यांना मिळणारे उत्पन्न होय. आजच्या जगात पैशाला, उत्पन्नाला आणि त्याच्या हिशोबाला सुद्धा अत्यंत महत्त्व आहे. ग्रामपंचायती प्रगतिपथावर आहेत. असे मानले जाते. आधुनिक काळातच नव्हे तर चाणक्याच्या वेळेपासून अर्थव्यवस्थेला महत्त्व आहे. बजेट अथवा जमा खर्चाचा अंदाज केल्याशिवाय कोणताही

व्यवहार अशक्य होतो. ग्रामपंचायतीच्या कामकाजात देखील याला अत्यंत महत्त्व आहे.

देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतींना पुढील मार्गाने उत्पन्न मिळते.:-

१) कर आकारणे, २) दंड वसुली,

३) सरकारी अनुदान, ४) लोकांकडून देणगी.

(अद्याप ग्रामपंचायतींना एकही देणगी दिली गेली नाही.)

ग्रामपंचायतींनी इमारती जमिनी यावर कर लावलेला आहे. त्याचप्रमाणे चुंगीकर घेतला जातो. यात्रा, उत्सव, करमणूक यावर सुद्धाकर बसविले गेले आहेत. बऱ्याचशा ग्रामपंचायतींना आठवडयाला भरणाऱ्या बाजारातून, वर्षाला हिणऱ्या यात्रा उत्सवातून कराच्या स्वरूपात उत्पन्न मिळते तसेच दंड वसुलीच्या मार्गाने सुद्धा सर्वच ग्रामपंचायतींना थोडे उत्पन्न मिळते. करवसुली आणि दंडवसुली यामधून मिळणारे उत्पन्न अत्यंत कमी आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात सिंहाचा वाटा स्वत: शासनाने उचललेला आहे. शासन ग्रामपंचायतींना सरकारी अनुदान देते.

खेडयांतील एकंदर महसुलापैकी (Revenue) जास्तीत जास्त ३० टक्के व कमीतकमी २०टक्के तेथील ग्रामपंचायतींला दिला जातो. देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतींना इतर मार्गाने मिळणारे उत्पन्न कमी असल्यमुळे बहुतेक ग्रामपंचायती ह्या सरकारी अनुदाणावर चालतात. पारतविक पाहता ग्रामपंचायतीचे स्वत: चे उत्पन्न ग्रामपंचायतीचा कारभार चालविण्या इतपत असले पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे नाही जर सरकारी अनुदान मिळाले नाही किंवा अत्यंत कमी प्रमाणांत देण्यांत आले तर ग्रामपंचायतीचा कारभार चालणे अशक्य होईल. कांही अपवाद वगळता देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायती सरकारी अनुदानावर चालतात. म्हणून या तालुक्यातील ग्रामपंचायती आर्थिक दृष्टीने स्वावलंबी झालेल्या नाहीत. कुठल्या ग्रामपंचायतींना सरकारी अनुदाना व्यतिरिक्त मिळणाऱ्या बहुतेक उत्पन्नाबाबत नेहमीच तक्रार दिसून येते. देगलूर तालुक्यातील कांही ग्रामपंचायतीतून भ्रष्टाचाराची उदाहरणे दिसून येतात. भ्रष्टाचारामुळे किंवा अफरातफरीमुळे एखाद्याला त्याच्या पदावरून काढले नसले तरी त्याबद्दल चौकशी मात्र निश्चित चालू आहे.

मुंबई ग्रामपंचायत कायद्यात नमूद केल्याप्रमाने ग्रामपंचायतीच्या सरपंचाला स्वत: जवळ रोख रक्कम म्हणून रू. १५० ठेवता येतात त्यापेक्षा अधिक रक्कम जवळ ठेवण्याचा त्यांना अधिकार नाही. जर अधिक रक्कम ग्रामपंचायतीजवळ असेल तर ती नजीकच्या बँकेत ठेवावी लागते देगलूर तालुक्यातील बरेचसे सरपंच ग्रामपंचायतीच्या रकमेचा उपयोग स्वत: साठी व स्वत:च्या कुटुंबासाठी करून घेतात. एखाद्या हिशोब तपासणीसाने (Audit officer) रोख रकमेची मागणी केल्यास ऐनवेळी कोणाकडून तरी रक्कम घेतली जाते म्हणजे रकमेच्या बाबतीत रोख व्यवहार ग्रामपंचायतींच्या बहुतेक सरपंचामध्ये दिसून येत नाही जर एखाद्या खेडयात ग्रामपंचायतीमार्फत बांधकाम वगैरे चालू असेल तर अशा वेळी सरपंचाला स्वत: जवळ रोख

रक्कम म्हणून रू. ५०० ठेवता येतात देगलूर तालुक्यातीत बऱ्याचशा खेडयांतून ग्रामपंचायती मार्फत बांधकाम चालू असून तेथील सरपंचाजवळ रोख रक्कम रू. ५०० असलेली दिसून येते. वरंगल, शिळवणी, खुत्मापूर, मालेगाव वगैरे ग्रामपंचायतीची नांवे उदाहरणादाखल देता येतील.

मुंबई ग्रामपंचायत कायद्यामध्ये नमूद केल्या प्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायतीची कांही कार्ये असतात. जी त्यांनी केलीच पाहिजेत. अशा नमूद केलेल्या कार्यातील बरीचशी कार्ये देगलूर तालूक्यातील ग्रामपंचायतीनी केलेली आहे. ग्रामपंचायतींना केलेल्या कामामध्ये खालील गोष्टचा समावेश होतो. आरोग्य रक्षण, साफसफाई. रस्ते व नाले ह्यांची व्यवस्था, चहा, कॉफी, दुध बाजार ह्यांची व्यवस्था, कोंडवाडयाची व्यवस्था, धान्याच्या साठयासाठी वखारी, शिक्षण व खेडयांची सोय, वाचनालये वगैरे त्याचप्रमाणे बरीचशी आवश्यक असणारी कामे देगलूर तालूक्यातील ग्रामपंचायतींनी केलेली आहेत. त्यांत पुढील बाबीचा समावेश होतो प्रसूति, शिशूसंगोपणाची व्यवस्था, घरांची सुधारणा, सार्वजनिक संडास, रस्थ्याच्या दुतर्फा झाडे लावणे, लोकांमध्ये जागृती निर्माण करणे वगैरे कुठल्याही संस्थेच्या आणि ग्रामपंचायतींनी केलेल्या कार्यावरच त्या गांवाचा विकास अवलंबून असतो. देगलूर तालूक्यातील ग्रामपंचायतीमार्फत शिक्षण प्रसाराचे काम मात्र मोठया प्रमाणावर होत आहे. प्रत्येक खेडयात शाळा आहेत, शाळेच्या नव्या इमारती आहेत. शैक्षणिक दृष्टया विचार केल्यास देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायती प्रगतिपथावर आहेत असे दिसून येते.

देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका, त्यांचे उपलब्ध उत्पन्नाचे मार्ग, आणि संस्थांनी केलेले कार्य यांचा विचार केल्यास ग्रामपंचायतीचे एकंदर चित्र बरोबर नाही, समाधानकारक नाही असे वाटते. ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत असतांना पक्षीय राजकारण खेळले जाते. पंचायत राज्य पद्धतीच्या अगोदर खेडयाचे जे चित्र होते ते एकदम पालटून गेले आहे. पूर्वीची शांतता, समाधानी सहकार्याची भावना. आपलेपणा प्रेम, आदर कुठेच दिसत नाही. उलट गडबड, गोंधळ, स्वार्थ, भ्रष्टाचार इत्यादी बाबी बोकाळल्या आहेत. ग्रामीण पातळी वर असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणूका व सत्तेचे राजकारण खेळणारे आखाडे बनलेल्या आहेत. आर्थिक बाबतीत सुद्धा ग्रामयंचायती स्वावलंबी झालेल्या नाहीत. केवळ सरकारी अनुदानावर ग्रामपंचायती चालतात. कुठल्याही प्रकारची नमूद करण्याजोगी विकासाची कामे ग्रामपंचायतींनी केलेली नाहीत.

आज तरी ग्रामपंचायतीचे एकदर चित्र समाधानकारक दिसत नसले तरी कालांतराने ते निश्चित दिसेल. सध्याच्या ग्रामपंचायतींचा काळ म्हणजे प्रयोगावस्थेचा आहे. सत्तेच्या विकेंद्री करणाचा ग्रामीण पातळीवरचा प्रयोग. प्रयोगावस्थेत व प्राथमिक अवस्थेत असे होतच असते. पुढे चालून लोकजागृती होईल आणि सध्याचे दिसून येणारे ग्रामीण चित्र एकदम पालटून जाईल. ती म्हणजे ग्रामपंचायतीचा मार्ग म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे जाणयाचा आहे. अंधारातून जात असतांना रस्त्यात खाचखळगे असतात, प्रसंगी ठेचाही लागतात. ह्या सर्व गोष्टी सहन करून अंधारी रस्ता पार करावा लागतो व प्रकाशाकडे जावे लागते मला वाटते ह्या

चे उदारण आपल्याला देगलूर तालुक्यातील कांही ग्रामपंचायतीतून दिसून येते.

कारण उत्पन्नाचे मार्ग भरपूर नसतांना, ग्रामीण जनतेचा कार्यातील अभाव असतांना केवळ आपल्या स्वप्रयत्नांवर कांही ग्रामपंचायतीनी भरीव कामगिरी केली आहे. देगलूर तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायतींचे उदाहरण म्हणून आपल्याला झरी, हाणेगांव, शहापूर, वरखेड इत्यादी ठिकाणी असलेल्या ग्रामपंचायतींची नावे सांगता येतील.

सध्याच्या कठीण परिस्थितीमधून खेडयांचा, खेडयातील लोकांचा विकास होणार आहे. ह्या होणाऱ्या विकासात ग्रामपंचायतींची वाटा सिंहाचा राहील असा दृष्टिकोन बाळगू या.

***



होट्टल येथील हेमाडपंथी मंदिरातील एक
वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती